**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**:तोंडी उत्तरे

**सभापती** : आता गुरुवार दिनांक 11 डिसेंबर, 2014 रोजी राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र. 1127 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत 5 क्रमांकाचा प्रश्न आणि राखून ठेवलेला प्रश्नांचा विषय एकच असल्यामुळे हे दोन्ही प्रश्न क्लब करून चर्चा करण्यात यावी अशी विनंती आहे.

**सभापती** : बघतो.

**राज्यातील जात पडताळणी समितीकडे हजारो अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(२) * ११२७ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ समित्यांचा कारभार ६ अधिका-यांमार्फत चालविला जात असून त्यातील दोघा अधिका-यांकडे ४ समित्यांचा अध्यक्षपदांचा कारभार सोपविण्यात आला असून सद्यस्थितीत येथील ८९ हजार अर्ज प्रलंबित असल्याबाबत माहे ऑगस्ट,२०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रलंबित असलेले अर्ज हे मराठा, मुस्लिम समाजातील अनेक उमेदवार प्रमाणपत्र मिळूनही सदरील लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त समित्याची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे
(५) अद्याप, याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशतः खरे आहे.
जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवरील अध्यक्षांची 15 पदे असून त्यापैकी सहा पदे रिक्त आहेत. उप आयुक्त तथा सदस्य यांचे एक पद रिक्त आहे. संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव यांची चार पदे रिक्त आहेत. सिमत्यांमध्ये माहे ऑगस्ट, 2014 अखेर 1,06,935 जात पडताळणीचे अर्ज प्रलंबित होते. आता माहे नोव्हेंबर अखेर 1,19,674 जात पडताळणीचे अर्ज प्रलंबित आहेत.

जातपडताळणी समित्यांची बहुतांशी पदे भरण्यात आलेली असून उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच माहे ऑगस्ट, २०१४ अखेर १०६९३५ इतकी जातपडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) अंशतः खरे आहे.
नव्याने आरक्षण देण्यात आलेल्या मराठा समाजाचे 5,766 अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी 3532 अर्ज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निकाली काढण्यात आले आहेत.  तसेच, मुस्लीम समाजाचे 202 अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी 49 अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(३) व (४) समित्यांवरील अध्यक्षांची पदे महसूल विभागामार्फत व इतर पदे सामाजिक न्याय विभागामार्फत भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.**

**(५) प्रश्न उद्भवत नाही.**

श्री. मुझफ्फर हुसैन : दिनांक 11 डिसेंबर, 2014 रोजी या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आले होते ते चुकीचे होते हे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. आता राज्यातील 15 जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचा कारभार 6 अधिकाऱ्यांमार्फत चालवला जात असून त्यापैकी 2 अधिकाऱ्यांवर 4 समित्यांचा कारभार सोपविण्यात आला आहे. उत्तरात असेही म्हटले आहे की, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवरील अध्यक्षांची 15 पदे असून त्यापैकी त्यातील 6 पदे रिक्त आहेत. उपायुक्त तथा सदस्य यांचे 1 पद रिक्त आहे. संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिवांची 4 पदे रिक्त आहेत. माझ्या प्रश्नाचे पूर्ण उत्तर अद्याप मिळालेले नसल्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, जात पडताळणी समितीच्या अध्यक्षांची पदे रिक्त राहिल्यामुळेच 1,06,935 अर्ज प्रलंबित राहिले आहेत. त्यामुळे जात पडताळणी समितीच्या अध्यक्षांची रिक्त पदे किती दिवसात भरली जाणार आहे ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून ही पदे येणाऱ्या महिन्यात भरली जातील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या 3 आणि 4 ला उत्तर देतांना माननीय मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, समितीवरील अध्यक्षांची पदे महसूल विभागामार्फत व इतर पदे सामाजिक न्याय विभागामार्फत भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, माजी माननीय मुख्य सचिव श्री. सहारिया यांच्या अध्यक्षतेखालील समितीने महाराष्ट्रात 24 पडताळणी समित्या गठीत करुन 50 टक्के अध्यक्षांच्या जागा समाजकल्याण विभागातील अधिकाऱ्यांसाठी ठेवाव्यात अशी स्पष्ट शिफारस केलेली आहे. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापि शासनाने केलेली नाही. त्यामुळे आपण 100 जागा महसूल विभागासाठी दिल्या तर महसुल विभागाचे अधिकार 4-5 महिने त्या पदावर राहतात व नंतर ते निघून जातात. त्यामुळे जातपडताळणी समिती जर समाज कल्याण विभागाचा भाग असेल तर समाज कल्याण विभागातील 50 टक्के अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यास कोणती अडचण येणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 1127.....**

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, 24 जातपडताळणी समित्या मंजूर करण्यात आल्या होत्या व त्यापैकी अर्ध्या समित्यांवर समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याच्या संदर्भात निर्णय झाला होता. जातपडताळणी समित्यांवर महसूल आणि समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याच्या संदर्भात संदर्भात अद्यापी कार्यवाही झालेली नाही. परंतु येत्या महिन्या भरात यासंदर्भात निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : जातपडताळणी समितीवर 50 टक्के जागा समाज कल्याण विभागातून भरल्या जाणार आहेत काय ?

श्री. राजकुमार बडोले : होय.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, जात पडताळणी समितीपुढे अर्जदाराचा अर्ज जाण्यापूर्वी अर्जदार सर्व माहितीची पुर्तता करुन दाखला मिळवित असतो. परंतु काही वेळेस दाखल्यामध्ये त्रुटी असते म्हणून जात पडताळणी हा कम्पलसरी भाग केलेला आहे. जात पडताळणीसाठी विलंब लागत असल्यामुळे कँडीटेड, विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. एन.ए.चे प्रमाणपत्र 60 दिवसाच्या काळत मिळाले नाही तर ते मिळाले आहे असे गृहीत धरले जाते त्यामुळे या विषयाच्या संदर्भात कालमर्यादेचा विचार केला जाणार आहे काय ? जातपडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी कालमर्यादा निश्चित झाली तरच इतक्या मोठया प्रलंबित प्रकरणाचा निपटारा होऊ शकेल. त्यामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात कालमर्यादेचे धोरण शासन स्वीकारणार आहे काय ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, जात पडताळणी समितीकडे जी काही प्रकरणे येत असतात त्यातील काही प्रकरणे क्लिष्ट असतात. कधी कधी जातीच्या संदर्भातील दाखले किंवा 50 वर्षाची जी काही माहिती लागत असते ती मिळण्यास थोडासा अवधी लागत असतो. यासंदर्भातील जी प्रक्रिया आहे ती सातत्याने सुरु असणारी प्रक्रिया आहे. यामध्ये प्रकरणे येत असतात आणि जात असतात. परंतु यातील काही प्रकरणे त्या ठिकाणी असल्यामुळे विलंब होत असतो. आमच्याकडे आजच्या घडीला 1 लाखाच्यावर प्रलंबित प्रकरणे असून यातील 50 टक्के प्रकरणे नव्याने येणारी असतात. त्यामुळे प्रकरणांचा निपटारा जास्तीत जास्त कसा होईल याचा

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 1127.....**

श्री. राजकुमार बडोले .. ..

आम्ही प्रयत्न करीत असतो. खरे म्हणजे आजच्या घडीला एकंदर 50 टक्केच प्रकरणे दर महिन्याला पेंडींग राहत असतात. यामध्ये सातत्याने प्रक्रिया सुरु असते त्यामुळे यामध्ये खूप मोठया प्रमाणात कोणाचही नुकसान होत नाही. जात पडताळणीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या काही सुधारणा असतील तर त्यांच्या सोबत बैठक घेऊन योग्य त्या सुधारणा करण्यात येतील.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरामध्ये शासनाने मान्य केले आहे की, ऑगस्ट, 2014 अखेर 1,19,674 जात पडताळणीचे प्रकरणे प्रलंबित आहेत. जातपडताळणी प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे अनेकांना नोकरी, प्रमोशन आणि कॉलेजच्या प्रवेशापासून वंचित रहावे लागत असते. त्यामुळे आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सरकारने याबाबत टाईम फ्रेम करुन ठरावीक वेळेत प्रमाणपत्र दिले जाईल यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदय खुलासा करणार आहेत काय ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, जात पडताळणीकडे जी काही प्रकरणे येत असतात ती मुख्यत: शैक्षणिक कारणासाठी,नोकरीच्या कारणासाठी येत असतात. ही प्रकरणे दररोज येत असतात. आजच्या घडीला 1,19,674 प्रलंबित प्रकरणे असून ती लवकरात लवकर निकाली काढण्याचा प्रयत्न करणार आहोत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ AKA/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 11:10

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.1127....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही ऑन गोईंग प्रक्रिया आहे याची मला कल्पना आहे. जात पडताळणी समितीकडे प्रकरण गेल्यानंतर त्या संदर्भातील निर्णय किती दिवसांत दिला पाहिजे याबाबत कालमर्यादा निश्चित करण्यात येईल काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, या संदर्भात टाईम फ्रेम करुन प्रकरणे निकाली काढण्यात येतील.

**सभापती** : या प्रश्ना संदर्भात 50 सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली तरी माननीय मंत्री महोदयांकडून समाधानकारक उत्तरे मिळणे शक्य नाही. तेव्हा मी या विषयाच्या संदर्भात दीड तासाची चर्चा मंजूर करीत आहे. ही चर्चा पुढील तीन दिवसांत घेण्यात येईल.

जात पडताळणीचा विषय सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. परंतु एक शंका येते की, जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात आलेली केस योग्य असली तरी ती केस पेन्डींग ठेवण्याची कोणाची तरी इच्छा असते. लोकशाही राज्यामध्ये असे होऊ नये,असे मला वाटते.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपल्या सर्वांच्या दृष्टीने हा अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. मी सत्ताधारी पक्षाचा मंत्री असलो तरी आपण त्या विषयावर चर्चा दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. परंतु मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, तीन तीन वर्षे केस प्रलंबित राहत नाही. ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. सन्माननीय सदस्यांनी स्फेसिफीक केस सांगितल्यास त्याबाबत चौकशी करण्यात येईल. जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात आलेल्या केसससंबधी कालमर्यादा ठरविली पाहिजे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याबाबत जरूर विचार करण्यात येईल.

**सभापती** : मी हजारो अडचणीच्या केसेस बाबत जात पडताळणी समितीकडे पाठपुरावा केलेला आहे. एक तर तेथील अनेक कर्मचारी रजेवर असतात. त्यांनी रजा घेऊ नये असे माझे म्हणणे नाही. परंतु त्याबाबत पर्यायी व्यवस्था केली पाहिजे. काही वेळा विद्यार्थी आणि उमेदवारांना 20-20 वेळा फेऱ्या मारुनही जात पडताळणी प्रमाणपत्र मिळत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही जात प्रमाणपत्राच्या संदर्भात पाठपुरावा केला असता आम्हाला उच्च न्यायालयाकडून नोटीस देण्यात आली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.1127....

**सभापती** : जात पडताळणी समितीने क्वासी ज्युडिशिअल याचा अर्थ आम्हाला मंत्री सुद्धा विचारु शकत नाही, असा घेतलेला आहे. पण त्यांचा हा गैरसमज आहे. आपण चर्चेच्या माध्यमातून पाठपुरावा केल्यास गरीब विद्यार्थी, उमेदवार यांना न्याय मिळेल अन्यथा तो मिळणार नाही.

---------

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मूर्तिजापूर (जि.अकोला) येथील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(१) * ६२४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील मूर्तिजापूर तालुक्यातील २५ ते ३० रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंझरा ते धोत्रा या अत्यंत रहदारीच्या मार्गावर मोठया प्रमाणात खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुर्तिजापूर तालुक्यातील राखेड, कंझरा, कमलणी, कमलखेड, धानोरा, आरखेड, किनखेड, निंभा, किन्हीफनी, धानोरा वैद्य, दुधलक, शेंद, इ. गावांचे रस्ते पूर्णपणे उखडले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे काम केव्हा पूर्ण होणार आहे ?

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. चंद्रकांत पाटील यांच्याकरिता :** (१) अंशत:खरे आहे.

मूर्तिजापूर तालुक्यातील काही गावांना जोडणाऱ्या रस्त्यांवर काही प्रमाणात खड्डे पडले आहेत. तथापि, या रस्त्यांवरील व तालुक्यातील इतर रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे. रा.मा. दर्जाच्या रस्त्यांवरील व प्र.जि.मा दर्जाच्या रस्त्यांवरील काम प्रगतीत आहे.

(२) अंशत:खरे आहे.

प्रश्नांकित रस्त्यावर काही प्रमाणात खड्डे पडले होते. सदर खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असून निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे. रस्त्यावरील वाहतुक सुरळीत आहे.

(३) अंशत:खरे आहे.

अनमोरा-धानोरा वैद्य किन्हिफनी धोत्रा रस्ता इजिमा ७७ व धोत्रा ते रामा ७८ या दोन्ही रस्त्याची लांबी सुस्थितीत असून वाहतुक सुरळीतपणे सुरु आहे. काही रस्ते जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असून त्या रस्त्यांवर पडलेले खड्डे भरणे व इतर दुरूस्तीची कामे निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) वरील १,२ व ३ प्रमाणे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील कंझरा, राखेड, कमलणी, कमलखेड, धानोरा व इतर गावांच्या रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. त्या रस्त्यांवरुन चालणे कठीण झाले आहे. लोकांना घरापर्यंत आणि शेतापर्यंत जाता येत नाही. माननीय मंत्री महोदय सदस्य असताना ते मूर्तिजापूर येथे आले होते.तेव्हा त्यांची गाडी

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.624...

श्री.गोपीकिसन बाजोरिया.....

खराब रस्त्यामुळे फसली होती. या रस्त्यांची अवस्था पाहून आपण लक्षवेधी सूचना देऊ असे त्यांनी सांगितले होते. आता ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री झालेले आहेत. माझा प्रश्न आहे की, माननीय मंत्री संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन खराब रस्ते एक महिन्यात दुरूस्त करण्यात येतील काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे जे सांगिलेले ते योग्य आहे. काही भागांतील रस्ते हे जिल्हापरिषदेचे तर काही सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहेत. यामध्ये 165 कि.मी.चे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहेत तर 138 कि.मी.चे रस्ते जिल्हापरिषदेचे आहेत. जिल्हापरिषदेच्या अखत्यारितील रस्त्यांच्या दुरूस्तीची कामे मागेपुढे होत असतात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सात प्रमुख रस्ते आहेत. 165 कि.मी.लांबीचे आहेत. त्यामध्ये एकूण 70 कि.मी.रस्ते खराब झालेले आहेत. परंतु सन्माननीय सदस्य ज्या रस्त्यांचा उल्लेख करीत आहे ते रस्ते फक्त दोन कि.मी.पर्यंत खराब झालेले आहेत. त्या रस्त्यांच्या डागडुजीचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम एक महिन्याच्या आत पूर्ण केले जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मी त्यांच्याकडे आलो होतो आणि गाडी फसली होती. माझी गाडी खड्ड्यात फसली नव्हती.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी अकोला मतदारसंघातून तीन वेळा लोकभेवर निवडून गेलो आहे. मला त्या भागातील रस्त्यांची चांगली माहिती आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या रस्त्यांचा उल्लेख केला त्या रस्त्यांवर मागील वर्षी किती खर्च झाला आणि वर्षभरात ते रस्ते कसे खराब झाले ?

श्री.प्रवीण पोट-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नंदूरबार शहरात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) प्रकल्प अंतर्गत डिझेल व पेट्रोलवर लावलेला सेस रद्द करण्याबाबत**

**(२) * २१४५ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील अधिवेशनात आश्वासन देऊनही नंदूरबार शहरात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) प्रकल्प अंतर्गत डिझेल व पेट्रोलवर लावलेला सेस रद्द करण्यात आला नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नंदूरबार या आदिवासी जिल्हयाला सेस पासून किती दिवसात मुक्त करण्यात येणार आहे,
(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे : 1.**होय.

2 व 3 शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून या प्रकल्पाकरिता अपेक्षित असलेले अर्थसहाय्य अद्याप प्राप्त न झाल्यामुळे सदर प्रकल्पावरील खर्चाची रक्कम वसूल व्हावयाची असल्याने सदर प्रकल्पाकरिता लागू करण्यात आलेला इंधर अधिभार रद्द करण्यात आलेला नाही. सदर प्रकल्पाची उर्वरित किंमत वसूल झाल्यानंतर इंधन अधिभार बंद करण्यात येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, नंदूरबार शहरासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने एक प्रकल्प तयार केला होता. त्या प्रकल्पाची किंमत 18 कोटी रुपये होती. या 18 कोटी रुपयांमध्ये दोन आरओबी, रेल्वेचे उड्डाणपूल आणि शहरातील 14 कि.मी.रस्ते करायचे होते. आता 10 कोटी रुपये आदिवासी विकास विभागाने दिलेले आहे. 14कि.मी.च्या रस्त्यांपैकी आजपर्यंत एकही रस्ता झालेला नाही. फक्त आरओबी करण्यात आले. आपण आरओबी केलेले असताना आणि आदिवासी विकास विभागाने 10 कोटी रुपये दिले असताना पुन्हा त्या विभागाकडे निधी मागत आहात. नंदूरबार शहरामध्ये अडीच वर्षापूर्वी टोल बंद करण्यात आलेला आहे. नंदूरबार जिल्ह्यामध्ये आदिवासींची सर्वात जास्त लोकसंख्या आहे. नंदूरबार शहरामध्ये येणाऱ्या प्रत्येक गाडीला पेट्रोल आणि डिझेलसाठी दीड रुपये जास्त द्यावे लागतात. तत्कालील मंत्री महोदयांनी सांगितले की, पेट्रोल आणि डिझेलवर सेस आकारला जात असेल आणि टोल बंद करण्यात आला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2145....

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

असेल अशी विसंगती असेल तर ती तातडीने दूर करण्यात येईल. सहा महिने झाले तरी अजून तेथील सेस बंद करण्यात आलेला नाही. माझा प्रश्न आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी तेथील सेस बंद करण्यात येईल काय ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, नंदूरबार शहरातील सूरत-भुसावळ या आरओबीसाठी 6 कोटी 58 लाख रुपये खर्च आला. सूरत-तळोदा आरओबीसाठी 18.12 कोटी रुपये खर्च आला. रोड इम्प्रुव्हमेंटसाठी 2 कोटी 3 लाख रुपये खर्च करण्यात आले. तसेच आपण रेल्वेला काही डिपॉझ ीट दिलेले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ AKA/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 11:20

ता.प्र.क्र.2145....

श्री.एकनाथ शिंदे....

हे दोन उड्डाणपूल आणि बाह्य रस्ता झाल्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. जड वाहने बाहेरुन जात असल्यामुळे तेथील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, तत्कालीन मंत्री महोदयांनी असे मान्य केले होते की, यामध्ये विसंगती असेल तर ती दूर केली जाईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : महोदय, त्या भागात टोल बंद झाला आणि सेस सुरु आहे, अशा प्रकारची ती विसंगती आहे.

श्री.एकनाथ शिंदे : महोदय, त्या भागातील टोलचे नोटीफिकेशन 2016 पर्यंत आहे. परंतु आपल्या आणि मंत्री महोदयांच्या आग्रहामुळे टोल घेणे बंद केले आहे. त्या शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे की, नंदूरबार शहरातील पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीवर अनुक्रमे 1 टक्के आणि 3 टक्के जादा अधिभार लावण्यात येईल आणि हा निधी या योजनेसाठी वित्त विभागामार्फत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महमंडळाकडे वळता करण्यात येईल. हा शासन निर्णय आमच्या सरकारने काढलेला नाही. हा निर्णय केव्हा घेण्यात आला हे आपल्याला माहीत आहे. या निमित्ताने सांगू इच्छितो की, आदिवासी विकास विभागाकडून 10 कोटी रुपये आलेले असून, उर्वरित 25 कोटी रुपये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला मिळण्यासाठी आमच्याकडून आदिवासी विकास विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु अद्यापपर्यंत आदिवासी विकास विभागाकडून सदरहू रक्कम वळती करण्यात आलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी हे आदिवासी भागातून निवडून आलेले आहेत. मी मंत्री म्हणून त्यांच्या भावनेशी सहमत आहे. माननीय आदिवासी विकास मंत्री माझ्या शेजारीच बसलेले आहेत. या विषयी त्यांच्यासोबत बैठक आयोजित करुन आदिवासी विकास विभागाडून पैसा वळता करण्याबाबत त्यांच्याकडे मागणी करुन सेसचा प्रश्न निकाली लावण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, डिझेल आणि पेट्रोलवरील सेस केंद्र सरकारने लावलेला होता. त्या पैशातून सीएसआर फंड घेतला जातो. शिवाय ग्रामीण विकास रस्ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2145....

श्रीमती शोभा फडणवीस....

असतील, रेल्वेशी संबंधित कामे असतील त्यातून ती घेतली जातात. हा सेस 2002 मध्ये लावला आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, हा सेस रद्द करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनाला आहे काय ?

(उत्तर आले नाही.)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नंदूरबार जिल्हा आदिवासी जिल्हा आहे. या जिल्ह्यात डिझेल आणि पेट्रोलवर एक ते दीड रुपया जास्त सेस लावला आहे. इतर जिल्ह्याच्या तुलनेत आदिवासी बहुल असलेल्या जिल्ह्यामध्ये जास्त वसुली सुरु आहे. टोलऐवजी सेस घेण्याचा हा विषय आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, माननीय आदिवासी विकास मंत्र्यांसोबत बैठक आयोजित करुन आदिवासी विकास विभागाकडून पैसे वसूल करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल. वास्तविक पाहता माननीय मंत्री हे शासनाचा एक भाग आहेत. त्यांनी सभागृहात स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, सेस माफ करण्यासाठी किंवा तो लावला जाणार नाही या दृष्टिकोनातून शासन विचार करेल. या विषयी संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांसोबत बैठक घेणे हे मी समजू शकतो. परंतु ही बैठक आपण कशासाठी घेणार आहात ? नंदूरबार जिल्हा आदिवासी असल्यामुळे ही रक्कम आदिवासी विकास विभागाने भरुन दिली तर त्या जिल्ह्याला न्याय मिळेल. या अनुषंगाने मी विचारु इच्छितो की, पुढील काळात सेस भरावा लागणार नाही या दृष्टीने शासन प्रयत्न करेल काय ?

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी या विषयी तत्काळ सकारात्मक निर्णय घेतला जाईल. संबंधित विभागाचे मंत्री आणि आमदार यांच्याशी चर्चा करुन या बाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात आलेल्या कामांपैकी कोणकोणत्या कामांवर सेस लावण्यात आला आहे ? वास्तविक पाहता त्या ठिकाणी टोल घेण बंद झालेले असताना तेथे

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2145....

श्री.जयंत प्र.पाटील....

सेस सुरु ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. टोलची रिकव्हरी पूर्ण झाल्यानंतर टोल बंद होतो. या निमित्ताने स्पेसिफिक विचारतो की, टोलची रिकव्हरी झाल्यानंतर सेस सुरु ठेवण्याचा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा उद्देश कय आहे ?

श्री.एकनाथ शिंदे : महोदय, मी अगोदरच सांगितलेले आहे की, अद्यापपर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला 25 कोटी 87 लाख रुपये येणे बाकीत आहेत. या बाबतचा निर्णय 2008 मध्ये झाला होता. अगोदरच्या सरकारने केलेले सर्व आम्ही निस्तारीत आहोत.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाबरोबर चर्चा करुन हे अधिवेशन संपण्यापूर्वी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे माननीय मंत्र्यांनी सांगितल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माझी विनंती एवढीच आहे की, हा प्रकल्प 18 कोटी रुपयांचा होता, आता त्याची किंमत 35 कोटी रुपयांवर गेली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अंदाजित किंमतीमध्ये पूर्ण केलेला एकही प्रकल्प नसेल. आमच्या भागातील 14 कि.मी. चे रस्ते प्रकल्पातून वगळले. त्या भागात फक्त दोन आरओबी केले आहेत. या कामासाठी 35 कोटी रुपये कसे लागतात ? नंदूरबार शहरातून रेल्वे मार्ग जातो. नंदूरबार शहरातून त्या रेल्वे मागावरुन दिवसाला 55 रेल्वे जायच्या. त्यामुळे वारंवार फाटक बंद करावे लागायचे. त्यामुळे त्या ठिकाणी उड्डाणपूल करण्याची तेथील जनतेची मागणी होती व ती तत्कालीन सरकारने पूर्ण केली. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, टोल वसूल करणाऱ्या एजन्सीने आमच्या शहरात टोल वसुली केली, मात्र त्याचा भरणा सरकारकडे केला नाही. सहा महिने वसूल केलेली रक्कम त्या एजन्सीने सरकारकडे भरली नाही. लोकांकडून वसूल करण्यात आलेला पैसा संबंधित एजन्सी सरकारकडे जमा केला नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात येईल काय ? आदिवासी विकास विभाग आणि आदिवासी विकास महामंडळ हे सरकारचेच भाग आहेत. तत्कालीन मंत्री महोदयांनी या कामी 10 कोटी रुपये दिले होते. या अनुषंगाने मी स्पेसिफिक विचारतो की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी या विषयी निर्णय घेऊन हा सेस तत्काळ रद्द करण्यात येईल काय ?

..4..



SJB/ AKA/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 11:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथ शिंदे : सभापती महोदय, एजन्सीने टोल वसूल करुन त्याचा भरणा सरकारकडे केला नाही असे सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. मी सांगू इच्छितो की, असे घडले असेल तर या बाबतील चौकशी केली जाईल आणि संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल. माननीय आदिवासी विकास मंत्री हे सुध्दा आपल्या भावनेशी सहमत आहे. मुळात या बाबतीत अगोदरच्या सरकारने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यामुळे यातून आदिवासी भागातील जनतेला न्याय कसा देता येईल याचा प्रयत्न सरकारकडून करण्यात येईल.

---------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चंद्रपूर जि.प. समाज कल्याण विभागातंर्गत निकृष्ट दर्जाच्या बैलगाडयांचे केलेले वाटप**

**(३) * १२३३ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

**(१) चंद्रपूर जि.प. समाज कल्याण विभागातंर्गत सन २०१३-२०१४ या वर्षात अल्पभुधारक / अनु.जाती / अनु.जमाती लाभार्थ्याकरीता वाटप करण्यांत आलेल्या बैलगाडया हया निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१४ ला निदर्शनास आले, हे खरे आहे काय,**
**(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,**
**(३) असल्यास, संबंधित पूरवठा करणा-या कंत्राटदारावर व संबंधीत अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,**
**(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?**

श्री.दीपक केसरकर, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता : **(१) हे खरे नाही.**
**या सर्व बैलगाडयांचा पुरवठा महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत गुणवत्ता तपासणी करुनच करण्यात आलेला आहे.**
**(२) उक्त प्रकरणी स्थानिक स्तरावर बैलगाडीचे मोजमाप केले असता, बैलगाडी तपासणी अहवाल निकषाच्या आत असल्याचे दिसून आले.**
**(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.**

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने ज्या बैलगाड्या वितरित केल्या होत्या त्यामध्ये प्रचंड त्रुटी होत्या. त्या बैलगाड्यांना काही पार्ट सुध्दा लावण्यात आलेले नव्हते. या संदर्भात हरकत घेतल्यानंतर आणि या विषयी प्रश्न लागल्यानंतर महामंडळाने अपुरे पार्ट बसविल्यानंतर त्या बैलगाड्या वितरित केल्या. या निमित्ताने मी एवढेच विचारते की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या मालाच्या बाबतीत अशी परिस्थिती असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1233

श्री.दीपक केसरकर : महोदय, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून गुणवत्ता तपासणी करुनच बैलगाड्यांचा पुरवठा केला जातो. या प्रकरणी नांदेड येथील इंजिनियरींग कॉलेजमधून पुन्हा एकदा बैलगाड्यांची गुणवत्ता चाचणी केली असून ती समाधानकारक आढळून आली आहे.

श्री.विक्रम काळे : महोदय, मी स्पेसिफिक विचारतो की, शेतकऱ्यांना बैलगाड्या वाटप करण्याची योजना राज्यातील सर्वच भागात आहे काय ? आपण आधुनिक युगात वावरत आहोत. शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन ते वापरावे याचा प्रचार कृषी विभागाकडून सातत्याने केला जातो. या सर्व बाबींचा विचार करता, बैलगाडीऐवजी ट्रॅक्टर वाटप करण्याबाबत विस्तृत योजना तयार करण्याचा शासनाचा मानस आहे काय ?

श्री.दीपक केसरकर : महोदय, हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाशी संबंधित आहे. या ठिकाणी बैलगाड्यांचा पुरवठा हा ग्राम विकास विभागाने केला असल्यामुळे हा प्रश्न आमच्या विभागाकडे आला आहे. सन्माननीय सदस्यांची भावना सामाजिक न्याय विभागापर्यंत पोहचविण्यात येईल.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आणि गरिबांना वेगवेगळ्या प्रकारची साहित्ये पुरवली जातात. ज्यावेळी ही साहित्ये पुरविली जातात त्यावेळी असे लक्षात येते की, तो माल निकृष्ट दर्जाचा आहे. आता लाभार्थ्यांना गॅस सबसिडीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा केली जाते. अशा प्रकारची सबसिडी किंवा मदत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केली तर ते दर्जेदार साहित्याची खरेदी करु शकतात. त्यामुळे अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान वा मदत जमा करण्याबाबत शासन विचार करेल काय ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1233....

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, सदर प्रश्न एका जिल्हा परिषदेतून पुरविल्या गेलेल्या बैलगाड्यांच्या दर्जाच्या संदर्भातील आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कृषी विभागामार्फत वेगवेगळे संशोधन होत असते. हे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचावे यासाठी कृषी विद्यापीठ व भारत सरकार यांच्या एजन्सीमध्ये करार झालेला आहे. सदर करारानुसार त्यांचा दर्जा तपासण्यात येतो. हैद्राबादची सीआरआयडीए इन्स्टिट्यूट व भोपाळची सीआयएई इन्स्टिट्यूट दर्जा चेक करतात. त्यांनी प्रमाणित केलेल्या किंमतीनुसार महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळ यांचा पुरवठा करते. उद्देश हाच आहे की, शेतकऱ्यांना दर्जेदार साहित्य मिळावे. श्ासनाने यासाठीच काळजी घेतलेली आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या संबंधात अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत सन 2013-14 मध्ये अनुसूचित जाती व जमातीतील लाभार्थ्यांना निकृष्ट बैलगाड्यांचे वाटप केले होते. अधिकाऱ्यांनी सांगितले तसे माननीय मंत्र्यांनी सभागृहात सांगितले. आम्ही प्रत्यक्ष्ात तपासणी केली असता आमच्या निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अनुसूचित जाती, जमातीतील लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणाऱ्या बैलगाड्या व इतर साहित्य सबस्टँडर्ड असते. माननीय मंत्री या संदर्भात विशेष लक्ष घालून योग्य प्रकारच्या, योग्य प्रतीच्या, गुणवत्ता असलेल्या चांगल्या बैलगाड्या आणि इतर साहित्य अनुसूचित जाती व जमातीतील लाभार्थ्यांना देणार का ?

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, निकृष्ट दर्जाच्या बैलागाड्या पुरविल्या गेल्या, हे कबूल केलेले नाही. बैलगाड्या योग्य दर्जाच्याच आहेत, हे प्रमाणित करून घेतले आहे. कृषी विद्यापीठमार्फत ते तपासले गेले आहे. दुसऱ्यांदा इंजिनिअरिंग कॉलेजकडून देखील ते तपासले गेले आहे. त्यामध्ये तफावत आढळून आलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे दर्जाच्या बाबतीत अधिक काटेकोर राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यात 8 टक्के प्लस मायनस असा फरक असतो. तो फरक यामध्ये आहे. प्रत्येक गाडी मायनसच असता कामा नये, प्लस सुध्दा कशा असतील या संदर्भात युनिव्हर्सिटीबरोबर चर्चा करा, काळजी घ्या,

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1233....

श्री. दीपक केसरकर ....

पुरवठादारांच्या बरोबर चर्चा करा, एवढेच नाही तर, महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाबरोबर चर्चा करा, व्हेरिएशन नेहमी लोअर साईडला असले पाहिजे असे नाही तर विदिन लिमिट किंवा ॲव्हरेज असले पाहिजे, याची सुध्दा खात्री करून घ्या, अशा सूचना संबंधितांना दिलेल्या आहेत.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नंतर श्री. रोझेकर ....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1481............. श्री.अनंत गाडगीळ..........

जगामध्ये बी.आर.टी. प्रकल्प साकार करीत असताना उजव्या आणि डाव्या बाजूला दोन किंवा तीन मार्गिका ठेवल्या जातात, तशा प्रकारचे बंधन तेथे आहे. मात्र पुणे शहरात हा प्रकल्प साकार करीत असताना इतर वाहतुकीसाठी एक मार्गिका आणि बी.आर.टी.ची दुसरी मार्गिका, अशी रचना करण्यात आलेली आहे. या प्रकल्पाच्या नियोजनाच्या संदर्भात चुका झाल्या असल्या तरी आता आपण त्याबाबत काही करु शकणार नाही. परंतु, भविष्यात अन्य ठिकाणी अशा प्रकारचा प्रकल्प साकार करीत असताना आणि त्याचा आराखडा तयार करीत असताना या क्षेत्रातील तज्ज्ञ नगर रचनाकारांचा आणि अभियंत्यांचा सल्ला शासन घेणार आहे का ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. भविष्यात अशा प्रकारचा प्रकल्प साकारण्यापूर्वी त्याबाबतचा अहवाल तयार केला जाईल आणि पुन्हा चूक होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आता राज्यमंत्री महोदयांनी अशी माहिती दिली आहे की, त्या ठिकाणी सहा कॉरिडॉर्स आहेत, काम अपूर्णावस्थेत आहे, कामास सन 2016 पर्यंत मुदत आहे. हे सर्व आम्हाला मान्य आहे. पण मला या माध्यमातून हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, बी.आर.टी.प्रकल्प साकारताना त्या ठिकाणी फेन्सिंग टाकलेले आहे, रस्ता अडविलेला आहे, रस्त्याच्या डाव्या व उजव्या बाजूला अनधिकृत फेरीवाले आहेत, फेन्सिंग केले असल्यामुळे त्यामधून कोणाला जाऊ दिले जात नाही. या परिस्थितीत माझा असा प्रश्न आहे की, जर या प्रकल्पाचे काम अपूर्ण असेल तर काम पूर्ण होईपर्यंत फेन्सिंगच्या आतल्या बाजूने काही वाहतूक वळविण्याबाबत शासन विचार करणार आहे का ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, फेन्सिंग आणि फेरीवाले हा स्थानिक प्राधिकरणाशी संबंधित प्रश्न आहे, त्यांनी तो सोडवावा. तथापि, हे मान्य आहे की, त्या ठिकाणी प्रचंड वाहतुकीमुळे खूप त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे डायव्हर्शन्स करता येतील का, याबाबत आम्ही निश्चित प्रयत्न करु. ज्या ज्या ठिकाणी बॉटलनेक होत आहे, त्या ठिकाणी डायव्हर्शन्स केले जातील.

---------------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रत्नागिरी येथील जात पडताळणी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५)** * **२३५१ श्री.विजय गिरकर** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील जात पडताळणी कार्यालयात २ हजार ४८९ प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्षभराच्या कालावधीत विभागीय कार्यालयात रिक्त झालेल्या पदांमुळे प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जात पडताळणी कार्यालयात मंजूर १९ पदांपैकी तब्बल ११ पदे रिक्त असून याचा बोजा कार्यरत कर्मचाऱ्यांवर पडत असल्याचे समजते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीनुसार रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(६) अद्याप उपाययोजना केल्या नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप कांबळे, **श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) होय, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती रत्नागिरी या कार्यालयात ऑक्टोबर, २०१४ अखेर २४८९ प्रकरणे प्रलंबित होती.
(२) खरे आहे.
(३) अशंत: खरे आहे.
(४) व (५) समितीचे अध्यक्ष या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. सदर पद व इतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, रत्नागिरी येथील जात पडताळणी संदर्भातील हा विषय आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या विषयासंदर्भात आपण दीड तासाची चर्चा स्विकारली आहे. त्यामुळे या प्रश्नावर चर्चा घेण्याची आवश्यकता नाही.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित आहे.

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2351.......

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी केवळ एकच प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे. मघाशी राखून ठेवण्यात आलेल्या प्रश्नावर आपण चर्चा केली. त्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी केलेल्या सूचनेनुसार आपण दीड तासाची चर्चा घेण्याचे ठरविलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केवळ एकच उप प्रश्न विचारावा.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, रत्नागिरी येथील जात पडताळणी कार्यालयात 2489 प्रकरणे प्रलंबित आहेत. याचे कारण असे आहे की, 19 पैकी 11 पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे भरली गेली तर प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत. त्यामुळे ही पदे शासन कधी भरणार आहे ?

सभापती महोदय, जात पडताळणी कार्यालयाकडून संबंधितांकडे 50 वर्षापूर्वीच्या दाखल्याची मागणी करण्यात येत असते. अनुसूचित जाती, जमातीचे लोक अशिक्षित आहेत. त्यांच्या वाडवडिलांकडे अशा प्रकारचा दाखला उपलब्ध नसतो व त्यामुळे अनेक मागासवर्गीय लोकांना प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी येतात. त्यामुळे शासनाने 50 वर्षापूर्वीच्या दाखल्याची जी अट घातली आहे, ती शिथिल करावी, अशी लोकांची मागणी आहे. आपण या विषयावर दीड तासाची चर्चा मान्य केली आहे. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, आपण जी चर्चा स्विकारली आहे, त्या चर्चेच्या प्रस्तावात याही बाबीचा समावेश आपण करावा. म्हणजे, या संदर्भात मार्ग निघू शकेल.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, साधारणपणे 12 पदे रिक्त आहेत. या विभागाचे नाव सामाजिक न्याय विभाग आहे. परंतु, मंत्रालयापासून जिल्हा कार्यालयापर्यंत असंख्य पदे रिक्त आहेत. अनेक वर्ष या विभागाकडे कोणी लक्ष दिलेले नाही. परंतु, मी हे लक्षात आणून देतो की, जिल्ह्यात प्रत्येक ठिकाणी जात पडताळणी समितीसाठी सर्व पदे मंजूर करण्यात येतील, असे मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले आहे. सामाजिक न्याय विभागातील मंत्रालयापासून जिल्हा कार्यालयापर्यंत रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही शासनाकडून युध्द पातळीवर करण्यात येईल आणि भविष्यात विद्यार्थी किंवा नोकरवर्गाची प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे निकाली काढण्याचा शासन तातडीने प्रयत्न करील.

--------------

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांच्या नियमित वेतन मिळण्याबाबत**

**(६) * ८४२ श्री.रामनाथ मोते**, **डॉ.अपूर्व हिरे**, **श्री.नागो गाणार** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांना सातत्याने विलंबाने वेतन मिळत असल्याच्या तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,
(२) नियमित वेतन विलंबाने देण्याची कारणे काय आहेत,
(३) जाणीवपूर्वक विलंबाने वेतन देणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) अनुदानित शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांना नियमित वेतन वेळेवर मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**राजे आम्ब्रीशराव आत्राम श्री. विष्णु सवरा यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) जुलै, २०१४ पासून आश्रमशालार्थ या संगणक प्रणालीद्वारे वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे व सदर ऑनलाईन प्रक्रिया नव्याने सुरू झालेली असल्यामुळे सदर प्रमणालीवर पद निर्माण करणे व कर्मचाऱ्यांचा संपूर्ण डाटा भरण्याची कार्यवाही करावी लागते. तसेच आश्रमशाळा दुर्गम भागात असल्यामुळे इंटरनेट उपलब्ध होत नाही. त्यामुळे काही प्रकल्पामध्ये नियमीत वेतन अदा करण्यास विलंब होतो.
(४) सदर संगणक प्रणालीच्या अंमजबजावणीमधील त्रुटी दूर करून नियमित वेतन अदा करण्याच कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक, शिक्षकेतरांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. निधी उपलब्ध असताना कार्यालयाच्या दिरंगाईमुळे किंवा हलगर्जीपणामुळे आश्रमशाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळत नाही.

सभापती महोदय, लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, ऑनलाईन प्रक्रिया नव्याने सुरु झालेली असल्यामुळे सदर प्रणालीवर पद निर्माण करणे व कर्मचाऱ्यांचा संपूर्ण डाटा भरण्याची कार्यवाही करावी लागत असल्यामुळे विलंब होत आहे.

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, ऑनलाईन प्रणाली आता आली आहे. गेल्या दोन-तीन वर्षांचा आपण आढावा घेतला तर असे लक्षात येईल की, ठाणे जिल्ह्यातील डहाणू, शहापूर आणि जव्हार प्रकल्पातील अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या तीन वर्षात कधीही वेळेवर मिळालेले नाही. मंत्री महोदयांच्या देखील दोन आश्रमशाळा आहेत. त्यांनी तरी सांगावे की, मागील 3 वर्षात वेळेवर वेतन मिळाले आहे का ? शासकीय आश्रमशाळातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर मिळते. केवळ आताच नाही तर गेल्या दोन-तीन वर्षातील हा अनुभव आहे की, या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कधीही वेळेवर वेतन मिळालेले नाही. वर्षाच्या शेवटच्या एक-दोन महिन्यात निधीच्या कमतरतेमुळे विलंबाने वेतन मिळाले तर ते आम्ही समजू शकतो. परंतु, संपूर्ण वर्षभर विलंबाने वेतन मिळत असेल तर ते बरोबर नाही. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रत्येक महिन्यात वेळेवर वेतन मिळण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ? तसेच, निधी उपलब्ध असताना कार्यालयाच्या हलगर्जीपणामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन मिळत नसेल तर अशा हलगर्जीपणा करणाऱ्या, दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे का ?

राजे आम्ब्रीशराव आत्राम : सभापती महोदय, जुलै, 2014 पासून आश्रमशालार्थ या संगणक प्रणालीव्दारे वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे व सदर ऑनलाईन प्रक्रिया नव्याने सुरु झालेली असल्यामुळे सदर प्रणालीवर पद निर्माण करणे व कर्मचाऱ्यांचा संपूर्ण डाटा भरण्याची कार्यवाही करावी लागते. तसेच, आश्रमशाळा दुर्गम भागात असल्यामुळे इंटरनेट उपलब्ध होत नाही. त्यामुळे काही प्रकल्पांमध्ये नियमित वेतन अदा करण्यास विलंब होतो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आदिवासींसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये प्रशासनाची अतिशय अनास्था दिसून येते, याचाच हा भाग आहे. ऑनलाईन प्रणाली असो वा ऑफलाईन प्रणाली असो, कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळाले पाहिजे. ऑनलाईन प्रणाली ही अलीकडे आली आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही प्रणाली बंद असेल किंवा संगणक बंद असेल तर आपण कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन थांबविणार आहात का ? आदिवासी आश्रमशाळांमधील

...6.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळेवर मासिक वेतन दिले गेले पाहिजे, हा नियमच आहे. वेळेवर पगार न देणे हा फौजदारी गुन्हा ठरतो, हे शासनाला माहीत आहे. त्यामुळे ऑनलाईन, ऑफलाईन किंवा अन्य कोणत्याही प्रणालीव्दारे अनुदानित आश्रमशाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळेवर मासिक वेतन अदा होईल, अशी कोणती व्यवस्था शासन करणार आहे ?

श्री.विष्णु सवरा : सभापती महोदय, मघाशी राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे शासनाने वेतनाच्या संदर्भात नवीन प्रणाली सुरु केली आहे. ही प्रणाली जुलै महिन्यापासून सुरु करण्यात आली असून दरम्यान केवळ एक-दोन महिन्यात वेतनाची अडचण निर्माण झाली होती. त्या महिन्यात कर्मचाऱ्यांना विलंबाने वेतन मिळाले आहे. आता आपण या प्रणालीमध्ये सुधारणा केली आहे. सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या महिन्यांचे वेतन योग्य पध्दतीने सुरु झालेले आहे. प्रत्येक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याला एक तारखेलाच वेतन मिळाले पाहिजे, अशी सन्माननीय सदस्यांची सूचना आहे. त्याप्रमाणे पुढील कालावधीत एक तारखेलाच वेतन मिळेल, अशा प्रकारची व्यवस्था केली जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, "आश्रमशाळा दुर्गम भागात असल्यामुळे इंटरनेट उपलब्ध होत नाही. त्यामुळे काही प्रकल्पांमध्ये नियमित वेतन अदा करण्यास विलंब होतो." माझा प्रश्न असा आहे की, शासनाने संपूर्णपणे ऑनलाईनव्दारा वेतन अदा करण्याचे ठरविले आहे का ?

सभापती महोदय, आपण प्रत्येक योजनेचा कॉन्टिजन्सी प्लॅन तयार करीत असतो. या प्रकरणी संगणकीय प्रणाली अयशस्वी झाल्यामुळे वेतन अदा करता आले नाही, असे म्हणण्यापेक्षा अशा परिस्थितीत पर्यायी व्यवस्था आपल्या विभागाकडून का तयार करण्यात आली नाही ?

सभापती महोदय, नवीन प्रणाली सुरु झाल्यानंतर इंटरनेट उपलब्ध होत नाही, असे लक्षात आले आहे आणि अशीच अवस्था राहिली तर पुढे ही प्रणाली कधीच पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे यामधील मध्यम मार्ग काय आहे ? ऑनलाईन प्रणाली निश्चितच स्वागतार्ह आहे व त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. पण त्याबरोबरच कर्मचाऱ्यांना प्रत्येक महिन्याला वेळेवर वेतन मिळाले पाहिजे, ही देखील मूलभूत गोष्ट आहे.

यानंतर श्री.मा.शिगम.........

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यामुळे अडचणी येत असतील तर त्याबाबतीत कोणती पर्यायी व्यवस्था केलेली आहे ?

श्री. विष्णू सवरा : आता ही सिस्टिम व्यवस्थत सुरु झालेली आहे. दुसऱ्या सिस्टिमची आवश्यकता आता तरी वाटत नाही. आता शिक्षकांना आणि कर्मचाऱ्यांना 1 तारखेला पगार मिळेल अशा प्रकारची सिस्टिम तयार केलेली आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : ग्रामीण भागामध्ये जेथे इंटरनेटची सोय नाही तेथे कोणती व्यवस्था केलेली आहे ?

श्री. विष्णू सवरा : 1 तारखेला पगार होण्याच्या बाबतीत ज्या काही अडचणी येत होत्या त्या आता दूर झालेल्या आहेत. सिस्टिममध्ये सुधरणा झालेली आहे. सुधारलेल्या पध्दतीनुसार वेतन सुरु झालेले आहे. पुढच्या वेळी 1 तारखेला वेतन मिळेल असा प्रयत्न आहे.

श्री. प्रकाश भारसाकळे : पुढील काळात वेतन मिळण्यामध्ये अडचणी येणार नाहीत असे मंत्री महोदयांनी सांगितले. अनेक वेळा अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे पगार वेळेवर होत नाहीत. ज्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे 1 तारखेला पगार मिळत नाहीत त्या अधिकारी वा कर्मचाऱ्यांना जबाबदार धण्यात येईल काय, तसेच जेवढे दिवस पगार मिळणार नाही तेवढ्या दिवसांचे व्याज त्या कर्मचाऱ्यांना देण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेईल काय ?

श्री. विष्णू सवरा : आता निर्माण केलेली सिस्टिम व्यवस्थित सुरु झालेली आहे. सुरुवातीला जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यामध्ये अडचणी आल्या होत्या . त्या अडचणी दूर करण्यात आलेल्या आहेत. सिस्टिममध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलेले आहे. पुढच्या वेळी 1 तारखेला पगार होईल अशी व्यवस्था केलेली आहे.

श्री. विक्रम काळे : माननीय राज्यमंत्री आणि माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामध्ये विसंगती आहे. ग्रामीण भागामध्ये इंटरनेटची सोय नाही म्हणून पगार वेळेवर होत नाहीत असे राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी इंटरनेट सुरु आहे असे उत्तर दिलेले आहे. राज्यातील सर्व शाळांतील शिक्षकांना आणि कर्मचाऱ्याना नोव्हेंबर महिन्याचा पगार 18 डिसेंबर पर्यंत देण्यात आलेला आहे काय ? ग्रामीण भागात इंटरनेटला रेंज मिळत नसेल तर ऑफ लाईनने ऑक्टोबर पर्यंतचे वेतन दोन दिवसात देण्यात येईल काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.842....

श्री. विष्णू सवरा : होय.

श्री. रामनाथ मोते : ऑन लाईन प्रक्रिया व्यवस्थित सुरु झालेली आहे असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. जुलै पासूनचे वेतन दिलेले आहे. सभागृहामध्ये विभागाच्या माध्यमातून माहिती दिली जाते. आमची माहिती अशी आहे की, आजही अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना पगार मिळालेला नाही. या बाबतीत पडताळणी करुन ज्यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे, तसेच जे अधिकारी शिक्षकांना आणि कर्मचाऱ्यांना इंटरनेट असून देखील 1 तारखेला वेतन देणार नाहीत त्यांना देखील जबाबदार धरुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. विष्णू सवरा : प्रत्येक वेळी 1 तारखेला पगार होईल अशा प्रकारची खबरदारी आम्ही घेत आहोत. अजूनही शिक्षक आणि कर्मचाऱ्याना वेळेवर पगार मिळत नसेल तर त्याबाबत चौकशी करुन त्याना वेळेवर पगार मिळेल अशी व्यवस्था करण्यात येयईल आणि जे अधिकारी चौकशीमध्ये दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल ?

श्री. विक्रम काळे : नोव्हेंबर महिन्याचे वेतन दिलेले आहे काय ?

श्री. विष्णू सवरा : सर्व शाळांतून नोव्हेंबर पर्यंतचे वेतन दिलेले आहे.

श्री. निरंजन डावखरे : माननीय मंत्री महोदय आणि माननीय राज्यमंत्री महोदय हे आदिवासी भागाचे प्रतिनिधीत्व करतात. त्यांच्या स्वतःच्या देखील आदिवासी आश्रमशाळा आहेत. आदिवासी शाळातील शिक्षक आणि कर्मचाऱ्याना वेळेवर वेतन मिळते का हे त्यांनी छातीवर हात ठेवून सांगावे. चंद्रपूर सारख्या दुर्गम भागामध्ये जेथे रेडिओ फ्रिक्वेन्सी  पोहोचत नाहीत, ज्या ठिकाणी इंटरनेटची सोय उपलब्ध नाही त्याठिकाणी वेळेवर वेतन मिळत नाही. ज्या अधिकाऱ्यांमुळे वेळेवर पगार मिळत नाही त्यांच्यावर कोणती जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे ?

श्री. विष्णू सवरा : या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार मिळत नव्हते कारण पगाराची पध्दत मॅन्युअल होती. अनेक लोकप्रतिनिधींनी याबाबतीत तक्रारी केलेल्या होत्या. आता सर्वांना 1 तारखेला पगार मिळेल.

..3..

डॉ. अपूर्व हिरे : धुळे पी.ओ. अस्थित्वात आल्यपासून तीन-चार महिने उशिरा पगार झालेले आहेत. बजेट प्रोव्हिजन नसल्यामुळे पगार उशिरा होतात असे उत्तर देण्यात येते. आता बजेट प्रोव्हिजन झालेली आहे. धुळे पी.ओ. मध्ये 1 तारखेला पगार देण्यात येतील काय ?

श्री. विष्णू सवरा : धुळे हा नवीन प्रकल्प झालेला आहे. काही तांत्रिक गोष्टीमुळे वेतन मिळण्यास विलंब झाला असेल. त्याबाबतीत चौकशी केली जाईल. यापुढे 1 तारखेला वेतन होईल याची खबरदारी घेतली जाईल.

श्री. श्रीकांत देशपांडे : अमरावती जिल्हयामध्ये धारणी प्रकल्प आहे. अतिशय दुर्गम भागात बिजूधावडे नावाचे गाव आहे. तेथे कधीच इंटरनेट पोहोचू शकणार नाही. तेथील लोकसंख्या 100 असेल. बैरागडची देखील तीच स्थिती आहे. मग ऑनलाईन सुविधा काय कामाची ? जेथे इंटरनेट पोहोचायला अजून 50 वर्षे लागणार आहेत अशा कार्यालयातील क्लार्कला तालुक्याच्या ठिकाणी येऊन सिस्टिम अपलोड करावी लागते. त्याला ते काम जमत नाही. पांढरकवडा विभागामध्ये दोन-दोन तीन-तीन महिने पगार होत नाहीत. मला सातत्याने फोन येत असतात. आदिवासी विभागामध्ये जेथे इंटरनेट पोहोचू शकत नाही त्या ठिकाणी ऑफ लाईनची व्यवस्था करुन पगाराची बिले 20 पर्यंत घेऊन 27 तारखेपर्यंत कर्मचाऱ्यांचे पगार बँकेत पोहोचविण्यात येतील काय ?

श्री. विष्णू सवरा : मी सांगितलेले आहे की, 1 तारखेला सर्व कर्मचाऱ्यांचे पगार देण्याची व्यवस्था केली जाईल. इंटरनेट द्वारे ते होत नसतील तर मॅन्युअली करता येतील.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बापर्डे (ता.मालवण) येथील धोकादायक पुलाची दुरुस्ती करणेबाबत**

**(७)** * **२१९३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्ट□□चा खुलासा करतील काय :-

(१) बापर्डे (ता.मालवण) येथील अतिशय जीर्ण झालेला पुल तो केव्हाही कोसळण्याचा धोका असूनही मुलांना शाळेत जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागते, तसेच वाहनांना जाण्या-येण्यास मोठा धोका वाढला असल्याचे माहे जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुलाची तातडीने दुरस्ती करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
सदर पूल एकपदरी असून जुना आहे. पुलाची दुरूस्ती पुल काही अंशी क्षतिग्रस्त झाल्याने करणे आवश्यक आहे. तथापि तातडीची उपाययोजना म्हणून अत्यावश्यक दुरूस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. पुल वाहतूकीस सुरक्षित आहे.
(२) व (३) उर्वरित दुरूस्तीचे कामे व या पुलाच्या ठिकाणी नवीन दुपदरी पूल बांधण्याचे काम निधी, निकष प्राथम्यक्रम व मंजूरीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : पूल काही अंशी क्षतिग्रस्त झालेला आहे, पूल वाहतुकीस सुरक्षित आहे असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. आज त्या पुलाची अवस्था अशी आहे की, पुलाच्या दोन्ही बाजूंना काठयांनी टेकू दिलेली आहेत. शाळा पुलाच्या पलीकडे असल्यामुळे विद्यार्थ्यांची वाहतूक त्या पुलावरुन सुरु असते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2193............ श्रीमती हुस्नबानू खलिफे.....

माझा प्रश्न असा आहे की, काठ्यांचा आधार दिलेला हा पूल सुरक्षित आहे का? या पुलाच्या दुरूस्तीचे काम सध्या सुरु नसनू ते केव्हा सुरु होणार आहे?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, हा पूल प्रश्नामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे मालवण तालुक्यात नसून देवगड तालुक्यामध्ये आहे. हा पूल दोन रस्त्यांना जोडणारा आहे. मुंबई-गोवा महामार्गाला जोडणारा रस्ता आहे. देवगड, निपाणी, विजयदूर्ग या ठिकाणी जाणारा रस्ता आहे. हा पूल 31 मीटर लांब व 4.5 मीटर रुंद आहे. माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे हा पूल तितका खराब नाही. मी प्रत्यक्ष हा पूल पाहून आलो आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांनी एखादी बाब सभागृहाच्या निदर्शनास आणली तर ती वस्तुनिष्ठ आहे असे समजून त्याकडे पहावयाचे आहे.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : हा पूल मी प्रत्यक्ष पाहिला असून माझ्याकडे त्याचे फोटो उपलब्ध आहेत. 15-20 दिवसात पुलाची दुरूस्ती होऊ शकते. कठडा तुटला आहे, त्याचे सिमेंटीकरण करावयाचे आहे. जी भीती व्यक्त केली तशी परिस्थिती नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्यामध्ये मोठया प्रमाणात दुष्काळ पडला असून जी परिस्थिती निर्माण झाली त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्याकरिता केंद्रीय पथक दोन दिवसाच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी दुष्काळी भागाची पाहणी करावी आणि राज्य शासनाने जी आर्थिक मदत केंद्र सरकारकडे मागितली आहे त्यापेक्षा अधिक रक्कम राज्य शासनाला केंद्र सरकारकडून मिळावी अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, या केंद्रीय पथकाने दोन दिवसांच्या काळात ज्या वेगाने दौरा केला तो विशेष लक्षात घेण्यासारखा आहे. रात्रीच्या वेळी विजेऱ्यांच्या सहाय्याने दुष्काळी भागाची पाहणी केली. शेतकऱ्यांनी सुचविलेल्या ठिकाणी पाहणी करण्यासाठी पथक केले नाही. या पथकाचा दौरा आटोपला असल्यामुळे नेमकी टंचाईची स्थिती काय आहे हे स्पष्ट झालेले नाही. एखाद्या वेळेला चुकीचा अहवाल केंद्र सरकारकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या केंद्रीय पथकाने माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या निदर्शनास आणले की, 2012 पेक्षा यंदाच्या दुष्काळाची स्थिती भयानक आहे. आणेवारीच्या संदर्भात 19 हजार गावांचा उल्लेख झाला होता. पुन्हा आणखी 7 हजार गावांचा त्यामध्ये समावेश झालेला आहे. म्हणजे 25 हजारपेक्षा जास्त गावांना दुष्काळाची झळ बसलेली आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता केंद्रीय पथक या विषयाबाबत खरोखरच गंभीर होते का? त्यानुसार त्यांनी पाहणी केली किंवा चुकीच्या पध्दतीने पाहणी केली असली तरी त्यांचे मत दुष्काळी भागातील लोकप्रतिनिधींना किंवा विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना अवगत होण्याकरिता माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याशी झालेल्या चर्चेच्या वेळी आम्हाला सहभागी करुन घेणे आवश्यक होते. म्हणजे केंद्रीय पथकाचे मत आम्हाला जाणून घेता आले असते. परंतु दुर्दैवाने तसे घडलेले नाही. या संदर्भात शासनाने खुलासा करणे आवश्यक आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यावेळी मी सभागृहात हजर नव्हतो, परंतु सभागृहात येत असताना मी त्यांचे भाष्य काही प्रमाणात ऐकले. त्यावरुन केंद्रीय पथकाने केलेल्या पाहणीच्या संदर्भात त्यांचा आक्षेप दिसून येतो. मी केंद्रीय पथकाचे अभिनंदन करतो. मी दिल्ली येथे जाऊन केंद्रीय मंत्री श्री.राधा मोहन, माननीय पंतप्रधान यांची भेट घेतली. त्यांना राज्यातील दुष्काळाची जाणीव करुन दिली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे............

मी भेटलो त्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी सांगितले की, उद्या काही माणसांना पाठवितो आणि 8 दिवसात पाहणी करण्यासाठी टीम पाठविण्यात येईल. मागील काळात राज्य सरकारकडून प्रयत्न करुनही एक-दीड महिन्यापर्यंत कोणी येत नव्हते. आपल्याला पाठपुरावा करावा लागत होता.....(अडथळा)... चुकीचे असेल तर दुरूस्त करा. मला रेकॉर्ड दाखवा. मी तुम्हाला त्या संदर्भात दुरूस्त करुन देईन. आज, उद्या, परवा किंवा महिन्यानंतर माहिती द्या. चुकीचे बोललो असेल तर मी सभागृहात दिलगिरी व्यक्त करायला तयार आहे. मी माहिती घेतली. मागील काळात आग्रह करुनही एक-एक महिना केंद्राची टीम येत नव्हती. मी दिल्लीला जाऊन भेटल्यानंतर दुस-या दिवशी काही प्रतिनिधी आले, पाहणी केल्यानंतर 8 दिवसांनी पूर्ण टीम आली. त्यांनी 10 जिल्हयांचा दौरा केला. अत्यंत कमी कालावधीत पाहणी करीत असताना अंदाज येतो. मी दौरे केले, तुम्हीही दौरे केले. साधारण अंदाज येतो. केंद्रीय पथकाकडे आमचा हाच आग्रह होता की, लवकरात लवकर केंद्र सरकारला अहवाल सादर करावा. त्या माध्यमातून जे काही पॅकेज द्यायचे आहे ते द्यावे.

श्री.माणिकराव ठाकरे : केंद्रीय पथक मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांना भेटले. परंतु महसूल मंत्र्यांना भेटले का?

श्री.एकनाथराव खडसे : होय. मलाही भेटले. तुम्हाला विचारुन मला भेटणार नव्हते. मला भेटले. ज्यावेळी केंद्रीय पथक आले त्यावेळी माझे सभागृहात भाषण सुरु होते. मला चिठ्ठी पाठविण्यात आली की, केंद्रीय पथक आले असून तुम्ही भेटायला या. माननीय मुख्यमंत्री बराच वेळ वाट पहात होते. या सभागृहात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला मी उत्तर देत होतो, त्यामुळे बैठकीला जाऊ शकलो नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांना निरोप दिला की, तुम्ही त्यांच्याशी चर्चा करावी, मी मागाहून येतो. माझे भाषण संपले तोपर्यंत त्यांची बैठक आटोपली होती. केंद्रीय पथक निघण्याच्या तयारीत होते. मी भाषण संपल्यानंतर त्वरेने गेलो आणि त्यांची भेट घेतली. तुम्ही त्यांच्याकडे विचारणा करु शकता. डिटेल चर्चा होऊ शकली नाही. माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुख्यमंत्र्यांशी त्यांची चर्चा झाली होती. माननीय मुख्यमंत्र्यांची भेट झाल्यानंतर माझ्याशी वेगळी भेट घेतली पाहिजे असे नाही.

...4..



श्री.माणिकराव ठाकरे : महसूल मंत्र्यांबरोबर बैठक झालेली नाही हे मला निदर्शनास आणून द्यायचे होते.

श्री.एकनाथराव खडसे : मी सांगू इच्छितो की, जेवढी आपल्याला आहे तेवढी आम्हालाही आहे. लवकरात लवकर केंद्रीय टीमने त्यांचा अहवाल सादर करावा. दुष्काळसदृश परिस्थिती केंद्र शासनाने मान्य केली आहे. या संदर्भात आम्ही पाठपुरावा करु, आपणही करावा. आपली मदत होईल. केंद्रीय पथक रात्रीच्या वेळी पाहणी करण्यासाठी गेले यापेक्षा त्यांनी प्रयत्न केले, सर्व ठिकाणी पाहणी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर आमचा प्रयत्न आहे की, पुढील आठवड्यात माननीय मुख्यमंत्री पंतप्रधानांची भेट घेतील. लवकर निर्णय व्हावा अशी आमची इच्छा आहे आणि तुमचीही आहे.

नंतर एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे : महोदय, मी एक औचित्याची सूचना आपणाकडे दिलेली आहे.....

**सभापती** : आपण दिलेली औचित्याची सूचना मी स्वीकारलेली नसल्याने त्यावर आपणास बोलता येणार नाही. यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती हुस्नबानू खलिफे यांनी औचित्याचा मुद्दा दिलेला आहे, तो त्यांनी मांडावा.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : महोदय, मी पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

"राज्यातील वंचित असलेल्या मुस्लीम समाजाला शासकीय, निमशासकीय सेवा आणि शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मुस्लीम समाजासाठी 5 टक्के आरक्षण देण्याबाबतचे आदेश अल्पसंख्यांक विभागाने दि. 19 जुलै, 2014 रोजी जारी केला होता. परंतु त्यासंदर्भातील विधेयक सभागृहात अद्याप मांडण्यात न आल्याने सदरचा आदेश रद्द होण्याची भीती निर्माण झाली आहे, त्यामुळे अल्पसंख्यांकांवर अन्याय होणार आहे. म्हणून राज्यातील वंचित मुस्लीम समाजाला शासकीय, निमशासकीय तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये 5 टक्के आरक्षण देण्याबाबतचे विधेयक सभागृहात मांडण्यात यावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मागणी करीत आहे.

श्री. सुनील तटकरे : महोदय, मराठा आणि मुस्लीम आरक्षणाच्या संदर्भात उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर शासन सर्वोच्च न्यायालयात गेले होते पण सर्वोच्च न्यायालयाने शासनाची याचिका फेटाळून लावताना पुन्हा उच्च न्यायालयात जावे असे म्हटले आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, मराठा व मुस्लीम समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न अत्यंत गंभीर आणि संवेदनशील असल्याने उच्च न्यायालयाने निर्णय देताना त्यावेळच्या कायद्यात ज्या त्रुटी दाखविल्या होत्या त्या त्रुटी दूर करुन एखादा नवीन कायदा आणण्याबाबत मंत्रिमंडळासमोर जाऊन याबाबतचा निर्णय तातडीने घ्यावा, जेणेकरुन या समाजाला दिलेले आरक्षण अबाधित राहील.

श्री एकनाथराव खडसे : महोदय, यापूर्वीच्या कायद्यातील त्रुटींच्या अधीन राहून न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिलेली असून शासन यासंदर्भात मंत्रिमंडळापुढे जाऊन या त्रुटींचा अभ्यास करील व त्य दूर करण्याचा जरुर प्रयत्न करीन.

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

----------

...........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. हेमंत टकले : महोदय, विधिमंडळाचे अधिवेशन मागील आठवड्यापासून सुरु झालेले आहे. गेली कित्येक वर्षे मेळघाटातील कुपोषणावर या सभागृहात चर्चा होत असते. आदिवासीबहुल मेळघाटात कुपाषणावर मात करण्यासाठी शासनातर्फे विविध योजनाही राबविल्या जातात परंतु तरी देखील मेळघाट परिसरात गेल्या 8 महिन्यात कुपोषणामुळे 303 बालमृत्यू झाले ही अत्यंत गंभीर बाब आहे. मेळघाटात एकूण 11 प्राथमिक आरोग्य केंद्रे असूनही हे मृत्यू रोखण्यात आराग्य खाते अपयशी ठरले आहे. त्याशिवाय दारिद्र्य, अज्ञान आणि अंध:श्रध्देचा फार मोठा पगडा आदिवासींवर आहे. अर्धपाटी रानू त्यांना जीवन व्यतित करावे लागते त्यामुळे जन्माला येणारे बाळ गर्भातच मृत पावते अथवा कुपोषित राहते त्यामुळे कुपोषणाचा विळखा अधिकच घट्ट होत चालला आहे, शासनाने याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी मी या औचित्याच्य माध्यमातून विनंती करीत आहे.

-----------

...........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विक्रम काळे : महोदय, मी पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे :-

"महोदय, वृक्ष हे जीवन झालेले आहे म्हणून वन विभागाच्या वतीने राज्यात वृक्ष लागवडीसाठी अनेक उपाययाजना केल्या जातात. कोटी वृक्ष, लक्ष वृक्ष अशा प्रकारे जाहिरातीवर सुध्दा लाखो रुपयांचा खर्च होतो. तरी सुध्दा या राज्यात किती वृक्ष आहेत, किती झाडे आहेत, त्यांची कोठेही नोंद वन विभागाकडे नाही. दरवर्षी हजारो वृक्षांची कत्तल केली जाते त्यामुळे ही वृक्षतोड थांबावी, त्यांचे संवर्धन व्हावे यासाठी ममदापूर-पाटोदा ता. अंबेजोगाई जि. बीड येथल वृक्ष मित्र अभियानाचे सामाजिक कार्यकर्ते श्री सुधाकर गुणवंतराव देशमुख गेली अनेक वर्षे शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. अनेक वेळा त्यांनी धरणे आंदोलनेही केली. 15 डिसेंबर, 2014 पासून सभागृहाच्या बाहेर ते आपल्या कुटुंबीयासह बेमुदत उपाषणास बसलेले आहेत. खरे तर त्यांचे हे काम राज्याच्या व राष्ट्राच्याही हिताचेच असल्याने शासनाने त्याच्य या त्यागाची दखल घेऊन व त्यांच्या मागणीचा विचार करुन माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी त्यांचे म्हणणे ऐकावे व त्यांचे उपोषण सोडण्याची विनंती त्यांना करावी."

------------

.........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मौ. पडम (ता. राहा, जि. रायगड) येथील पुनर्वसित गावांच्या निर्माण झालेल्या विविध समस्या

**मु.शी.**: मौ. पडम (ता. राहा, जि. रायगड) येथील पुनर्वसित गावांच्या निर्माण झालेल्या विविध समस्या याबाबत श्री. सुनील तटकरे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुनील तटकरे (विधानसभने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे पडम (ता.रोहे, जि.रायगड) येथील गट नंबर २, क्षेत्र २५-२९-० हेक्टर आर पैकी ७-००-० हेक्टर आर या जमिनीत महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हाधिकारी कुलाबा यांचेमार्फत ग्रामस्थांना जमिनी देण्यांत येणे, सदर जमिनीत ग्रामस्थांनी सन १९६२-१९६३ ते १९७७-१९७८ या कालावधीत बांधण्यात आलेली जुनी घरे असून गावठाण जमीन एकत्रिकरणाच्या चुकीमुळे वन खात्याच्या नावे दर्शविण्यात येणे, त्याच आधारे रेल्वे प्रशासनाने सदर बांधकामे पाडून टाकण्याची कार्यवाही सुरू करणे, सदर प्रकरणी ग्रामस्थांनी वेळोवेळी रेल्वे प्रशासन, महसूल विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार करुन हरकती नोंदविणे, महसूल उपविभागाने गावठांण जमिनी शासनामार्फत देण्यांत आल्या असून सदर बांधकामे रीतसर केलेली असल्याने नुकसान भरपाई देण्याचा अहवाल देऊनही नुकसान भरपाई न देता दिनांक २३ एप्रिल, २०१४ रोजी बांधकामे हटविण्याची नोटीस देण्यास येऊन बांधकामे न हटविल्यास बांधकामे पाडण्यात येतील अशा सूचना देण्यात येणे, त्यामुळे नागरिकांत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्य पती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्य असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------

18-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : महोदय, हे गावठाण सन 1962 सालात पूर आला त्यावेळेस नव्याने वसविण्यात आले असून पूर्वीच्या काळात प्रोटेक्ट फॉरेस्ट होते पण पूर आल्यामुळे या गावाचे पुनर्वसन करण्यात आले. त्यानंतर सन 1973 मध्ये याबाबतची शासकीय अधिसूचना काढून दोन हिश्यांमध्ये हे पुनर्वसन टाकण्यात आले. दुसऱ्या बाजूला एकत्रिकरण झाले तेव्हा दुसरा हिस्सा पहिल्या हिश्यात मर्ज करण्यात आला. यासंबंधीचे अर्ज अनेक वर्षे जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात प्रलंबित आहेत. .........

नंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

ही बाब अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. तेव्हा यासंबंधातील निर्णय घेण्यासाठी तातडीने आदेश देण्यात येणार आहे काय ? आपण निवेदनात नमूद केले आहे की, एकंदरीत 16 अधिक 6 अशी मिळून 22 घरे बाधित होत आहेत. आता या 22 घरांसाठी गावठाणांमध्ये जागा नाही. तेव्हा या 22 घरांना प्रचलित दराने मूल्यांकन देऊन नवीन गावठाणामध्ये पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, भूमिअभिलेख कार्यालयाच्या माध्यमातून लवकर मोजणी करण्यात यावी असा अर्ज आलेला आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, जागेची मोजणी झालेली आहे. फक्त शुद्धिपत्रासाठी बाब प्रलंबित आहे. आपणास फक्त मान्यता द्यायची आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शुद्धिपत्रक महिन्याभरामध्ये व्हावे अशी अपेक्षा आहे. परंतु, त्यास विलंब लागणार आहे. मी यासंबंधातील माहिती घेतली आहे. तरी पण तीन महिन्याच्या आत शुद्धिपत्रकाची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात येतील. ही सर्व पूरग्रस्त कुटुंबे आहेत. त्यामुळे त्यांना पुनर्वसनाचा कायदा लागू होत नाही. रोहा रेल्वे मार्ग हा नियोजित आहे. त्यात काही घरे विस्थापित होत आहेत. त्यांचे पुनर्वसन रेल्वे प्रशासनाने करावे असे त्यांना आपण सुचविणार आहोत. त्यासाठी आवश्यक ती मदत राज्य सरकारच्या माध्यमातून देखील केली जाणार आहे. जी घरे विस्थापित होणार आहेत अशा घरांचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया आपण सुरू केली आहे. हे मूल्यांकन झाल्यानंतर त्यांच्या घरांच्या किंमती देण्याबाबत रेल्वे प्रशासनाला आपण विनंती करणार आहोत. हे भूसंपादन आपण राज्य शासनासाठी करीत नसून रेल्वे मार्गासाठी करीत आहोत. त्यामुळे यासाठी लागणारा सर्व पैसा रेल्वे प्रशासनाने द्यावा अशा प्रकारच्या सूचना आपण करणार आहोत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मध्य रेल्वेसाठी राज्य सरकार भूसंपादन करीत आहेत ही बाब सत्य आहे. जो पर्यंत गावकऱ्यांचे पुनर्वसन होत नाही, त्यांच्या जमिनीचे मूल्यांकन होत नाही तो पर्यंत त्यांना निष्कासित करण्याची कारवाई करू नये अशा प्रकारच्या सूचना आपण देणार आहात काय ?

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी रेल्वे प्रशासनाशी चर्चा केली असताना त्यांनी ही घरे अनधिकृत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे आता ही बांधकामे शासनाला अधिकृत ठरावावी लागतील. पूर्वी ही जागा फॉरेस्टमध्ये येत होती नंतर ती डी-फॉरेस्ट करण्यात आली. त्यानंतर मग एकत्रिकरण करण्यात आले. रेल्वेच्या हद्दीत चाळीस मीटर पर्यंत बांधकाम नसावे असा नियम आहे. त्यानंतर हे बांधकाम 39 मीटर पर्यंत आले. तेव्हा या सर्व त्रुटी दूर करून या घरांना न्याय देण्यात येईल. प्रसंगी राज्य शासनाच्या माध्यमातून त्यांना मदत देखील करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रेल्वे येण्या आधीपासूनच तेथे वस्ती, गावठाण होते. त्यावेळी फॉरेस्ट ॲक्ट देखील लागू नव्हता. पनवेल ते रोहा रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण करण्यात येत आहे. पण हे काम या गावामुळेच अडलेले आहे. तेव्हा तातडीने यासंबंधातील काम करून पनवेल ते रोहा दुहेरी मार्गाचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी शासन त्याकडे गांभीर्याने लक्ष देणार आहे काय?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, यासंबंधी शासन गंभीर आहे. तत्कालीन माननीय पालकमंत्र्यांनी देखील यासंबंधी बैठका घेतल्या होत्या. रेल्वे प्रशासनाचे म्हणणे आहे की, हे बांधकाम अनधिकृत आहे. आमच्या परवानगीशिवाय ते आमच्या हद्दीत करण्यात आले आहे. ते आधी नव्हते. फॉरेस्टचे डी-फॉरेस्ट झाले या सर्व गोष्टींचा विचार आधी झालेला आहे. हा मार्ग लवकर पूर्ण होऊन रेल्वेचे काम व्हावे म्हणून आम्ही स्वत: त्यामध्ये पुढाकार घेतला घेऊ.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हे 1962 सालातील पुनर्वसित गाव आहे. रेल्वे मार्ग करण्याचा निर्णय 1972 नंतर करण्यात आला. त्यामुळे हे गावठाण आणि घरे ही अगोदरची आहेत. त्यामुळे ही बांधकामे अनधिकृत आहेत हे ठरविण्याचा अधिकार रेल्वे प्रशासनाला नाही. शेवटी राज्य सरकार भूसंपादन हे रेल्वे मार्गासाठी करीत आहे. त्यामुळे हे बांधकाम अधिकृत असल्याचे शासनाने मान्य करावे. त्यांचे पुनर्वसन करून त्यांना मोबदला दिल्यानंतर मग हा रेल्वे मार्ग तातडीने करावा व त्यासाठी लागणारे 100 टक्के सहकार्य देखील आमच्याकडून करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, यासंबंधातील सर्व कायदेशीर बाबी तपासून घेण्यात येतील. प्रसंगी माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना देखील बैठकीसाठी बोलाविण्यात येईल. सध्या ही बाब न्याय प्रविष्ट आहे. पुढील आदेश होईपर्यंत अतिक्रमण निष्कासित करू नये अशा प्रकारचे आदेश कोर्टाने दिलेले आहेत. त्या आधी निर्णय होण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात येतील.

........

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण लगेचच लक्षवेधी घेतली. तथापि, कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्याचे राहून गेले आहे. ते कामकाज आता घेण्यात येईल.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील (विधी व न्याय विभाग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार (वने मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती मी आपल्या अनुमतीने कोकण विकास महामंडळ मर्यादितचा सन 2010-2011 व 2011-201 या वर्षाचा चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा दिनांक 31 मार्च् 2013 रोजी संपलेल्या वर्षाचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.प्रविणे पोटे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा सन 2013-2014 या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजकुमार बडोले (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2006-2007,2007-2008, व 2008-2009 या वर्षाचा अनुक्रमे तेहेतीसावा, चौतीसावा, पस्तीसावा वार्षिक अहवाल मांडतो. सदर अहवाल मांडायला विलंब झाल्याबद्दल मी दिलगीरी व्यक्त करीत आहे.

उप सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

.......

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल
सादर करणे व संमत करणे.

श्री.रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 19 डिसेंबर, 2014 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता बुधवार, दिनांक 17 डिसेंबर, 2014 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनीटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यापैकी 13 अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ आणि 4 विधेयके विचारार्थ असून त्यांना खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा अशी शिफारस समितीने □ली आहे.

<u>पुर:स्थापनार्थ</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 11 -मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2014 श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 2. | सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 12 -महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, 2014 श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 3. | सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 13 -बियाणे (सुधारणा) विधेयक, 2014 श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 4. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 14 - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक,2014 -श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 5. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 15 -कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2014- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 6. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 16 - महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 7. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 17 - मुंबई दारुबंदी (सुधारणा) विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 8. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 18 - हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2014 - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 9. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 19 - महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, 2014- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | 30 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |
| 10. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 20 - भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 11. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 21 - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 12. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 22 - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |
| 13. | सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 23 - बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) महाराष्ट्र सुधारणा विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. | |



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके विचारार्थ

| | | |
|---|---|---|
| 1. | सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, 2012 - श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांचे. | - 30 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |
| 2. | सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, 2011 - श्री.विजय सावंत, वि.प.स. यांचे. | - 30 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |
| 3. | सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2014 - श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे. | - 30 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |
| 4. | सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, 2013 - श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांचे. | - 30 मिनीटांपेक्षा जास्त नाही. |

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय,अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, अस मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अधिवेशनाचा शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाजाचा असतो. गेल्या आठवडयात देखील अशासकीय कामकाज झाले नव्हते. तसेच या अगोदरच्या अधिवेशनातही अशासकीय कामकाज झाले नव्हते. नवीन सरकारने कामकाज सुरु केले असून या ठिक्राणी सभागृहाचे उप नेते सुध्दा उपस्थित आहे. सभागृहाचे उप नेते विरोधी पक्षात होते तेव्हा ते सुध्दा अशासकीय कामकाजाचा आग्रह धरत होते. कामकाज सल्लागार समिती सभागृहाच्या वतीने कामकाज करीत असते. सभगृह अंतिम आहे. त्यामुळे उद्याचे कामकाज अशासकीय कामकाजच असले पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उप सभापती** : आजच्या दिवसाचे कामकाज संपण्यापूर्वी अशासकीय कामकाजाच्या संदर्भात निर्णय घेण्यात येईल. आता नियम 93 अन्वयेच्या सूचना घेण्यात येतील.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : माझ्ययाकडे गुरुवार दिनांक 18 डिसेंबर, 2014 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सहसचिव वाचून दाखवतील

उप सचिव : गुरुवार दिनांक 18 डिसेंबर, 2014 रोजीच्या सूचना :-

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी " महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटीव्ह लि.बँक मुंबई या शिखर संस्थेवर प्रशासक मंडळ कार्यरत असणे, बँकेमार्फत शेतकऱ्यांना कर्ज वेळीच न मिळणे, वार्षिक सर्वसाधारण सभेस प्रशासक मंडळाचे प्रमुख गैरहजर राहून राज्यातील सभासदांना व शेतकऱ्यांना अपमानित करत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर

सदस्य श्री. आनंद ठाकूर यांनी "अन्न व औषध प्रशासनाच्या अनागोंदी गैरकारभारामुळे पालघर जिल्ह्यातील वसई, विरारमध्ये पिण्याच्या पाण्याच्या बोगस कंपनी अशुध्द पाणी विकत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी "सामाजिक न्याय विभागाकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागास जातीच्या मुलांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती जाहिर करणे, केंद्र शासनाने जुलै, 2014 पासून सुधारित दराप्रमाणे शिष्यवृत्ती देण्याबाबत राज्य सरकारला निर्देश दिलेले असूनही राज्यात जुन्या दराप्रमाणेच शिष्यवृत्ती दिली जात असल्याबाबत शासनाकडून मागास जातीच्या विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी "केंद्र सरकारने अर्थसंकल्पात महाराष्ट्रात देशात पाच इंडियन इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट (I I M) संस्था उभारणार असे जाहिर करणे, औरंगाबाद येथे जागा व विद्यापीठाची इमारत प्रशासनाने पाहणी करुन सकारात्मक अहवाल शासनाकडे

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाठविलेला असताना औरंगाबाद (I I M) संस्था उभरण्यासाठी होत असलेल्या दिरंगाईबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सदस्य श्री. अनिल भोसले यांनी "केंद्र शासनाने एकच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व राजीव आवास योजनेतंर्गत गृहनिर्मिती योजना राबविली जात असणे, पुणे शहरात साडेपाचवर्षाहून अधिक झोपडपट्टया असून पुनर्वसन योजना राबविण्यासाठी प्रशासनाकडे 200 प्रस्ताव आलेले असून 162 प्रकल्पांचे काम सुरु असून या योजनेस 8 वर्षाहून अधिक काळ विलंब लागत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी " मिरा-भाईंदर शहराची झपाट्याने वाढत असलेली लोकवस्ती व त्याचबरोबर गुन्हेगारीत मोठ्याप्रमाणात वाढ होत असल्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नविन पोलीस स्टेशन बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सदस्य श्री.संजय दत्त यांनी "नागपूर मधील कपिलनगर येथील महानगरपालिकेच्या हिंदी उच्च प्राथमिक शाळेच्या आवारात दिनांक 17 डिसेंबर, 2014 रोजी एका बालकाचा मृत्यू होणे सदरहू भिंत निष्कृष्ट्य बांधकामामुळे तसेच बांधकाम अभियंत्याचा सल्ला न घेता बांधण्यात आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी "भंडारा येथील जिल्हा रुग्णालयातील प्रसुती वार्ड मधील महिलांकरीता बेडची होत असलेली कमतरता त्यामुळे महिला रुग्णांची होत असलेली कुचंबना तसेच सीटीस्कॅन मशीन, एमआरआय वेंटीलेटर मशीन बंद असल्याबाबत. " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---

**पृ. शी./ मु.शी.** :सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंत्यांना सन 2011 पासून पदोन्नतीपासून वंचित ठेवणे याबाबत श्री.सतिश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. चंद्रकांत पाटील ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 12 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतिश चव्हाण : सभापती महोदय, अधिक्षक अभियंत्यांची 70 पैकी 40 पदे रिक्त आहेत. मुख्य अभियंत्यांची 8 पदे रिक्त आहेत, एका एका अभियंत्याकडे 4-4 पदाचा चार्ज दिला गेला आहे. औरंगाबाद शहरला मागील दोन वर्षापासून मुख्य अभियंता नाही. औरंगाबादचा चार्ज मुंबईच्या अभियंत्याकडे असल्याची माहिती मिळालेली आहे. यासंदर्भात उच्च न्यायालय व मॅटमध्ये यासंदर्भात मोठया प्रमाणात केसेस आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामावर पदे रिक्त असल्यामुळे परिणाम होतो आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, कोर्टाच्या निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नत्या त्वरित दिल्या जातील काय ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या सूचनेचे उत्तर वाचून ज्याला कळेल त्याला मी बक्षिस देईन. हा विषय अत्यंत कठीण आहे. गेल्या 14 वर्षापासून पदोन्नतीच्या संदर्भात विभागाने घेतला की, त्याला स्थगिती दिली जाते. कार्यकारी अभियंता या पदावरुन अधीक्षक अभियंताच्या पदाची ज्येष्ठता सूची तयार करुन पब्लीश केली की, पाच युनियन पैकी कोणी तरी कोर्टात जातो. कोर्टाने निर्णय दिला की, दुसरी एखादी संघटना मॅटमध्ये जाते. या क्षणाला हा विषय न्याय प्रविष्ठ आहे. खात्याच्या कामावर यामुळे परिणाम होतो आहे याची मला माहिती आहे. न्याय प्रविष्ठ निर्णय असल्यामुळे आपण निर्णय घेऊ शकत नाही परंतु तरीही माझे पाचही युनियनबरोबर चर्चा सुरु आहे. जानेवारी महिन्यात प्रत्येक युनियनच्या एका पदाधिकारी असे पाचही युनियन बरोबर मी बैठक घेणार असून त्यात मार्ग काढून केसेस विड्रॉ केल्या तर प्रमोशन्स दिली जातील असा निर्णय घेणार आहे.

श्री. सतिश चव्हाण : सभापती महोदय, माननीय श्री. भुजबळ साहेबांनी पाचही युनियनला बोलावून चर्चा केली होती परंतु तरी देखील हा प्रश्न सुटला नव्हता. आपण या पाचही युनियनला बोलावून चर्चा केली तरी सुध्दा हा प्रश्न सुटणार नाही. त्यांचे एकमत कधीही होणार नाही. कोर्टामध्ये केसेस जात असतील तर शासनाने राज्यकार करावयाचा नाही काय ? त्यामुळे कोर्टाला यासंदर्भातील सद्य:स्थिती सांगून आम्ही काम कसे करावे यासंदर्भात तुम्हीच निर्णय द्यावा अशी विनंती केली तर हा प्रश्न सुटू शकेल असे मला वाटते. यासंदर्भात त्वरित निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न खूप गंभीर आहे. आता न्यायालयात जी केस आहे त्या केसला स्टे मिळाला नाही. या केसची आता सुनावणी सुरु आहे. त्यामुळे याचा आधार घेऊन जानेवारी महिन्यात यासंदर्भात धाडसी निर्णय घेऊन अधिकाधिक लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न करु. ज्या काही अडचणी आपल्या समोर येतील त्याला तोंड देण्याची तयारी ठेवू एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना एकच विनंती आहे की, कोर्टाच्या अधिन राहून याबाबतीतील निर्णय त्वरित होऊ शकतो काय ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सभागृहाने मॅटच्या संदर्भात गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. कोर्टाने एकदा निर्णय दिला की, त्या निर्णयाच्या विरुध्द लोक मॅटमध्ये जात असतात. सरकारी कर्मचाऱ्यांठी ही जी दुहेरी न्याय व्यवस्था आहे त्याबाबत आपण हतबल आहोत.

श्री. सतिश चव्हाण : सभापती महोदय, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, एक न्यायालय असेल तर बाब वेगळी परंतु या ठिकाणी दोन न्यायालय आहे. न्यायालयाने निर्णय दिला की, त्या निर्णयाला मॅटमध्ये अपिल केले जाते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

हा प्रश्न फक्त सार्वजनिक बांधकाम विभागापुरता मर्यादित नाही तर सर्व विभागांमध्ये हा प्रश्न निर्माण झालेला आहे. मॅटची रचना कधी झाली, ते केव्हा आले, का आले, ?

**उप सभापती** :आपण मॅट रद्दबातल करणार होतो ना ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपण सरकारच चालविताना हैराण आहोत. आपण या विषयावर जरूर विचार केला पाहिजे. अन्य लोकांसाठी एक न्यायालय असताना या लोकांना ॲडीशनल न्यायालय कशासाठी ? तेव्हा आपण या बाबतीत गांभीर्याने विचार केला पाहिजे.

**उप सभापती** : यामध्ये एक महत्वाचा प्रश्न आहे की, न्यायालयाच्या स्थाने सरकारला एक समांतर व्यवस्था निर्माण होत आहे काय ? कारण शासनाने घेतलेल्या निर्णयाला त्यांचा स्टे आणि मग आपणास आम्ही हतबल आहोत अशी उत्तरे द्यावी लागतात. त्यामुळे पूर्ण राज्य कारभार थंडावतो. माझ्या अनुभवाने सांगतो की, आपण या संदर्भात केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्याकडून मार्गदर्शन घ्यावे. He is the best judge.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, या संदर्भात जानेवारी महिन्यात निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून जानेवारी महिन्यात निर्णय घेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी हतबलतेने उत्तर दिलेले आहे. ज्याला पदोन्नती मिळत नाही तो न्यायालयात जात नाही, परंतु ज्याच्याकडे चार्ज दिलेला आहे तो न्यायालयात जातो. कारण त्या संबंधित व्यक्तीला पदोन्नती दिली तर त्याच्याकडील चार्ज जाईल. तेव्हा आपल्याकडे चार्ज राहण्यासाठी अनेक अधिकारी मॅटमध्ये जातात. आपण हतबल आहोत असे म्हणून चालणार नाही. हतबल हा शब्द कामकाजातून काढून टाकला पाहिजे. आपल्याकडे काम सुरळीतपणे चालू राहण्यासाठी अभिनवत पदोन्नती देण्याची पद्धत आहे. जानेवारी महिना संपण्यापूर्वी जे कोणी पदोन्नतीसाठी पात्र असतील त्यांना अभिनवत पदोन्नती देणार काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपणास वाटत असेल तर आपण हतबल शब्द कामकाजातून काढून टाकावा. मी चळवळीतून आलेलो कार्यकर्ता आहे. एखाद्या गोष्टीबाबत सरकारने उसणे अवसान आणण्याची गरज नाही असे मला वाटते. कारण जी वस्तुस्थिती आहे ती मी सांगितलेली आहे. मागील 10-12 वर्षे निर्णय झालेला नाही. आपण त्याबाबत काही करु शकत नाही ही हतबलता आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे न्यायालयाच्या अधीन राहून जानेवारी महिन्यामध्ये निर्णय घेण्यात येईल. पुन्हा त्याच्या विरुध्द कोर्टकचेऱ्या चालू राहतील.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, वेगवेगळ्या न्यायालयाच्या वेगवेगळ्या ऑर्डसमुळे आम्ही हतबल आहोत. परंतु आपण ज्युडिशिअल हायरारकीचे प्रिन्सिपल अप्लाय केले तर उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द मॅट निर्णय देऊ शकत नाही. MAT is not an Appellate Authority against the decision of the High Court. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी जी माहिती दिली ती माझ्या मते चुकीची आहे. तेव्हा त्याबाबत मंत्री महोदय विचार करतील काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, जी वस्तुस्थिती आहे ती मी सांगितलेली आहे. या विषयाचा गुंता सोडविण्यासाठी सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर हे खूप मोठे विधिज्ञ असल्यामुळे त्यांची मदत घेण्यात येईल.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नागपूर येथील गणेशपेठ पोलीस स्टेशनच्या कोठडीत पोलिसांच्या ताब्यातील एका आरोपीचा पोलिसांनी केलेल्या मारहाणामुळे झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री सुनील तटकरे व हेमंत टकले वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.रणजित पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 17 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, गुन्हेगाराकडून गुन्हा कबूल करण्यासाठी पोलिसांकडून ज्या पद्धतीचा वापर केला जातो त्या पद्धतीबाबत शंका निर्माण करणारी ही घटना आहे. निवेदनात नमूद केले आहे की, अटकपूर्व तपासणी झाली होती. अटकपूर्व तपासणी ही फक्त शरीरावर जखमावर आहेत किंवा नाहीत एवढ्या पुरता मर्यादित होती की अटक झालेल्या आरोपीला इतर कोणता आजार आहे याची तपासणी झाली होती काय ? आरोपीला फिटस येत होत्या असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. त्याच्या आजाराची काही हिस्ट्री होती काय ? अशाप्रकारची तपासणी करणे त्यावेळी शक्यही नसेल. मारलेल्याच्या जखमा शरीरावर नाहीत अशापद्धतीचा उल्लेख या निवेदनात आहे. अटकेत असताना मृत्यू झाल्यामुळे राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या निर्देशाप्रमाणे प्रेताचा पंचनामा करुन शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदन अहवाल व रासायनिक परीक्षण अहवाल अद्याप अप्राप्त आहे. मृत्युचे कारण "Chronic alcoholic with alcoholic withdrawal syndrome with delirium tremens." म्हणजे मारहाणीमुळे मृत्यू झालेला नाही हे सिद्ध करण्याच्या गडबडीमध्ये निवेदनामध्ये विरोधाभास दिसून येतो. तेव्हा या संदर्भातील वस्तुस्थिती पुन्हा एकदा तपासण्यात यावी. गुन्हा कोणता आहे आणि त्यासाठी अटक होणे किंवा न होणे हा मुद्दा वेगळा आहे. अटकेत असताना मृत्यू होण्यामागे काय कारणे आहेत, त्याबाबत पोलीस यंत्रणा काय करीत आहे, चुकीच्या पद्धत्‌ीचा परिपाठ होत असेल तर ते थांबविणे आवश्यक आहे कारण ही एक प्रकारची हत्याच आहे. आताच्या केसमध्ये जे समोर आले आहे ते लक्षात घेऊन या प्रकरणाची पुन्हा फेरतपासणी करुन त्या संदर्भातील अहवाल वरिष्ठांकडून घेऊन त्याबाबतची माहिती मंत्रीमहोदय सभागृहाला देतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, नागपूर येथील गणेशपेठ पोलीस स्टेशनच्या कोठडीत आरोपीचा झालेला मृत्यू या संदर्भातील नियम 93 अन्वये सूचना उपस्थित करण्यात आली होती त्या संदर्भातील निवेदन दिलेले आले. या प्रकरणामध्ये पोलिसांनी धाड टाकून दोघा भावांना रंगेहाथ पकडण्यात आले होते. आरोपील 9 तारखेला जीपमधून नेत असताना त्याला फीटस आल्या म्हणून त्याची तपासणीकरिता त्याला इंदिरा गांधी रुग्णालयात नेण्यात आले. त्याची तब्बेत खराब झाल्यामुळे त्याला रुग्णालयात भरती करण्यात आले. मी त्या आरोपीचे सर्व पेपर्स पाहिले आहेत,

..5..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

बेडहेड तिकिट पाहिले आहे. प्रोसिजर अशी आहे की, एखादा पेशंट ओपीडीला गेला तर प्रथम रेसिडन्ट डॉक्टर त्याची तपासणी करतो. त्याच्या फायन्डींग्ज पेपरवर लिहितो. त्यांनतर तो लिहून देतो की, "रिफर टू सो ॲन्ड सो डॉक्टर." त्या आरोपीला फीट आल्यामुळे त्या आजाराच्या तज्ज्ञ डॉक्टरकडे त्याला रिफर करण्यात आले होते. त्या संदभातील सर्व नोटस मी पाहिल्या आहेत. त्यानंतर तो पेशंट इनडोअर होतो. सदर घटना 9 तारखेची आहे. आरोपीचा मृत्यू 13 तारखेला झ ाालेला आहे. त्याचे संपूर्ण केसपेपर्स मी पाहिलेले आहेत. आरोपीच्या अंगावर कोणत्याही प्रकारच्या जखमा असल्याचे नमूद केलेले नाही. एका डॉक्टरकडून चूक होऊ शकते, परंतु सहा डॉक्टर्सकडून काही ना काही रिमार्कस लिहिले जातात आणि ते पेपरवर येतात. त्या आरोपीला तिसऱ्या दिवशी आयसीयुमध्ये देखील शिफ्ट करण्यात आले होते. त्याच्या पोटात दुखायचे त्याला उलट्या होत होत्या, चक्कर येत होती, ही सर्व लक्षणे दारु पिणाऱ्या व्यक्तीची आहेत. कोणत्याही दारु पिणाऱ्या रुग्णाला दारु नसेल तर काहीही सूचत नाही. मग तो कोणाच्याही अंगावर काहीही फेकून मारु शकतो, तो नातेवाईकांना ओळखत नाही. पण त्याला दारु मिळाली की सर्व शांत होते. त्या आरोपीचा पाचव्या दिवशी मृत्यू झालेला आहे. त्या आरोपीला मारहाण झाली असती तर त्याचे वळ दिसले असते. सूज आलेली दिसली असती. तेव्हा पोलिसांनी आरोपीला मारहाण केल्यामुळे त्याच्या मृत्यू झाला आहे ते लपविण्यासाठी त्याचा पुरावा नष्ट केलेला आहे असे काहीही झालेले नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ AKA/ ST/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:50

डॉ.रणजित पाटील....

त्यानंतर त्याचे पोस्टमार्टेम झाले. त्याचे नमुने तपासणीसाठी आज दिलेले आहेत. जो काही प्रोव्हीजनल रिपोर्ट यायचा तो येईल . त्याचे केमिकल ॲनॅलेसिस होईल. त्याचे इन्टेस्टाईन आणि गट प्रिझर्व्ह केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. कारण बऱ्याच वेळा ते जे म्हणतात तसे होते. पण या प्रकरणाचा मी सविस्तर अभ्यास केला आहे. मला वाटते सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत तसे या प्रकरणात झालेले नाही.

ॲड.राहुल नार्वेकर : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरात आणि लेखी निवेदनात विसंगती आहे. त्यांनी सांगितले की, सदरहू व्यक्तीला जीपमधून घेऊन जाताना त्याला फीट्स आल्या. म्हणून त्याला मेडीकल एक्झामीनेशनसाठी नेण्यात आले. मला वाटते या बाबतचे रेकॉर्ड तपासायला पाहिजे. ज्यावेळी प्री अरेस्ट मेडीकल एक्झामीनीएशनसाठी त्याला नेण्यात आले त्यावेळी तो अल्कोहोलीक आहे की नाही हे त्याच्या मेडीकल एक्झामीनेशनवरुन कळते. जर तो अल्कोहोलीक होता तर विड्रॉल सिंम्टम्स् येणार हे माहीत होते. मग याबाबतीत काळजी का घेतली गेली नाही ? आरोपीला फीटस् आल्या असतील तर निश्चितपणे त्याला रुग्णालयात दाखल केले असेल. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, आरोपीला फीट आल्यापासून ते रुग्णालयात नेईपर्यंत किती वेळ वाया घालविला, त्याला फीट आल्यानंतर वेळीच वैद्यकीय सुविधा पुरविल्या काय ?

डॉ.रणजित पाटील : महोदय, फीट आल्यानंतर त्या व्यक्तीला रुग्णालयात नेण्यात आले. त्या फिटस् या लाईफ थ्रेटनिंग नव्हत्या.. त्यामुळेच तो पाच दिवस जगला.

**उप सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या ठिकाणी निवेदनावर प्रश्नोत्तरे होत आहेत. न्यायालयात जशी नियमित कोर्ट केस चालते तसे सुरु नाही.

डॉ.रणजित पाटील : महोदय, व्यक्तीला फीट येणार असल्यामुळे त्याला अगोदर तपासणीसाठी न्यायला पाहिजे हे माहीत नसते.

श्री.प्रकाश गजभिये : महोदय, ही नागपूर येथील कस्टडी डेथची घटना असून ती अत्यंत गंभीर आहे. ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला ते कुटुंब गरीब आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, आरोपीला अटक केल्यानंतर त्याच्या भावाचा गुन्हा नसताना, त्याला सुध्दा अटक करुन पोलीस

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

स्टेशनमध्ये का नेण्यात आले ? या प्रश्नाला मिळालेल्या उत्तरानंतर मी दुसरा प्रश्न विचारीन.

**उप सभापती** : निवेदनावर एकच प्रश्न विचारता येतो. दुसरा प्रश्न विचारता येणार नाही.

श्री.प्रकाश गजभिये : महोदय, एका गरीब कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. वेळीच वैद्यकीय सुविधा न पुरविल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे त्याचे कुटुंब जीवन जगू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. त्याचा कस्टडीमध्ये मृत्यू झाल्यामुळे ते कुटुंब पूर्णत: हादरले आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना शासनातर्फे आर्थिक मदत करण्यात येईल काय ? असल्यास, ती किती दिवसात करण्यात येईल ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, घटनेच्या ठिकाणी धाड टाकल्यानंतर तेथे आरोपीचा भाऊ सुध्दा सापडल्यामुळे त्याला पोलीस स्टेशनमध्ये नेणे क्रमप्राप्त होते. आरोपीला वैद्यकीय सुविधा वेळेवर मिळाल्या नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी पुन्हा एकदा सांगतो की, त्या आरोपीला रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याच्यावर चार दिवस उपचार करण्यात आले, त्याला आयसीयु मध्ये सुध्दा शिफ्ट करण्यात आले आणि नंतर आयसीयुतून बाहेर काढण्यात आले. त्यामुळे आरोपीवर योग्यप्रकारे वैद्यकीय उपचार झाले नाहीत म्हणून त्याचा मृत्यू झाला असे म्हणणे योग्य होणार नाही.

**उप सभापती** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील. आता मी लक्षवेधी सूचना क्रमांक-1 पुकारतो.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मी आपले आभार व्यक्त करतो. कारण गेल्या 10 वर्षात नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेच्या निवेदनावर प्रश्न विचारण्यासाठी आपण खूप वेळ दिला. एवढा वेळ आपण 93 च्या निवेदनावर प्रश्न विचारण्यासाठी कधीही दिला नाही.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, तो आरोपी दारु....

**उप सभापती** : गरीब व्यक्ती दारु प्यायली काय आणि श्रीमंती व्यक्ती दारु प्यायली काय, तो दारु पिणाऱ्याचा दोष आहे. मला वाटते या विषयी माननीय मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले आहे.

श्री.प्रकाश गजभिये : महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले नाही. त्यांच्या उत्तराने आमचे समाधान झाले नाही.

..3..



SJB/ AKA/ ST/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, तुमच्या समाधानासाठी सभागृह नाही.

श्री.प्रकाश गजभिये : महोदय, ज्या वेळी त्या आरोपीला अटक करण्यात आली त्यावेळी तो दारु प्यायलेला नव्हता. मी पुन्हा एकदा मागणी करतो की, त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना शासन आर्थिक मदत....

**उप सभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.56 वाजता 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

--------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण आम्हाला नियम 93 च्या सूचनांवर बराच वेळ बोलण्यास संधी दिली. सभागृह स्थगित होण्यापूर्वी जे काही घडले त्या संदर्भात मी दिलगिरी व्यक्त करतो.

**उप सभापती** : आता लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. लक्षवेधी सूचना क्रमांक 1

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अकोला महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या इमारती, बैठी घरे, दुकानदार, हॉटेल्स इत्यादींकडे भोगवटा प्रमाणपत्रांची मागणी करण्यात येणे.

**मु.शी.** : अकोला महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या इमारती, बैठी घरे, दुकानदार, हॉटेल्स इत्यादींकडे भोगवटा प्रमाणपत्रांची मागणी करण्यात येणे यासंबंधी श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोला महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या इमारती, बैठी घरे, दुकानदार, हॉटेल्स आदिंकडे भोगवटा प्रमाणपत्रांची होत असलेली मागणी, सदर मागणी करण्यापूर्वी यासंदर्भात पूर्वसुचना न देता करण्यात येत असलेली कारवाई, दुकानदार व हॉटेल्स मालकांनी पालिकेच्या अटी शर्तीनुसार लागणारी सर्व महत्वाची प्रमाणपत्रे घेतलेली असतानांही अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व इमारतींकडे भोगवटा प्रमाणपत्राची तसेच दुकान व हॉटेल मालकाकडून विविध प्रमाणपत्रांची मागणी होणे, भोगवटा प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता रात्री-अपरात्री जाऊन कारवाई करुन त्यांच्याकडून दंड वसुल करण्यात येणे व काही हॉटेल्स सील करण्यात येणे, अकोला महानगरपालिका स्थापन होऊन 40 वर्षाचा कालावधी उलटला असून अशाप्रकारे भोगवटा प्रमाणपत्राची मागणी यापूर्वी करण्यात आलेली नसताना अचानक मागणी केल्यामुळे स्थानिक रहिवाशी, दुकानदार, हॉटेल मालक यांच्यात पसरलेले असंतोषाचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया ....

लक्ष घालून भोगवटा प्रमाणपत्रासाठी काही कालमर्यादा ठरविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदनानंतर)

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, सदर प्रश्न अकोला महानगरपालिकेकडून मागितल्या जाणाऱ्या भोगवटा प्रमाणपत्रांबद्दल आहे. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिलेले आहे की, अकोला शहराचे मूळ हद्दीतील क्षेत्राकरिताची विकास योजना दिनांक 26.10.2004 अन्वये अंशत: मंजूर झाली आहे. मूळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राकरिता ड वर्ग महानगरपालिकेची बांधकाम व विकास नियंत्रण नियमावली दिनांक 28.03.2008 नुसार लागू करण्यात आली आहे. मला हे मान्य आहे. परिच्छेद 2 मध्ये दिले आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 44 व 45 अन्वये महानगरपालिकेचे आरंभ प्रमाणपत्रामध्ये भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेतल्याखेरीज इमारतीचा वापर करता येणार नसल्याची अट नमूद करण्यात आली आहे. हेही मान्य आहे. पुढे असे दिले आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 267 अ(1)(अ) नुसार बांधकाम परवानगी न घेता किंवा बांधकाम परवानगीतील शर्तीचे उल्लंघन केल्यास मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती भरावी लागते. हे सुध्दा मान्य आहे. परंतु, परिच्छेद क्रमांक 3 मध्ये दिले आहे की, महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रकारच्या बांधकामासाठी भोगवटा प्रमाणपत्राची मागणी अचानक करता आली असे म्हणता येणार नाही. अकोला महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये 40 वर्षांपूर्वी जुने बांधकाम झालेल्या इमारती आहेत. त्यामध्ये लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. जे लोक 40 वर्षांपासून इमारतीमध्ये राहत आहेत त्यांना अचानक भोगवटा प्रमाणपत्र, कम्प्लिशन सर्टिफिकेट मागणे ठीक आहे का ? अशा स्थितीत लोकांमध्ये नैराश्येची भावना निर्माण झाली आहे, ते सातत्याने नगरसेवकांकडे, आमदारांकडे विचारणा करीत आहेत की, 40 वर्षापूर्वीचे भोगवटा प्रमाणापत्र आम्ही कसे देणार ? अशा परिस्थितीत उपायुक्त, नगरसेवक, आमदार यांच्यामध्ये असमन्वय निर्माण झालेला आहे. नगरसेवकांनी उपायुक्तांची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये करायची, उपायुक्तांपी नगरसेवकांची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये करायची असे चालले आहे. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. विकास नियंत्रण नियमावली, 2008 लागू करण्यात आली आहे, त्या पूर्वीच्या भोगवटा प्रमाणापत्राची अट शिथिल करणार का आणि नगरसेवक व उपायुक्त यांच्यामध्ये

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया ....

ज्या पोलीस तक्रारी सातत्याने सुरू आहे, बदली, निलंबन हे सर्व प्रकार सुरू आहेत, त्या बाबतीत आपल्या दालनात किंवा माननीय मंत्र्यांच्या दालनात येत्या 10 दिवसांत बैठक घेणार का, जेणेकरून अकोला महानगरपालिकेची परिस्थिती कायमची सुधारेल.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, रहिवाासी घरे, दुकानदार व हॉटेल्स इत्यादींकडे अचानक भोगवटा प्रमाणपत्रांची होत असलेली मागणी आणि त्यामुळे जनतेत पसरलेला असंतोष व भितीचे वातावरण याबद्दलची ही लक्षवेधी सूचना आहे. पूर्वसूचना न देता होत असलेली कारवाई असे सुध्दा आरोप लक्षवेधी सूचनेत केला आहे. रात्री-अपरात्री होत असलेली कारवाई असा देखील उल्लेख लक्षवेधी सूचनेत आहे. लक्षवेधी सूचनेत असे सुध्दा म्हटले आहे की, काही हॉटेल्सवर सील करण्याची सुध्दा कारवाई झाली आहे. मी एवढेच सांगेन की, भोगवटा प्रमाणपत्र हे अचानक मागत असले तरी ते कायद्याप्रमाणे होत आहे. माझे म्हणणे आहे की, यामध्ये थोडासा वेळ निश्चितपणे देण्यात यावा. अचानकपणे होत आहे, रात्री अपरात्रीचे होत आहे, भितीचे वातावरण निर्माण करण्यात येत आहे, असे काही चुकीचे आहे होत असेल तर याबाबत पूर्ण तपासणी केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सन 2008 पूर्वीच्या भोगवटा प्रमाणपत्रांचा देखील मुद्दा मांडला आहे आणि अशीही मागणी केली आहे की, सदर बाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधी, सन्माननीय सदस्य आणि तेथील महापौर यांच्या समवेत बैठक घेऊन तोडगा काढता येईल का, ते पहावे. मी एवढेच सांगेन की, सध्या ज्या हॉटेल्सवर कारवाई झाली आहे, त्याला स्थगिती देण्याची शिफारस मी करतो. मी सांगू इच्छितो की, 10 दिवसांच्या आत सन्माननीय सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी, तेथील महापौर व आयुक्त यांच्या समवेत बैठक घेण्यात येईल. विभागीय आयुक्तांना सुध्दा सूचित केले जाईल की, असे प्रकार घडत आहेत, आपण दखल घ्यावी.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांत नरभक्षक वाघाने व बिबट्याने धुमाकूळ घातल्याने जनतेमध्ये भितीचे वातावरण पसरणे.

**मु.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांत नरभक्षक वाघाने व बिबट्याने धुमाकूळ घातल्याने जनतेमध्ये भितीचे वातावरण पसरणे यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री. संजय दत्त, भाई जगताप, शरद रणपिसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"चंद्रपूर जिल्ह्यातील पोभुर्णा मूल, सावली, नागभीड, सिन्देवाही, चिमूर तालुक्यात नरभक्षक वाघाने व बिबटयांनी घातलेला धुमाकूळ, त्यातच पोभूर्णा तालूका चितलधांबा येथील पद्मा मडवी या महिलेचा दिनांक 20 नोव्हेंबर, 2014 रोजी तसेच दिनांक 17 ऑगस्ट, 2014 रोजी चिचपल्ली वनक्षेत्र अंतर्गत डोंगळहळदी येथील दत्तु ढोले या युवकाचा व चिचपल्ली चब निबाळा येथे सुरेखा शेंड या महिलेचा दिनांक 28 नोव्हेंबर, 2014 रोजी वाघाच्या हल्ल्याने झालेला मृत्यू, त्यातच एकटया पोभूर्णा तालूक्यात फेब्रुवारी, 2014 ते नोव्हेंबर, 2014 या 9 महिन्यांत 8 जणांचा गेलेला बळी, गेल्या 8 वर्षात वाघ व बिबटयाच्या हल्ल्यात जिल्हयात 93 लोक ठार तर 160 जण जखमी झाल्याच्या घटना, त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांचे शाळेत जाणे बंद होणे, शेतकऱ्यांचे शेतातील पिकावर दुर्लक्ष झाल्यामुळे पिकांचे नुकसान होणे, नागरिकांना कामधंद्याना जाणे कठीण होणे त्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेली भीती, नरभक्षक वाघ व बिबटयाचा बंदोबस्त करण्यासंबंधी जनतेकडून सतत होत असलेली मागणी, परंतु अद्यापही वाघांना पकडण्यात वनविभागाला आलेले अपयश, मृताच्या व जखमीच्या वारसांना न मिळालेली भरपाई त्यामुळे सदर परिसरातील जनतेत पसरलेला असंतोष, शासनाचे व वनविभागाचे याकडे झालेले दुर्लक्ष, शासनाने तातडीने सदर नरभक्षक वाघाचा बंदोबस्त करण्याची आवश्यकता व कारवाई."

..7



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार (वने मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..8

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. दीड ते दोन महिन्यांमध्ये जवळपास 9 लोकांचा मृत्यू झाला आहे. वन अधिकारी पिंजरे लावण्यास जायचे. गंमत अशी की, पिंजरा वाघांसाठी लावायचे आणि वाघ समोर आला की अधिकारी पिंजऱ्यात घुसायचे आणि वाघ बाहेर रहायचा. सदर ठिकाणी अशी परिस्थिती आहे. तेथील गावांत प्रचंड प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे वाघाला मारले, ही गोष्ट खरी आहे. पुन्हा एकदा नव्याने 2-3 महिन्यांपासून वाघाचे हमले सुरू झाले आहेत. परिथिती अशी आहे की, पोंभूर्णा परिसर लहान आहे आणि वाघ मात्र 10 आहेत. एका वाघाला फिरण्याकरिता कमीत कमी 30 कि.मी. चे अंतर लागते, असा नियम आहे. 40-50 कि.मी. मध्ये 10 वाघ आहेत. त्यामुळे ते वाघ गावामध्ये येतात, हमले करतात. ब्रह्मपुरी व पोंभूर्णा या दोन्ही विभागांत वाघांची संख्या जास्त असल्यामुळे भितीचे वातावरण आहे, हे मान्य करावे लागेल. मी सीसीएफशी बोलले, त्यांनी सांगितले की, ते मताशी सहमत आहेत. प्रश्न असा आहे की, वाघ जास्त आहेत आणि जागा कमी आहे, जंगल कमी आहे किंवा जंगलही त्या ठिकाणी नाही, तेथे त्या वाघांना शिकारीकरिता जनावरे नाहीत. परिणामी ते वाघ गावाकडे येतात. त्यामुळे माझी प्रश्न आहे की, पोंभूर्णयाचे 10 वाघ व ब्रह्मपुरीचे 20 वाघ जेथे जंगल दाट असेल, वाघ कमी असतील, तेथे नेऊन सोडणार का ? माझी आपल्याला या संदर्भात मागणी आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्या क्षेत्रांतील वाघ हलविण्याच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला. वन विभागाच्या माध्यमातून याचा निश्चित विचार केला जाईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, वाघ, बिबटे हल्ला करीत असलेल्या घटना मुंबईतील आरे दूध वसाहत व ठाणे येथील काही विशिष्ट भागांमध्ये सतत घडत असतात. परिणामी तेथील जनतेमध्ये भितीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झालेले असते. शासनाने याची दखल घेऊन कोणत्या उपायोजना केल्या आहेत, याची माहिती देण्यात यावी.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार............

वन्यजीव आणि मानव यांच्यामधील संघर्ष वाढला आहे. वन जमिनींवर होणारे अतिक्रमण, वाढणारे शहरीकरण आणि त्यातून मुंबईसारख्या ठिकाणी सुध्दा असे प्रश्न निर्माण होत आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून व्याघ्र प्रकल्प जाहीर करणे, जंगलांचे संरक्षण आणि वाढ या दृष्टीने धोरण आणणे, वनक्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीकोनातून वनेतर क्षेत्रामध्ये सामाजिक वनीकरण करणे, या शिवाय मृत व्यक्तिच्या कुटुंबीयांना किंवा अपंगत्त्व आलेल्या व्यक्तिला मदत करण्याचे धोरण शासनाने स्विकारले आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट आपल्याला सांगितली पाहिजे की, नव्याने आलेल्या सरकारने एक निर्णय घेतला आहे. बिबट्या, वाघ किंवा अन्य वन्यजीवांच्या हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तिच्या कुटुंबीयांना 5 लक्ष रुपयांची मदत यापूर्वी दिली जात होती. आता सरकारने ही रक्कम वाढवून 8 लक्ष रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे. हे खरे आहे की, पैशाने कोणाचा जीव परत येत नाही. परंतु, सरकारच्या तिजोरीवर जेवढा भार देता येईल, तेवढा देऊन, विशेष बाब म्हणून आणि कोणाची मागणी नसताना सरकारने मदतीची रक्कम 8 लक्ष रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, मुंबई परिसरात काही ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे, चर खोदणे, अशा उपाययोजना केल्या आहेत. ही मुकी जनावरे आहेत. ती जंगलांच्या बाहेर जाता कामा नये, याासाठी नैसर्गिक शृंखला तशीच्या तशी कायम ठेवण्याच्या दृष्टीकोनातून पाणवठे, वनतळी, छोटे बंधारे बांधणे, जंगलात वस्ती असेल तर त्यांचे पुनर्वसन करणे, अशा उपाययोजनाही करण्याचा प्रयत्न केला आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात 19 पाडी आहेत. त्यांच्याही पुनर्वसनाचा विचार केला जात आहे. ज्या ठिकाणी बिबट्यांचा वावर असतो, त्या ठिकाणी लाल कापडाचे निशाण लावणे, माहिती फलक लावणे, याही उपाययोजना आता केल्या जात आहेत. या सर्व उपाययोजनांमध्ये वाढ करण्याचा वन विभागाचा मानस आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबईतील 20 स्क्वेअर किलो मीटरचे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे पूर्वी कृष्णगिरी जंगल म्हणून ओळखले जात होते. ठाणे जिल्ह्यातील 44 स्क्वेअर

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...........

किलो मीटर आणि बोरिवली परिसरातील 42 स्क्वेअर किलो मीटर, अशी 86 स्क्वेअर किलो मीटरची खाजगी जमीन संपादित करुन आता हे क्षेत्र 102 स्क्वेअर किलो मीटरपर्यंत वाढविण्यात आले आहे.

सभापती महोदय, प्रत्येक वेळी असे सांगितले जाते की, आदिवासी आणि झोपडपट्टीधारक वन विभागात अतिक्रमण करीत आहेत. मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, वन विभागाच्या नियमानुसार वनक्षेत्राच्या परिघामध्ये बफर झोन सोडणे आवश्यक आहे. परंतु, तशा प्रकारचा बफर झोन सोडण्यात आलेला नाही. पवईमध्ये राहणाऱ्या एका शाळकरी मुलावर बिबट्याने हल्ला केला होता, हे आपल्याला माहीत आहे. आतापर्यंत 117 लोक बिबट्याच्या हल्ल्यामुळे मृत झाले आहेत. एक आदिवासी गरोदर महिला सुध्दा बिबट्याच्या हल्ल्यात मृत पावली आहे आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संबंधित प्रमुख अधिकाऱ्यांना त्याची कल्पना आहे. परंतु, या मृत महिलेच्या कुटुंबीयांना अद्याप मदत देण्यात आलेली नाही. अशा कुटुंबीयांना शासन मदत करणार आहे का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, खरे तर, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या उप प्रश्नाचा या लक्षवेधी सूचनेतील विषयाशी तसा संबंध नाही. त्यामुळे त्यांनी विचारलेली सर्व माहिती मी आता उपलब्ध करुन देऊ शकणार नाही. लक्षवेधी सूचनेच्या विषयात केवळ चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभूर्णा, मूल, सावली, नागभीड, सिन्देवाही याच गावांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्या संदर्भातील सर्व माहिती मी या ठिकाणी देऊ शकतो. तथापि, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या उप प्रश्नाचा या लक्षवेधी सूचनेतील विषयाशी संबंध नसला तरी एक विशेष बाब म्हणून मी त्यांच्या प्रश्नांना उत्तर देत आहे.

सभापती महोदय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासाठी 103 चौरस किलो मीटर एवढे क्षेत्र घोषित केलेले आहे. या परिक्षेत्रात असलेल्या झोपडपट्यांचे पुनर्वसन करण्याचे आदेश माननीय उच्चतम न्यायालयाने दिले असल्यामुळे त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. यामधील 7 ते 8 हजार झोपडीधारकांना चांदिवली, कांदिवली या भागामध्ये घरे बांधून दिलेली आहेत. अद्याप 14 हजार

...3....



SRR/ KTG/ प्रथम श्री.मंगेश..... 13:10

श्री.सुधीर मुनगंटीवार...........

लोकांच्या घराची व्यवस्था करावयाची आहे. यामध्ये काही आदिवासी पारिवार आहेत. त्यांचीही व्यवस्था करावयाची आहे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असल्यामुळे त्यांच्या आदेशाबरहुकुम ही प्रक्रिया सुरु आहे.

सभापती महोदय, बिबट्याच्या हमल्यात मृत पावलेल्या व्यक्तिच्या कुटुंबीयांना वन विभागाच्या माध्यमातून मदत झाली नसेल आणि अशी प्रकरणे सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिल्यास त्यांना तातडीने मदत करण्याची व्यवस्था आहे. वन विभागाच्या माध्यमातून असे आदेश देण्यात आले आहेत की, वाघाचा, बिबट्याचा किंवा वन्यप्राण्यांचा हमला झाल्यावर एक महिन्याच्या आत संबंधितांना 5 लक्ष रुपयांची मदत दिलीच पाहिजे. अशा प्रकारचे परिपत्रक काढले आहे. अशा प्रसंगी अर्थसंकल्पात नियतव्यय उपलब्ध नसतो. त्यामुळे बी.डी.एस.मधून निगेटिव्ह सिस्टिमव्दारे विभागाला पैसे काढता यावेत, याबाबतचा शासन निर्णय वित्त विभागाच्या माध्यमातून या आठवड्यात निर्गमित करीत आहोत. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तिच्या कुटुंबीयांना एक महिन्याच्या आत मदत दिली जाते. आपल्याला एखादे प्रकरण माहीत असेल तर आपण ते लक्षात आणून द्यावे, त्यांना ताबडतोब मदत दिली जाईल. अशी मदत करीत असताना एखाद्या अधिकाऱ्याकडून चूक झाली असेल, उदासिनता दाखविली गेली असेल, दुर्लक्ष करण्याची भावना असेल तर त्यांच्याकडून कारणमिमांसा जाणून घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई देखील केली जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विशेषत: चंद्रपूर आणि त्या भागातील वन क्षेत्रात वन्यप्राणी आणि मानव यांच्यामध्ये निर्माण झालेल्या संघर्षाबाबत ही लक्षवेधी चर्चा उपस्थित केली आहे.

सभापती महोदय, लक्षवेधीच्या निवेदनात किती व्यक्तिंना, किती मदत देण्यात आली आहे, याबाबतचा ताळमेळ सादर केला आहे. त्याबरोबरच त्या भागात अशा प्रकारचा संघर्ष आहे, हे शासन मान्य करीत आहे आणि त्या संदर्भात उपाययोजना केल्या आहेत, हेही सांगत आहेत. फेब्रुवारी, 2014 ते नोव्हेंबर, 2014 या 9 महिन्यांच्या कालावधीत 12 व्यक्ती आणि गेल्या 8 वर्षात 98 व्यक्ती प्राण्यांच्या हल्ल्यात मृत झाल्या आहेत. ही आकडेवारी तशी गंभीर आहे. शासन या

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...........

निष्कर्शाप्रत पोहोचले आहे की, नागरिकांच्या जीवनाला धोका आहे, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. परंतु, निवेदनातील हा निष्कर्श संयुक्तिक आहे, असे मला वाटत नाही. यापूर्वी मी सांगितल्याप्रमाणे धोका निर्माण झाला आहे, हे एकीकडे शासनाने मान्य केले आहे. सरकारने जरूर उपाययोजना केलेल्या आहेत. त्या पुरेशा आहेत किंवा नाहीत, हा वेगळा भाग आहे. परंतु, जंगलात राहणारा आदिवासी समाज विविध मार्गाने आपली रोजीरोटी मिळवत असतो. वाघांना हलविता येणार नाही, असे सरकारचे म्हणणे असेल तर मग या आदिवासींना तेथून हलविणार का ? त्यांना तेथून हलविले तर त्यांचे पुनर्वसन होईल आणि त्यांना रोजगाराची, रोजीरोटीची संधी मिळेल. अशा प्रकारे मानवी दृष्टीकोनातून, प्राण्यांना कोणतीही हानी पोहोचणार नाही, अशा प्रकारे दोन्हीचे संतुलन साधून हे करता येणे शक्य आहे का ? आदिवासींची लोकसंख्या आणि कमी कमी होत असलेले वनक्षेत्र लक्षात घेऊन कोणता दुसरा उपाय आपण सुचवू शकला तर याबाबत आपला विभाग विचार करणार आहे का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या एक गोष्ट मी लक्षात आणून देऊ इच्छितो की, हे जे काही हमले झाले आहेत, त्यामधील एका हमल्याचा अपवाद सोडला तर तेथील लोक 3 ते 6 किलो मीटर जंगल क्षेत्रात गेल्यामुळे, वाघाच्या क्षेत्रात गेल्यामुळे हमले झ ाले आणि ते मृत्युमुखी पडले आहेत.

सभापती महोदय, पहिल्यांदा ही गोष्ट समजून घेण्याची आवश्यकता आहे की, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकूण क्षेत्राच्या 42 टक्के वनक्षेत्र आहे. यामधील वाघांची संख्या लक्षात घेऊन केंद्र सरकारने देखील विदर्भाचा आणि आपल्या राज्याचा गौरव केला आहे. जगामध्ये वाघांची संख्या कमी होत असताना या ठिकाणी वाघांची संख्या वाढविणारे वातावरण निर्माण केले गेले आहे. तथापि, एका मूलभूत प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे. गावामधील गरीब माणूस मृत्युमुखी पडतो, ज्याचे जीवन जंगलातील आहे. त्यामुळे जंगलावर अवलंबून असणाऱ्या त्यांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन केले पाहिजे, या भूमिकेशी शासन सहमत आहे. या भागातील लोकांना सरपण, लाकुडफाटा गोळा करण्यासाठी जंगलात जावे लागते.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.मा.शिगम.........

श्री. सुधीर मुनगंटीवार...

14534 गॅस कनेक्शन्स दिलेली आहेत. या गावातील लोकांना लाकूड, सरपण यासाठी जंगलात जावे लागू नये यासाठी धडक कार्यक्रम घेण्यात येत आहे.या क्षेत्रातील लोकांना आरोग्य, रोजगार, शिक्षण इत्यादी व्यवस्था जवळच प्राप्त व्हाव्यात यासाठी धोरण आखण्यात येणार आहे. ते आखल्यावर मार्चच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात येणार आहे. या गावातील महिला गट, तरुण यांना रोजगार कसा उपलब्ध होऊ शकेल यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. मागच्या महिन्यामध्ये मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीत चंद्रपूर जिल्ह्यात 11 कोटी रुपये खर्च करुन बांबू प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये तेथील तरुणाला रोजगारासंबंधीचे ज्ञान प्राप्त होऊ शकेल.

श्री. माणिकराव ठाकरे : बांबू प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात येत असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. आदिवासींनी सरपणासाठी जंगलामध्ये जाऊ नये,तसेच तेथील तरुणांना व महिला बचत गटांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ते प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात येणार आहे. माझे म्हणणे असे आहे की, त्या प्रशिक्षण केंद्राचा त्या ठिकाणी उपयोग होणार नाही. गरीब आदिवासी जंगलामध्ये सरपणासाठी, उपजीविकेचे साधन शोधण्यासाठी जंगलामध्ये जात असतो.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण ऐकले असते तर बरे झाले असते. वाघाचा आणि बिबट्याचा हमला होणाऱ्या गावामध्ये बांबूपासून वस्तू तयार करण्याची अनेक वर्षापासूनची परंपरा आहे. 1997 पासून या त्यांचे रजिस्ट्रेशन सुध्दा झालेले नाही. आधी 1500 बांबू दिले जात होते तेही नंतर दिले जात नव्हते. आधी शासनाच्या माध्यमातून कर लावला जात होता. तो कर या शासनाने माफ केला आहे. 1709 कुटुंबांना बांबू मिळत नव्हता. आता त्यांना निष्कासन खर्चावर बांबू देण्यात येणार आहे. या लोकांना प्रशिक्षण दिले तर त्यांनी बनविलेल्या वस्तूंना चांगली किमत मिळेल, बचत गटाच्या माध्यमातून विविध वस्तू तयार करण्यात येतील, त्या वस्तूंना मार्केट उपलब्ध करुन देण्यात येईल. या आदिवासी लोकांचे जीवन वनावर आहे. काही ठिकाणी छोटी छोटी वनौषधींची केंद्रे काढून वनौषधी जमा करण्याचे काम त्यांना देता येईल. अशा उपाययोजना केल्या तर त्यांना 5-5 कि.मी. आत जंगलामध्ये जावे लागणार नाही. त्यामुळे वाघाच्या आणि बिबट्याच्या हल्ल्यात बळी पडणाऱ्यांची संख्या कमी हाईल.

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ पूर्वी श्री. रोझेकर 13:20

प्रा. जोगेंद्र कवाडे : लक्षवेधी सूचनेला मंत्री महोदयांनी समर्पक उत्तर दिलेले आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एक महिन्याच्या कालावधीमध्ये 12 व्यक्ती वाघाच्या आणि बिबट्याच्या हल्यामध्ये मृत झाल्या आणि मागील 8 वर्षामध्ये 98 व्यक्तींचा मृत्यू झाला, 191 व्यक्ती जमखी झाल्या. या व्यक्तींना आर्थिक मदत दिली गेली असेल असे मी गृहीत धरतो. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात दोन महत्वाचे प्रश्न उपस्थित होतात. एक म्हणजे या वाघांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात येईल काय ? तसेच वन्यप्राण्यांमुळे होणारे नुकसान थांबविण्यासाठी कोणती व्यवस्था करण्यात येईल ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : तेथील लोक वाघाच्या क्षेत्रामध्ये जातात. त्या लोकांना वाघाच्या क्षेत्रामध्ये जाण्यापासून आपण थांबविण्याचा प्रयत्न करीत आहोत. वाघ हलविण्याच्या संदर्भात मी आधीच उत्तर दिलेले आहे. वन्यप्राण्याच्या नुकसानीबाबत मदत वाढवून देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्याबाबतीत मोठ्या प्रमाणावर नुकसान भरपाई मिळावी असे प्रयत्न आम्ही करणार आहोत.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 व नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेच्या उत्तरासबंधी**

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 3ला उत्तर देण्यासाठी स्वत: माननीय मुख्यमंत्री महोदय येत आहेत. आपण थोडावेळ त्यांची वाट पाहू.

लक्षवेधी क्रमांक 4 आणि अल्पकालीन चर्चेवरील मंत्री महोदयांचे उत्तर हे दोन्ही विषय क्लब केले तर चालेल काय ?

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, काल चर्चा चालू असताना माननीय मंत्री महोदयांनी या सभागृहात यावयास पाहिजे होते, त्यांनी या सभागृहात यावे असे मी त्यांना आवाहन केले होते. किमान चर्चा ऐकून ते गेले असते तर चालले असते. या सभागृहाची काही प्रतिष्ठा आहे की नाही ?

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 आणि अल्पकालीन चर्चेचे विषय एकच असल्यामुळे हे दोन्ही विषय एकत्रितपणे घेण्यास दोन्ही सन्माननीय सदस्यांनी मान्यता द्यावी.

श्री. रामनाथ मोते : माझ्या चौथ्या क्रमांकावर लक्षवेधी सूचना आहे. कार्यक्रमपत्रिकेमध्ये बाब क्रमांक 6वर अल्पकालीन चर्चेला उत्तर दाखविण्यात आलेले आहे. आपण कार्यक्रमपत्रिकेप्रमाणे कामकाज करणार आहात की नाही ?

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 मधील विषय आणि अल्पकालीन चर्चेमधील विषय सारखेच असल्यामुळे ते एकत्रित चर्चेला घ्यावेत असे मला वाटते.

श्री. रामनाथ मोते : मी प्रथम लक्षवेधी सूचना मांडतो. माझ्या लक्षवेधी सूचनेला उत्तर दिल्यानंतर मंत्री महोदयांनी अल्पकालीन चर्चेला उत्तर द्यावे.

**उप सभापती** : नियम 97 अन्वयेची चर्चा आणि लक्षवेधी सूचना क्रमांक 4 मी क्लब करतो.

---

..4..



MSS/ KTG/ पूर्वी श्री. रोझेकर 13:20

**पृ. शी.** : माध्यमिक शाळांमधील संच निर्धारण

**मु. शी.** : माध्यमिक शाळांमधील संच निर्धारण यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते व कपिल पाटील,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांचे संच निर्धारण दरवर्षी करणे बंधनकारक असताना सन २०१३-१४ चे संच निर्धारणाचे कामकाज ऑक्टोबर - नोव्हेंबर, २०१४ मध्ये होणे, सन २०१४-१५ हे शैक्षणिक वर्ष संपण्यासाठी फक्त ४ महिने बाकी असूनही संच मान्यता न होणे, संच मान्यतेसाठी नवीन निकष लागू करणे, त्यामुळे अनेक शिक्षक अतिरिक्त ठरणे, शासनाने नियुक्ती करण्यास मंजुरी दिलेले परंतू ३ वर्षे सेवा पूर्ण न झालेले शिक्षण सेवक नोकरीतून बाहेर पडणे, त्यांच्या सेवा समाप्त होणे, त्यामुळे इंग्रजी, गणित, विज्ञान यासारख्या महत्वाच्या विषयांना शिक्षक उपलब्ध न होणे, अनुशेषानुसार नियुक्त झालेले अनेक शिक्षक नोकरीपासून वंचित राहणे, शासनाने आर.टी.ई. प्रमाणे संच निर्धारण करण्याचा निर्णय सन २०१४-१५ मध्ये घेणे, पूर्वलक्षी प्रभावाने निर्णय लागू केल्याने प्रचंड घोळ व गोंधळ निर्माण होणे, मा. मुंबई उच्च न्यायालयाने नवीन पध्दतीने संच निर्धारण करण्यास स्थगिती देऊनही न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी न होणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पद मान्यतेसाठी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ चा आधार घेणे, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयास न्यायालयाची स्थगिती असूनही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे अतिरिक्त ठरवून समायोजनाचे आदेश काढणे, अनेक शाळांमधील ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक इत्यादी पदे रद्द होणे, अर्धवळ शिक्षकेतरांना संरक्षण न मिळणे, कला शिक्षक, तबलजी, क्रीडा शिक्षक यांच्या समायोजनाचा गंभीर प्रश्न उपस्थित होणे, सर्वांना संरक्षण देण्याची घोषणा करुन व बैठकीमध्यें आश्वासन देवूनही कार्यवाही न करणे, शासनाने शिक्षक शिक्षकेतरांच्या समायोजनाबाबत व शिक्षण सेवकांच्या सेवा समाप्त करण्याबाबत कोणतेही

..५...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लेखी आदेश नसतांना शिक्षणाधिकाऱ्यांनी नियमबाह्य पध्दतीने कार्यवाही सुरु करणे, याबाबत राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व संताप, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना."

श्री. विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नांदेड येथील अतिरिक्त व सेवामुक्त कला शिक्षक श्री.सय्यद रमीझोद्दीन यांनी शिक्षणमंत्री आणि शिक्षण सचिव यांना जबाबदार ठरवून केलेली आत्महत्या

**मु.शी.**: नांदेड येथील अतिरिक्त व सेवामुक्त कला शिक्षक श्री.सय्यद रमीझोद्दीन यांनी शिक्षणमंत्री आणि शिक्षण सचिव यांना जबाबदार ठरवून केलेली आत्महत्या या विषयावर श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपला निर्णय अंतिम आहे. लक्षेवधी सूचना आणि नियम 97 अन्वयेची चर्चा क्लब कशी होऊ शकते हा प्रश्न आहे. चर्चेमध्ये माझा राजीनामा मागितलेला आहे. त्यासंबंधी मला उत्तर द्यावयाचे आहे. काल विधानसभेमध्ये शिक्षणासंबंधीचा प्रस्ताव असल्यामुळे मला तेथे बसावे लागले. मी आणि राज्यमंत्री विधानपरिषदेमध्ये येऊ शकलो नाही म्हणून या सभागृहाची अप्रतिष्ठा झाली असे वक्तव्य करण्यात आले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

पण काही माननीय सदस्य वाटेल ते बोलत असतात म्हणून मी लक्ष दिलेले नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, शिक्षणमंत्री यांच्याशी मी बोललो. ते सभागृहात काही वेळ बसून जाणार होते. माननीय सभापतींसमोर त्यांनी मान्य केले होते. आपण शिक्षणमंत्री आहात, आपण सभ्यतेने बोलले पाहिजे. किमान आपल्याकडून तशी अपेक्षा आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हा आमचा अवमान आहे. मंत्री महोदयांकडून माननीय सदस्यांना अपेक्षा आहे आणि स्वत:कडून अपेक्षा नाही.

(गोंधळ)

**उप सभापती** : आपण सर्वांनी खाली बसावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी केलेले आक्षेपार्ह वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

**उप सभापती**: सभागृहातील सर्व माननीय सदस्यांना माझी विनंती आहे. चर्चेच्या दरम्यान आपण आक्षेपार्ह विधान करु नये, जेणेकरुन सभागृहाची प्रतिष्ठा कमी होईल. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मंत्री महोदयांना उद्देशून जो शब्द उच्चारला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल. सभागृहाची प्रतिष्ठा सर्वांनी साभाळावी.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी "वाटेल ते बोलतात"असा शब्द उच्चारला आहे तो रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

**उप सभापती**: जे जे आक्षेपार्ह वक्तव्य आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक-4 च्या संदर्भात मी प्रश्न विचारु इच्छितो की, शालेय शिक्षण विभागातील संच निर्धारणाच्या संदर्भात असंतोष निर्माण झाला आहे. या राज्यामध्ये केंद्र शासनाचा शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यानंतर 3 वर्षात त्यात राज्य सरकारने सुधारणा करणे अपेक्षित होते. त्यात कोणत्याही प्रकारचा सुधारणा झालेली नाही. कायदा लागू झ ाला, त्याची अंमलबजावणी सुरु झाली. परंतु शासनाने त्यामध्ये सुधारणा करणे अपेक्षित होते ती सुधारणा अद्याप झालेली नाही. त्याचा परिणाम असा झाला की, शाळांचे संच निर्धारण दरवर्षी करावे लागते, ते करीत असताना 2014-15 चे संच निर्धारण अद्याप झालेले नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.चंद्रकांत रघुवंशी)**

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2013-14 चे संच निर्धारण 2014-15 च्या मध्यावर झाले. 2013-14 च्या संच निर्धारणामध्ये आरटीई लागू करुन संच मान्यता करण्यात आली. त्यामुळे घोळ निर्माण झाला आहे. पूर्वी माध्यमिक शाळांमध्ये पाचवी ते दहावी एकच शाळा समजली जायची. आता पाचवी ते दहावी शाळांमधील पाचवी वेगळी, सहावी ते आठवी वेगळी व नववी आणि दहावी वेगळी केली आहे. त्याकरिता वेगळी संच मान्यता केली असल्याने घोळ निर्माण झाला आहे. 2014-15 च्या संच मान्यतेच्या अनुषंगाने या राज्यामध्ये माध्यमिक शाळांमधील जे शिक्षक अतिरिक्त ठरले त्यापैकी किती शिक्षकांचे समायोजन शासनाने केले आहे, 2013-14 ची संच मान्यता 2014-15 मध्ये केल्यामुळे शासनाच्या मंजुरीने जे शिक्षण सेवक सेवेत आले त्यांची सेवा 3 वर्षे पूर्ण न झाल्यामुळे ते नोकरी गमावून बसणार आहेत, अशा शिक्षण सेवकांना संरक्षण मिळण्याची आवश्यकता आहे. या शिक्षण सेवकांना अतिरिक्त म्हणता येणार नाही. पण ही पदे जादा ठरलेली आहेत. त्यांना संरक्षणाची संधी नाही, सेवेची हमी नाही. त्यांना संरक्षण देण्याच्या संदर्भात शासनाचे धोरण काय आहे?

सभापती महोदय, आरटीई अंतर्गत या संच मान्यतेनुसार कला शिक्षक, संगीत शिक्षक, संस्कृत शिक्षक त्याचबरोबर संगीत शिक्षक वर्गात गेल्यानंतर त्यांच्याबरोबर असणारे तब्बलजी, हे पद कार्यभारावर अवलंबून रहात नाही परंतु संगीत शिक्षकांसोबत त्यांची आवश्यकता असते. विद्यार्थी संख्येनुसार संच मान्यता केल्यामुळे संगीत व कला शिक्षक अतिरिक्त ठरतात. त्यांच्या समायोजनेच्या संदर्भात काय नियोजन केले आहे? आणखी दोन पुरवणी प्रश्न विचारण्याची मला मागाहून संधी द्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी प्रश्न विचारला आहे. माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, सतीश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री नागो गाणार, श्रीकांत देशपांडे या मान्यवरांमध्ये शिक्षक आमदार आणि शिक्षकांमधून निवडून आलेले आमदार असे दोन प्रकार आहेत.

सभापती महोदय, हे सर्व प्रश्न निर्माण झाले याचे कारण म्हणजे केंद्राचा शिक्षण हक्क कायदा आल्यानंतर तीन वर्षात या कायद्यात काही बदल आपल्याला करता आले असते. आसपासच्या तीन-चार राज्यांनी त्यांना हवे असलेले बदल करुन घेतले. त्यावेळी आपल्या राज्याकडून त्या कायद्यात बदल होणे आवश्यक होते. हे बदल झाले असते तर यातील काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

प्रश्न कमी करता आले असते. पण ठरवून झाले नाही. जसा आग्रह आज या सभागृहात होतो तसा का घेतला नाही हे माहित नाही. मी अनेकदा माननीय सदस्य डॉ.अपूर्व हिरे यांना म्हणालो होतो. तसे का झाले नाही? ते झाले असते तर बरेच प्रश्न कमी झाले असते. केंद्राचा कायदा लागू झाल्यानंतर मी खाजगी बिल आणले होते. तो विषय मी त्या त्यावेळी आणला होता.

सभापती महोदय, राज्यामध्ये एकूण अतिरिक्त माध्यमिक शिक्षकांची संख्या 17066 इतकी आहे. या अतिरिक्त शिक्षकांपैकी समायोजित झालेल्या शिक्षकांची संख्या 14450 आहे. सद्य:स्थितीत 8902 पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमध्ये हे सर्व शिक्षक ॲडजस्ट झाले तर विषय संपेल. राज्यातील अतिरिक्त प्राथमिक शिक्षकांची संख्या 12442 असून 7933 पदे समायोजित झ ाली आहेत.

नंतर क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ............

रिक्त पदे 7586 असून त्यामध्ये शिक्षण सेवकांची संख्या 188 आहे. त्या 188 शिक्षण सेवकांमध्ये ज्यांची 3 वर्षे पूर्ण झालेली नाहीत त्यामुळे ज्यांना शिक्षक म्हणून मान्यता मिळत नसल्याने ज्यांच्या सेवेवर टाच येणार आहे असे 90 लोक आहेत, मग काहींची पावणे तीन तर काहींची अडीच वर्षे पूर्ण झालेली आहेत ............

श्री. कपिल पाटील : महोदय, या सभागृहातच कायदा पास होऊन शिक्षण सेवक हा शब्द शासनाने काढून टाकलेला असल्याने मंत्री महोदयांनी कृपया अशा प्रकारे अपमानास्पद शब्द वापरु नये, अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : ठीक आहे. महोदय, अशा प्रकारे 90 लोक असे आहेत की ज्यांच्या नोकऱ्या धोक्यात आहेत. या लोकांबाबत मी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि या 90 पदांची प्रायॉरिटी लिस्ट तयार करावी अशा सूचना दिल्या. त्यानुसार शासनाचा असा मनोदय आहे की, हे 90 शिक्षक सुध्दा ॲब्सॉर्ब करावेत, त्यामुळे कोणाच्याही नोकऱ्या जाणार नाहीत याचा विचार शासन करीत आहे. राज्यातील एकूण अतिरिक्त शिक्षक ठरतील त्यांना तालुका अंतर्गत त्याच संस्थेत असे 80 टक्क्याच्या वर म्हणजेच 10 हजार 152 एवढी संख्या आहे. जिल्हा अंतर्गत त्याच संस्थेत घ्यावयाचे अशी संख्या 44 एवढी आहे, अशा प्रकारे या शिक्षकांवर अन्याय होणार नाही असा आम्ही प्रयत्न करीत आहोत. संस्थाबाह्य जे 868 शिक्षक आहेत त्यांनाही तालुका अंतर्गत 517 आणि जिल्हा अंतर्गत 344 आणि फक्त 7 लोक असे शिल्लक राहतात की त्यांना केवळ एक ते दीड तास प्रवास करावा लागेल. जानेवारी अखेरपर्यंत सन 2014-15 ची संच मान्यता केल्यानंतर आम्ही या 7 लोकांच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेणार आहोत. इतके सर्व कन्स्टीडरेशन करुन आम्ही प्रयत्न करीत आहोत की एकही शिक्षक बेकार होता कामा नये आणि त्यांना त्याच तालुक्यात आणि त्याच संस्थेत संधी मिळाली पाहिजे आणि जास्त लांब जाऊन त्याचा संसार डिस्टर्ब होऊ नये म्हणून त्याच्या पत्नीलाही ॲडजस्टमेंट करावी लागते ती वेळ आता येणार नाही यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी, उप संचालक आणि राज्य पातळीवर काय चालले आहे हे कळत नाही म्हणून पुढील वर्षात आम्ही जिल्ह्यात अतिरिक्त होणारे शिक्षक आणि त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक व अध्यक्ष तसेच ज्या शाळांमध्ये त्यांना पाठवावयाचे आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......2

श्री. विनोद तावडे ............

त्या शाळांचे मुख्याध्यापक आणि अध्यक्ष यांना समोरासमोर आणणे अशा प्रकारे रचना करण्याचा विचार करीत आहोत. तसेच यासंदर्भात काही आक्षेप आणि सूचना असतील तर त्या समोरासमोर चर्चिल्या जाव्यात अशा प्रकारे पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, अतिरिक्त ठरणाऱ्या कोणत्याही शिक्षकाची नोकरी जाणार नाही एवढेच मंत्री महोदयांनी सांगावे. त्यांनी इतर जे सांगितले ते त्यांना कदाचित शकय होणार नाही. याचे कारण त्यांनी पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेवर काम केलेले नसल्याने त्यांना परिस्थितीची जाणीव नसेल. म्हणून त्यांनी ठराविक उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील म्हणाले ते खरे आहे पण मुद्दा इतकाच आहे की, असे प्रयत्न करीत असताना मी मंत्री म्हणून जरी कामाचा नसलो आणि माझ ा राजीनामा हवा असेल तर तो देण्यास मी तयार आहे. पण एक गोष्ट मात्र खरी आहे यापूर्वी या सर्व गोष्टींचा विचार कोणी केला नसेल आणि तो मी करीत आहे याबद्दल खुल्या दिलाने कोणीतरी माझे स्वागत करील अशी अपेक्षा होती पण तसे होताना दिसत नाही. या विषयावर इतका बारकाईने आम्ही विचार केला त्यामुळे आपल्यासारख्या एका ज्येष्ठ सदस्याने कौतुकाची थाप पाठीवर मारली असती. तरी देखील मी सांगू इच्छितो की, संघटनेच्या पलिकडे जाऊन शिक्षणाच्या हितासाठी असा विचार करावा लागतो म्हणून यावर्षी मानवतेच्या दृष्टीने विचार करुन या अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांची नोकरी तर टिकवावयाचीच आहे पण त्याच्या रुटीनमध्ये सुध्दा फार फरक पडणार नाही याचाही आम्ही विचार करीत आहोत. तसेच याबाबत जी पारदर्शक पध्दत अवलंबिणार आहे ती सुध्दा मी घोषित करुन टाकली आहे, जेणेकरुन अधिकाऱ्यांना यात काहीच वेगळे करता येणार नाही. कालच्या भाषणात एक मुद्दा उपस्थित झाला होता की मराठीला मराठी शिक्षक, तो इंग्रजी शिकविणार नाही पण डी.एड. झालेले शिक्षक आपण नोकरीत घेतो त्यांना सर्वच विषय शिकवावे लागतात.......

यानंतर श्री. भारवि............

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

मी भूतकाळामध्ये जगत नसून वर्तमानकाळात जगतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, डी.एड.शिक्षकांचा काळ आता गेला.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे मला मान्य आहे. जुन्या काळामध्ये माझा एक समाजवाद असतो, आता दुसरा आहे, असे माझे कधीच नाही. माझे जे आहे तसेच आहे. मी संघाचा विचार घेऊन विद्यार्थी परिषदेमध्ये आलो आणि ते विचार आजही आहेत. मी भांडवलदारांच्या मांडीला मांडी लावून समाजवाद मांडणाऱ्यांपैकी नाही. जे नियमात, कायद्यात आहे तेच मी मांडणार आहे आणि तेच मांडतो आहे. येथून तिकडे शिक्षक कसे गेले, कोणत्या शैक्षणिक अर्हतेवर ते लागले होते, कसे गेले होते याची तपासणी झाली आहे. सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये जे बोलतात ते खरे आहे असे आपण मानतो. या उपरही काही सूचना आली तर त्यात दुरूस्ती देखील करण्यात येईल. त्यात कोणीतीही अडचण नाही. त्यात हा विचार केलेला आहे. हिंदी विषय शिकविणाऱ्याने इंग्रजी विषय शिकविला पाहिजे असे सरसकटपणे झालेले नाही. तोही विचार आम्ही केला व त्यानुसार आम्ही निर्णय घेतला. त्या उपरही काही तुरळक तक्रारी असतील तर त्यांचाही विचार केला जाईल. या तक्रारी हाताच्या बोटावर मोजण्या इतपत देखील नसतील हे मी खात्रीने सांगतो. या क्षेत्रात सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, रामनाथ मोते, श्रीकांत देशपांडे, हे सर्व काम करतात. सन्माननीय सदस्य श्री.अपूर्व हिरे यांची तर स्वत:ची संस्था आहे. सन्माननीय सदस्य श्री.सोले देखील अनेक ठिकाणी जातात. आम्ही या सर्वांशी चर्चा केली. हा जो अन्याय आहे तो शिक्षकांवर नसून विद्यार्थ्यांवर आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून शिक्षणाकडे पाहणारा मी आहे. विशिष्ट शिक्षकांना किंवा संस्थेला केंद्रबिंदू मानले तर 2 कोटी विद्यार्थ्यांचे हित होणार नाही. 2 कोटी विद्यार्थ्यांना नजरे समोर ठेवून विद्यार्थ्यांचे हित साधणारा मी आहे. हे सर्व करत असताना कोणावरही अन्याय होणार नाही हे देखील मी पाहणार आहे. श्री.चव्हाण साहेब आपणही संस्था चालवित आहात. आपणही संस्थेच्या बाजूने बोलतात. या सर्व बाबींचा विचार करुन शिक्षकांवर कमीतकमी अन्याय व्हावा या मताचा मी आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आरटीई कायदा तीन वर्षापूर्वी केंद्र शासनाने अमलात आणला त्या कायद्याच्या संदर्भात ज्या त्रुटींबाबत दुरुस्ती करणे आवश्यक होते ती दुरुस्ती केली असती तर हा विषय उपस्थित झाला नसता. त्यामुळे शासनाने या कायद्यात आवश्यक ती दुरुस्ती व्हावी असा विचार केलेला आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आम्ही जो दावा केला होता त्याच्याशी सुसंगत आकडे मंत्रिमहोदयांनी जाहीर केलेले आहेत, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. कारण त्यांनी अतिरिक्त शिक्षकांची संख्या 17,000 इतकी दिली असून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या 12442 असून न सांगितलेल्या अंशकालीन शिक्षकांची संख्या 18 हजारच्या आसपास आहे. असे मिळून एकूण शिक्षकांची संख्या 47805 इतकी होते. ज्या सदोष संच मान्यतेमुळे शिक्षक अतिरिक्त ठरले ती पद्धती रद्द करावी, मागे घ्यावी अशी आमची मूळ मागणी आहे. समायोजनाबद्दल आमची कोणतीही तक्रार नव्हती. शिक्षकांची नोकरी जात जाही, ती घालवता येत नाही. त्या विषयासंबंधीही आमची तक्रारच नव्हती. त्या त्या विषयाचा शिक्षक विद्यार्थ्याला मिळाला पहिजे. इंग्रजीचा शिक्षक इंग्रजीला मिळालाच पाहिजे. सन्माननीय सदस्य सभागृहात जे सांगतात ते सत्य मानून मंत्री महोदयांनी त्यावर विचार केला पाहिजे पण असे झाले नाही हे आपण स्वीकारले पाहिजे. 50 टक्के शिक्षकांचे केवळ कागदावरच समायोजन झालेले आहे. यात गणिताचा शिक्षक गणिताला मिळालेला नाही. आपण रिक्त पदांचा आकडा बरोबर दिलेला आहे पण ज्या पद्धतीने समायोजन व्हायला पाहिजे होते ते झालेले नाही. नववी व दहावीबाबत काहीच केलेले नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी विस्ताराने उत्तर दिले असल्यामुळे मी देखील अधिक विस्ताराने बोलणार आहे. सहावी ते आठवीसंबंधी आरटीई स्पष्ट सांगतो की, विषयाला शिक्षक मिळाला पाहिजे. 35 मुलांमागे एक शिक्षक मिळाला पाहिजे. आपण जास्त पद्धतीने शिक्षकांना सरप्लस केले आहे. त्यामुळे ती संच मान्यता रद्द करावी, अशी आमची विनंती आहे. आपण 35 ऐवजी 40 चा पट धरला. 35 प्रमाणे 199 विद्यार्थ्यांच्या मागे 7 शिक्षक मिळतात. 1 विद्यार्थी वाढला की, 5 शिक्षक होतात. अशा पद्धतीने शिक्षक कमी झाले आहेत. हे आम्ही वारंवार सांगत आहोत. त्यामुळे शासनाने केलेली सदोष संच मान्यता ताबडतोब स्थगित करावी आणि त्यानंतरच आपण जे सांगत आहात त्याप्रमाणे समायोजन करावे. तोपर्यंत आपल्याला समाजयोजन करता येणार नाही. अन्यथा विद्यार्थ्यांवर प्रचंड मोठा

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

अन्याय होईल, आधीच आपण अडचणीत आहोत. मागे झालेल्या चुका निस्तरण्याची जबाबदारी आता आपल्यावर आहे. यात बदल करावा अशी मागणी आम्ही पुन्हा पुन्हा करीत होतो. आपण जर असे केले असते तर सय्यद रमीझोद्दीन या शिक्षकाचा बळी गेला नसता. तेव्हा आपण यासंबंधी उत्तर द्यावे.

श्री.विनोद तावडे : कायद्यानुसार संच मान्यतेसंबंधी इंटरप्रिटेशन करण्यात आले आहे. ज्या सोईने शिक्षक प्रतिनिधींना इंटरप्रिटेशन करावयाचे असेल ते त्यांनी करावे. जे नियमात म्हटलेले आहे त्याप्रमाणे केले आहे, असे माझे मत आहे. त्यात कुठलाही दोष राहिलेला नाही. या विषयातील जे तज्ज्ञ आहेत, जे कोर्टात जातात, त्यांच्याशी चर्चा करुन हे प्रपोजल योग्य झाले आहे असे माझे मत झाल्यामुळे ते मी मांडलेले आहे. .... (अडथळा).....

सभापती महोदय, सय्यद रमीझोद्दीनला दिनांक 28.7.2012 च्या पत्रान्वये त्याची नियुक्ती रद्द झाल्याचे आदेश निर्गमित झाले होते. त्यावेळी मी मंत्री नव्हतो. माननीय न्यायालयाने अंशकालीन निदेशकांना कायमस्वरुपी नोकरीत सामावून घ्यावे, असे आपण म्हटले आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, ते जजमेंट मी तीन वेळा वाचले. त्यात न्यायालयाने ही पदे निर्माण करा हे म्हटले आहे. विधान परिषदेतील शिक्षक प्रतिनिधी नसलेल्या सन्माननीय सदस्यांना हा विषय माहीत नसल्यामुळे अतिरिक्त माहिती द्यावीच लागते. मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना सांगू इच्छितो की, मी नवनीतवर काम करीत नाही. मी विषयाचा अभ्यास करतो. नवनीत सारखी मी ऑब्जेक्टीव्ह उत्तरे देत नाही.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य माननीय मुख्यमंत्री सदनात असल्यामुळे पुढील लक्षवेधी सूचना घ्यावी असे एकाच वेळी बोलतात.)

**तालिका सभापती** : माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये उपस्थित आहेत हे मला माहीत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मनाला येईल त्याप्रमाणे भाषण केल्यानंतर त्यास उत्तर द्यायला नको काय ? कोणी काहीही बोलावे इतके काय हलके राहिलेलो नाही. अभ्यास करुन सगळे काही करतो आहे. एखाद्याला संघटना वाढवायची असेल तर त्यास माझी हरकत नाही. पण सभागृहात कोणीही चुकीचे आरोप केलेले मी ऐकून घेणार नाही. सर्व आमदार मान्य

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

करतात पण एक आमदार मान्य करीत नाही, हे कसे काय चालू शकते ? मी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांना सांगू इच्छितो तसेच मी पाच वेळा सांगितले की, मी हे पाहिले आहे. तेव्हा मला सांगण्यात आले की, असे जर असेल तर आम्हाला आंदोलन करावे लागेल. तेव्हा मी आपणाला हवे ते करावे असे म्हटले तर त्यात वावगे काय आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण हे देखील सभागृहात उपस्थित होते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, आंदोलन करावे, असे मी सांगितले आहे काय ? उलट मंत्रिमहोदयच म्हणाले की, आंदोलन करा, माझा पुतळा जाळा, धरणे धरा, उपोषण करा असे सांगत होते. उलट आम्ही त्यांना सांगत होतो की, आम्हाला समजून घ्यावे. आपण बाहेर जे काही बोलला ते संपूर्ण सभागृहाला कळू द्यावे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी उप सभापती )

श्री. विनोद तावडे ......

कोण भंपकपणा करते आणि कोण वास्तव सांगते हे एकदा सभागृहाला कळालेच पाहिजे. मी आपले आव्हान स्वीकारण्यास तयार आहे. मी सुध्दा आंदोलनातूनच मोठा झालो आहे. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. सतिश चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे हे त्यावेळेस होते. आंदोलने करा, पुतळे जाळा. हा विषय गेल्या महिन्याचा असून मांडला कोणते...

श्री. सतिश चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सभापती महोदयांनी चवथ्या क्रमांकाची लक्षवेधी आणि अल्पकालीन चर्चा क्लब केली होती व त्या प्रमाणे ही चर्चा सुरु आहे असे मला वाटते. या ठिकाणी आता नेमके काय सुरु आहे हे आम्हाला कळतच नाही. सभागृहाच्या सदस्यांनी दिलेली माहिती खरी समजून त्यावर कार्यवाही केली जात असते. माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थित असल्यामुळे मी एकच प्रश्न विचारु इच्छितो की, काल सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी 18 हजार कार्यानुभव शिक्षकांना कन्फर्म करण्यासाठी एका व्यक्तीने प्रत्येक कार्यानुभव शिक्षकाकडून 5-5 हजार रुपये घेतले होते असा गंभीर आरोप केला होता. 18 हजार शिक्षकांकडून 5 हजार रुपये घेतले तर 9 कोटी रुपये होतात. त्यामुळे हे पैसे ज्याने घेतले त्याच्यावर गुन्हा दाखल करुन त्यासंदर्भाती निर्णय आजच जाहीर केला जाणार आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांना संबंधित व्यक्तीचे नाव माहित असल्यामुळे त्यांनी सदर व्यक्तीचे नाव सभागृहात सांगावे अशी विनंती आहे. मोठया मुश्कलीने शिक्षकांच्या संदर्भातील "कायम" शब्द निघालेला आहे. अनुदान सुरु करण्यात येईल अशी सरकारने घोषणा केली होती. शिक्षक 14 वर्षापासून उपाशी आहेत. शिक्षक नोकरीवर लागले परंतु त्यांना 14 वर्षापासून पगार मिळालेला नाही. या शिक्षकांचे मुल्यांकन झाल्यामुळे आपला पगार आज नाही तर दुद्या सुरु होईल असे त्यांना वाटू लागले होते परंतु पुन्हा पुनर्रमुल्यांकनाचे आदेश दिले गेले. त्यामुळे फेर मुल्यांकनाच्या अधिन राहून या शिक्षकांचे पगार सुरु केले जाणार आहेत काय ? मुल्यांकन आणि फेर मुल्यांकन यामध्ये काही गफलत असल्यास त्याला जबाबदार असणाऱ्यावर कारवाई केल जाणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतिश चव्हाण साहेब असे म्हणाले की, मोते साहेबांनी आरोप केला आहे. मी कोणावरही आरोप केला नसून वस्तुस्थिती या सभागृहाला सांगितली होती. मी सुध्दा चळवळीचा कार्यकर्ता आहे. आपण संपूर्ण अंशकालीन शिक्षकांना भेटलात तर आपल्याला सर्व काही माहिती मिळू शकेल. अंशकालीन शिक्षकांनी माझ्याकडे तक्रारी केल्या असून त्यांनी मला सांगितले होते की, कन्फर्म होण्यासाठी .......

श्री. धनंजय मुंडे : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी सांगितले की, अशकालीन शिक्षकांच्या संदर्भात जी काही वस्तुस्थिती होती ती मांडली आहे. त्यामुळे 18 हजार शिक्षकांकडून प्रत्येकी 5 हजार रुपये ज्याने कोणी घेतले त्याची माहिती सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांकडे असल्यामुळे त्यासंदर्भातील संपूर्ण वस्तुस्थिती मांडावी अशी माझी विनंती आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, जे अंशकालीन शिक्षक आहेत त्यांची जी काही संख्या आहे त्यापैकी काही शिक्षकांनी,निदेशकांनी आम्हाला न्याय मिळवून द्यावा यासंदर्भात तक्रारी केलेल्या आहेत. आम्ही कन्फर्म होत नाही, आमच्या नोकऱ्या गेल्या आहेत. आमची नोकरी परत मिळण्यासाठी आमच्याकडून प्रत्येकी 5-5 हजार रुपये घेण्यात आलेले आहेत असे मला शिक्षकांनी सांगितले आहे. मला जी माहिती मिळाली होती ती माहिती मी काल या सभागृहात दिली होती आणि आताही देत आहे. माझ्याकडे ज्या काही तक्रारी आहेत त्या मी संबंधितांकडे देणार आहे.

**उप सभापती** : सभागृहापुढे अन्य कामकाजही आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, आज 2 वाजता विधानसभेची बीएसी असून अडीच वाजता विधान परिषदेची बीएसी आहे. माझ्याशी संबंधित लक्ष वेधी सूचना असल्यामुळे माझी लक्षवेधी सूचना शेवटी पुकारण्यात यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या संदर्भातील लक्षवेधी सूचनेवर दोन्ही बाजूने प्रश्नात्तरे विचारली जात आहेत. या प्रश्नाला न्याय मिळण्यासाठी ही चर्चा शांतपणे सुध्दा होऊ शकते. या ठिकाणी मंत्री महोदय, आंदोलने करा किंवा अजून काही करा असे शब्द वापरत आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मोते सांहेबांनी 9 कोटी रुपये

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .. ..

शिक्षकांकडून घेतले असा आरोप केलेला आहे. हा जो आरोप आहे तो अतिशय गंभीर आरोप आहे. त्यामुळे यासंदर्भात अशाच प्रकारचे वातावरण राहू देणे योग्य नाही. यासंदर्भात चौकशी झाली पाहिजे व ते सर्व रेकॉर्डवर आले पाहिजे. यामध्ये कोणी पैसे घेतले,त्यांच्या मागे कोण आहे यासंदर्भातील खुलासा होणे गरजेचे असल्यामुळे या विषयाच्या संदर्भात चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

श्री.धनंजय मुंडे : आजची लक्षवेधी आणि अल्पकालीन चर्चा क्लब करून त्या चर्चेला माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत. मी माझ्या कालच्या भाषणात विनंती केली होती की, नांदेडच्या ज्या शिक्षकाने आत्महत्या केली होती त्याचे वडिल आज डायलेसीसवर आहेत. त्यामुळे आत्महत्या केलेल्या शिक्षकाला शासन काही मदत करणार आहे काय यासंदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरातून यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मोदींच्या होकेश्नल संदर्भात अनेक शिक्षक आणि इतर काही लोक माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींना आव्हान द्यावयास लागली आहेत. मी मघाशी म्हटल्या प्रमाणे वर्ग संघर्ष दाखवायचा परंतु भांडवलदारांच्या मांडीवर बसायचे हे चालणार नाही. या विषयाच्या संदर्भातील निवेदनात सर्व माहिती दिलेली असल्यामुळे खरे म्हणजे हा विषय संपलेला आहे. त्यावर इंटरप्रिटेशन वेगळे असू शकते. सभागृहात इंटरप्रिटेशन न करता दालनात इंटरप्रिटेशन केले जात असते. परंतु दालनाचा आग्रह न घरता हा प्रश्न सुटण्यापेक्षा येथे आम्ही काय केले हे दाखवण्याचा प्रयत्न होत असेल तर मलाही तशी चर्चा करण्याचा अधिकार असला पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सतिश चव्हाण यांनी पुनर्रमुल्यांकनाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. या ठिकणी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी जी मागणी केली आहे त्यानुसार या प्रकरणाची मी पूर्ण चौकशी करणार असून या प्रकरणाच्या पाठीशी कोण कोण आहेत, कोणत्या एजंट मार्फत कोणाच्या खात्यात पैसे गेले याची माहिती घेणार आहे. पैसे उभे करुन संघटनेचे बळकटीकरण करण्याचे काम कसे चालले आहे हे एकदा उघड होण्याची आवश्यकता आहे. जे कोणी असे काम करीत आहे ते एकदा बाहेर येऊ दे. आमच्याकडे पक्ष नाही,

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .. ..

आमच्याकडे हे नाही, ते नाही, अशी कारणे देऊन चालणार नाही. असे असतांना कोणाच्या भावनेशी खेळावयाचे नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील आणि प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्याकडे कोणीही बोट दाखविणार नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

केंद्राकडून आलेल्या निधीच्या आधारे अंशकालीन शिक्षकांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत. त्या नियुक्त्या करताना तत्कालीन सरकारने घाई केली. जर तत्कालीन सरकारने केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीत 35 टक्के रक्कम दिली असती आणि निकष घालून दिले असते तर आता जे अंशकालीन शिक्षक्ांना काढावे लागले ते आपणास पुढे कायम करता आले असते. परंतु त्यासाठी कोणत्याही प्रकारची अट न घालता संस्थाचालकांना भरती करण्यास सांगण्यात आले.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, माननीय मंत्री महोदयांनी सदनाचा इतका वेळ घेण्यापेक्षा त्यांनी एक वेगळी बैठक घेऊन शिक्षकांना न्याय द्यावा. कारण मंत्री महोदय आम्ही घेऊ शकणार नाही, केंद्राने केलेले नाही असे तेच तेच सांगत आहे. मला वाटते हे सर्व मर्यादित ठेवून न्याय द्यावा अशी विनंती आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सूचना केल्याप्रमाणे माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी या सभागृहातील सर्व शिक्षक आमदारांची एकत्रित बैठक घ्यावी. ही बैठक मुंबईला होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण केलेली सूचना योग्य आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या चर्चेच्या अनुषंगाने जे जे मुद्दे उपस्थित केले त्याबाबत मला सांगितले पाहिजे. श्री.सहारिया यांनी काय म्हटले ते आताच्या सचिवांना लागू करून आम्ही सूज्ञ शिक्षक आहोत असे म्हणणे मला कळत नाही. म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील असे म्हणाले म्हणून श्री. डावखरे साहेब सुद्धा तसे,असे म्हणण्यासारखे् झ ाले. हा त्यांच्यावर अन्याय नाही काय, असा लॉजिक लावून चालते काय ?

**उप सभापती** : याठिकाणी डावखरे असा उल्लेख झाला तो सभागृहाच्या कामकाजून काढून टाकण्यात यावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला ॲड.निरंजन डावखरे असे म्हणायचे आहे. खरे म्हणजे 45 हजार हा आकडा शिक्षकांचा होता. आता शिक्षक आणि शिक्षकेतर झाले. हे सर्व सोयीसाठी केलेले आहे. पण विक्रमभाई असे करीत नाही, सतीश चव्हाण साहेब असे करीत नाही. बरीच मंडळी असे करीत नाहीत. मग असे का होते हे माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सांगावे, ते चाणाक्ष कामगार नेते आहेत. हे कोण आणि का करते हे आपणास माहीत आहे. आपणास असे करावे लागत नाही कारण तुमच्याकडे खरी ताकद आहे. आपण तसे भासवत नाही. ज्याचे जमिनीशी नाते आहे त्यांना असे भासवावे लागत नाही.

सभापती महोदय, आपण जी सूचना केलेली आहे ती मान्य केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात शिक्षक आमदारांची एक बैठक घेण्यात येईल. त्यांचे समाधान होईपर्यंत बैठक चालविण्यात घेईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, एखाद्या सदस्याला उद्देशून भाषण करणे आणि मूळ मुद्याला बगल देणे यामध्ये सदनाचा वेळ जात आहे. अंशकालीन शिक्षकांच्या संदर्भात निर्णय घेणार की नाही हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी कोणत्या मुद्याला बगल दिली ? आपण जे सांगत आहात तो विषय भाषणाच्या शेवटी येईल. काल ही चर्चा सुरु होती त्यावेळी सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित होते किंवा कसे हे मला माहीत नाही. नांदेड येथील तरुणाने केलेल्या आत्महत्येचा विषय होता. त्या चर्चेच्या वेळी माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी व्होकेशन सुरु केले असा उल्लेख करण्यात आला होता. त्यावेळी आपण त्यांना मुद्याला धरुन बोला असे सांगितले काय ?

श्री.माणिकराव ठाकरे (बसून) : त्यावेळी मी सभागृहात नव्हतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, म्हणजे ते अनावश्यक बोलले असे आपले देखील म्हणणे आहे. इयत्ता आठवीनंतर अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम आणला पाहिजे असे सर्व शिक्षण तज्ज्ञ सांगत आहेत. जो मुलगा अतिशय हुशार आहे त्याला कोणी टर्नर फिटर करणार नाही. आपण काय भासवत आहात, कशासाठी भासवत आहात हे कळत नाही. पंतप्रधान मोदी यांच्यावर विश्वास ठेवायचा की अशाप्रकारची मांडणी करणाऱ्यांवर विश्वास ठेवायचा असे शिक्षकांना वाटेल. तत्कालीन माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी देखीले हेच मांडले होते. ज्याला खऱ्या अर्थाने देश चालवायाचा आहे, देशाचा विकास करायचा आहे, सामान्य माणसांच्या हिताचा

..3..



AJIT/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 14:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

विचार करायचा आहे ते हेच मांडणार. पण संघर्षाचा बिगुल वाजवत अशा मांडणी होते त्यावेळी असा मूळ प्रश्न बाजूला राहतो.

सभापती महोदय, हा मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय आहे आणि त्याप्रमाणे जी.आर काढण्यात आला त्यानुसार नेमणुका करायच्या आहेत. पण या नेमणुका करीत असताना ज्यांच्याकडे क्वालिफिकेशन असेल तर ते पुढे राहतील. खरे म्हणजे या विषयावर स्थगन प्रस्ताव आला, लक्षवेधी सूचना आली तेव्हा हा न्यायालयीन विषय आहे असे विभागाकडून सांगण्यात आले. परंतु बाब न्यायप्रविष्ठ आहे म्हणून चांगल्या विषयाची चर्चा बाजूला ठेवणे मला मान्य नाही. विधिमंडळ स्वायत्त आहे. तेव्हा चर्चा झाली पाहिजे. मला यातून पळवाट काढायची असती तर ही बाब न्यायप्रविष्ठ आहे असे सांगून ही चर्चा केली नसती. मी खुलेआम सामना करणारा आहे. मी वास्तव सांगणारा आहे. जे काही असेल ते हिमतीने सांगणारा आहे. जे आमदार भेटले त्यांना सांगितले की, राज्यावर 3 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे, ते वर्ष-दोन वर्षात कमी होईल आणि आम्ही तरुण नेतृत्वाने ठरविले आहे की, सर्व प्रथम प्राधान्य सुरक्षिततेला असेल आणि त्यानंतरचे प्राधान्य शिक्षणाला असेल. आम्ही त्यासाठी पैसे वाढवून देऊ आणि बरेचसे प्रश्न कमी करू आणि मी हे सर्व शिक्षक आणि प्राध्यापक संघटनेला सांगितले आहे. आजही येथ् मोर्चे येत आहेत. मी, मोर्चामध्ये जाऊन त्यांना हे सर्व सांगत आहे. डी.एस.पीं.चे म्हणणे असते की, आपण येथे येऊ नका, लोक चिडले आहेत. पण मी त्यांना सांगितले की, त्यांना काय वास्तव आहे हे सांगितले पाहिजे. मी मोर्चाला सामोरे जाऊन त्यांच्यासमोर वास्तव ठेवतो आणि ते माझे म्हणणे मान्य करतात. कधी तुम्ही सरकारमध्ये आहात, कधी आम्ही सरकारमध्ये आहोत, परंतु सरकार हे सरकार असते. आपणास जर शिक्षण मंत्र्यांना दोष द्यायचा असता तर आपण त्यावेळी जे शिक्षण मंत्री होते त्यांच्यावर 304 आणि 307 ची मागणी केली असती असे मला वाटले होते. कारण त्यांनी तो जी.आर.काढला होता. मला ज्या दिवशी हे कळले त्याच दिवशी मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगितले की, कायदा सर्वांना समान असतो. त्यांना गुन्हा दाख करु द्यावा. माझी चौकशी होईल त्यावेळी मी सर्व कागदपत्रे देईन. पूर्वीच्या अशा अशा निर्णयामुळे त्यांनी आत्महत्या केलेली आहे हे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सांगेन. त्यावेळी जे कोणी होते त्यांच्यावर खटला दाखल केला पाहिजे असे येथे मांडले जाणे अपेक्षित होते पण हे येथे मांडले गेले नाही.

सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, येथे समाजाच्या प्रश्नाला न्याय दिला पाहिजे. आपणास राजकारण करण्यासाठी बाहेर मैदान मोकळे आहे. लोकांना न्याय देण्याची मानसिकता असेल तर हे थांबेल कसे हे पाहिले पाहिजे. ज्यावेळी हा जी.आर.काढण्यात आला. त्यावेळी मी असे म्हटले की, ज्यांच्याकडे शैक्षणिक पात्रता आहे परंतु ते वयोमर्यादेमध्ये बसत नसतील तरी देखील त्यांना कायम केले पाहिजे. या संदर्भात माझा विभाग सामान्य प्रशासन विभागाबरोबर भांडण करणार आहे. आमचा तसा आग्रह आहे. आपण त्याला काही वर्षे सातत्याने कमी पगारावर ठेवणार आणि ज्यावेळी पद भरण्याची वेळ येणार त्यावेळी त्याचे वय वाढले आहे म्हणून घेता येणार नाही असे त्याला सांगत असाल तर ते कसे चालेल ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

तुम्ही त्याची इतके दिवस सेवा घेतली आणि ज्यावेळी त्याला खऱ्या अर्थाने न्याय देण्याची वेळ आली त्यावेळी त्याचे वय वाढल्यामुळे आता दुसऱ्यांना घेणार काय, या गोष्टी कोठे तरी थांबवाव्या लागतील. त्या थांबवित असताना किमान या ज्येष्ठांच्या सभागृहात या विषयाला न्याय मिळेल अशी चर्चा करीत पुढे गेले पाहिजे. परंतु तसे होताना दिसत नाही. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले ते बरोबर आहे. ते म्हणाले की, मुद्याला सोडून हे सर्व चालले होते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी शाळांच्या पुनर्मूल्यांकनाचा मुद्दा मांडल. या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, शाळांचे मूल्यांकन झाले. ज्या शाळा मूल्यांकनास पात्र ठरल्या त्यांची टेस्ट केस म्हणून फेरमूल्यांकन केल्यानंतर त्यातील 90 टक्के शाळा पुन्हा फेल दिसावयास लागल्या. आम्ही सरसकट सर्व शाळांची टेस्ट करीत नाही. विशिष्ट भागातील लोकप्रतिनिधी, विद्यार्थी आणि पालक यांच्याकडून ज्या तक्रारी येतात त्या अनुषंगाने तपासणी करण्यात येते. कारण सामान्य माणसाच्या घामाचा पैसा घेऊन कोणी जर आपल्या संस्था चालविणार असतील तर ते मी होऊ देणार नाही. असे प्रकार थांबविणारच. मग अशा चुकीच्या संस्थांच्या बाजूने कोणीही उभे राहिले तरी ते प्रकार मी थांबविणारच. ज्या संस्था चांगल्या असतील त्या संस्थांच्या पाठीमागे हे शासन नक्की उभे राहील. एवढेच नव्हे तर चुकीच्या संस्थांना देण्यात येणारा निधी चांगल्या संस्थांना वाढवून देऊ. मी सभागृहाच्या माध्यमातून विनंती करतो की, चुकीच्या संस्थांना कोणीही पाठीशी घालू नये.

तसेच दुसरी बाब अशी की, सन्माननीय सदस्यांकडून आलेले पत्र पुरावा म्हणून मी ठेवत नाही. कारण मी सुध्दा इतरांना पत्र देत असतो. वास्तविक पाहता लोकप्रतिनिधींनी एखादे पत्र दिल्यानंतर आपणही जबाबदारीने सांगायला पाहिजे की, अमुक बाब तुम्ही तपासून घ्या. कारण लोकप्रतिनिधींकडे माणसे कसे तगादा लावतात हे मला सुध्दा माहीत आहे. काही लोक केवळ पत्र देऊन थांबत नाहीत, प्रत्यक्ष येऊन भेटतात, बसतात आणि आपले काम करुन घेतात.

महोदय, मुंबईतील माझ्या कार्यकर्त्याच्या शाळेबाबत माझ्याकडे तक्रार आली होती. मी त्या कार्यकर्त्याला सांगितले की, तुझ्या शाळेतील त्रुटी महिन्याभरात दूर कर, नाही तर मला शाळेवर कारवाई करावी लागेल. आपला कार्यकर्ता आहे म्हणून आपण चुकीच्या गोष्टीचे समर्थन करणे अजिबात अभिप्रेत नाही. शिक्षण विभागामध्येच नव्हे तर कोणत्याच विभागामध्ये चुकीच्या गोष्टींचे





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

समर्थन करता कामा नये. त्यातल्या त्यात विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा जेथे संबंध आहे त्या ठिकाणी तर करताच कामा नये. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी जो मुद्दा मांडला त्या अनुषंगाने सांगतो की, तो मुद्दा लवकरच निकाली निघेल. तो मुद्दा निकाली निघाल्यानंतर या सर्व बाबी आम्ही नियमानुसार सुरु करणार आहोत.

महोदय, न्यायप्रविष्ट असलेल्या विषयांच्या बाबतीत सांगतो की, येत्या काही दिवसांमध्ये त्या बाबतचा निर्णय लागेल. ही प्रकरणे पदनिर्मितीच्या विषयाशी संबंधित आहेत. या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, केंद्र सरकारने सुरु केलेल्या योजना राज्यात तीन-पाच वर्षे चालतात आणि नंतर मध्येच त्या बंद पडतात. कारण त्या योजनांचा बोजा राज्य सरकारला परवडत नाही. योजना बंद झाल्यानंतर त्या ठिकाणी काम करणारी मंडळी बेकार होते आणि मग त्यांच्यासाठी आंदोलन करण्याच्या बाबतीत धावपळ सुरु होते. शिवाय काही नेत्यांची भाषणे ऐकल्यानंतर त्या लोकांमध्ये आशा बळावते. पण अचानक जेव्हा सत्य समोर येते तेव्हा तरूण आत्महत्येकडे वळतात. त्यामुळे आंदोलन सुध्दा जबाबदारीने केले पाहिजे. या निमित्ताने माझी लोकप्रतिनिधींना सुध्दा विनंती आहे की, शिक्षकांच्या प्रश्नांचे वास्तव त्यांच्या निदर्शनास आणून देऊन, त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षक त्यांच्या अडचणींबाबत भेटायला आल्यानंतर तुमचे काम आम्ही करु, आम्ही मिळवून देऊ, तुमचे काम आम्ही करणारच आहोत किंवा आपल्या कामासाठी मुंबईला या, नागपूरला अशा आशा आपण त्यांना दाखवित असतो. त्यानंतर आपण तो विविध ठिकाणी मुद्दा मांडतो. वास्तविक पाहता त्या अडचणींबाबत काही होणार नसते. त्यामुळे या बाबतचा विचार कोठे तरी केला पाहिजे. सय्यद सारखे तरूण आपण निर्माण तर करीत नाही ना, याचा सुध्दा विचार केला पाहिजे. वास्तविक पाहता न्यायालयाने ही बाब मान्य केलेली नाही. न्यायालयाने पदे मान्य करायला लावली आहेत. या विषयी संबंधित सर्व विद्यार्थ्यांचे मला फोन येतात. ते मला सांगतात की, सभागृहात असे मांडण्यात आले की, कोर्टाने आमची मागणी मान्य केली आहे. त्या विद्यार्थ्यांनी नाव घेऊन सांगितले. आम्हाला याचा फायदा मिळणार काय, अशी ते माझ्याकडे विचारणा करीत होते. मी त्यांना सांगतो की, शिक्षण मंत्री म्हणून तुमचा माझ्यावर विश्वास असेल तर न्यायालयाने आपले म्हणणे मान्य केलेले नाही. पण प्रस्तावावरील

..3..



SJB/ ST/ पूर्वी श्री.अजित... 14:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चर्चा सुरु करतानाची भाषणे बाहेर रिपोर्ट झाली आहेत. वास्तविक या गोष्टीला मान्यता दिली नसताना त्यांच्या आशा पल्लवित झाल्या. नंतर त्यांना समजते की, यात काहीही झालेले नाही, मग ते आत्महत्याकडे वळतात. आपण आंदोलनाच्या माध्यमातून अशा गोष्टी करीत तर नाही ना याचे आपणास आत्मचिंतन करावे लागेल. त्यांच्या आशा किंवा अपेक्षा किती वाढवायच्या आणि किती अपेक्षांपर्यंत त्यांना नेऊन ठेवायचे, या बाबत सुध्दा आत्मचिंतन करावे लागेल. मला हे माहीत आहे की, चळवळीमध्ये काम करताना 10-20 गोष्टी मांडाव्या लागतात. त्याशिवाय आंदोलन आणि चळवळ उभी राहू शकत नाही. परंतु समोरच्यांना अपेक्षापेक्षा जास्त आशा दाखवायला लागलो आणि त्याचा ब्रेक डाऊन झाला तर मानसिक त्रास होतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत, त्या मुद्यांना धरुन मी उत्तर दिलेले आहे.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुचविल्यानुसार या बाबतीत बैठक आयोजित करण्यात येईल. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, शिक्षक आठवड्याला 45 तास काम करतो आणि अंशकालीन शिक्षक 4 तास काम करतो. अंशकालीन शिक्षकाला शिक्षक कसे गृहीत धरावे हा प्रश्न पडतो. या बाबत कायद्यात नमूद केलेले आहे. या दोघांना एकच समजावे असा आग्रह कोणी धरला आणि तो सरकारने मान्य केला नाही तर लगेच ती माणसे न्यायालयात जातात. न्यायालयात ते प्रकरण दोन-तीन वर्षे फेटाळले जाते आणि त्यानंतर त्या मंडळींना फ्रस्ट्रेशन येते. 45 तास काम करणाऱ्या शिक्षकाला शिक्षक म्हटले जाते. पण अंशकालीन निदेशक म्हणून 4 तास काम करणाऱ्याला सुध्दा शिक्षक म्हणावे असा आग्रह धरला तर कसे चालेल ? आपण वास्तवाला धरुण काही तरी मागणार आहोत की नाही, की केवळ लोक आपल्याकडे येतात म्हणून त्यांना आशा दाखविण्यासाठी या गोष्टी करणार आहो्त ? नियमात जे काही असेल ते मी 100 टक्के करुन घेईन, ही माझी जबाबदारी आहे. पूर्वीच्या सरकारच्या काळात शिक्षण विभागाशी संबंधित असलेला प्रश्न उपस्थित झाल्यानंतर सांगितले जायचे की, या विषयीची फाईल शिक्षण विभागाकडून अर्थ विभागाकडे गेली आहे, सामान्य प्रशासन विभागाकडे गेली आहे. मी सांगितले आहे की, अशा प्रकारचे उत्तर मी देणार नाही. मग तो कोणताही विभाग असो, सरकार मधील मंत्री म्हणून ते काम होईल की होणार नाही हे मी स्पष्टपणे सांगेन. या ठिकाणी कातडी वाचविण्याचा प्रश्न नाही.

..4..

या विषयी नक्कीच बैठक घेतली जाईल. त्या बैठकीला सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, नागो गाणार, विक्रम काळे आणि इतरही सन्माननीय सदस्यांना बोलविण्यात येईल. हे नक्की आहे की, कोणत्याही शिक्षकाची नोकरी जाणार नाही ही हमी शिक्षण मंत्री या नात्याने मी देतो. या चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित झालेले इतर मुद्दे मुंबई येथे होणाऱ्या बैठकीत सोडविण्यात येतील.

**उप सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी एक मिनिटात आपला प्रश्न विचारावा.

श्री.नागो गाणार : महोदय, लक्षवेधी सूचनेवर जे निवेदन आले आहे त्या संदर्भात माझा प्रश्न आहे. सन 2013-14 चे संच निर्धारण झाले आहे. हे निर्धारण आर.टी.ई. च्या तरतुदीनुसार आहे. ते दिनांक 23/10/2013 च्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधाच्या शासन निर्णयाच्या आधारावर झाले. या दोन्ही मुद्यांना उच्च न्यायालात आव्हान देण्यात आले. या विषयी उच्च न्यायालयाने स्टे दिला आहे. उच्च न्यायालयाच्या स्टेचा आदर करुन सन 2013-14 चे संच निर्धारण स्थगित करणार काय ?

श्री.श्रीकांत देशपांडे : सभापती महोदय, सध्या शाळांचे पुनर्मूल्यांकन सुरु आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये अतिशय भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्यावेळी प्रत्यक्षात अनुदान देतो त्यावेळी प्रत्येक विद्यालयाची फाईल शिक्षणाधिकाऱ्यांकडे येत असते. ती फाईल पाहून प्रत्यक्ष अनुदान दिले तर चालेल. महोदय, फेरतपासणीच्या मुद्यावर कृपया स्थगनादेश द्यावा, अशी आम्हा सर्व शिक्षक आमदारांची कळकळीची विनंती आहे. सरकारने स्थगनादेश दिल्यास शिक्षकांमध्ये काही दिवसांसाठी तरी शांततेचे वातावरण निर्माण होऊन, त्यांच्या आत्महत्या थांबतील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सदोष संच मान्यतेला आणि पात्र झालेल्या शाळांच्या फेरमूल्यांकनाला स्थगिती देण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. परंतु या दोन्ही बाबींना कलाटणी मिळालेली आहे. या दोन्ही मुद्यांचे माननीय मंत्र्यांकडून उत्तर आलेले नाही. त्यांनी जोरदार भाषण केल्याबद्दल त्यांना सर्व गुण देण्यास आम्ही तयार आहोत.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील........

परंतु, विषयाला न्याय देणे, विद्यार्थ्यांना न्याय देणे, हे त्यांच्याकडून झालेले नाही. कृपा करुन त्यांनी तो द्यावा. राजकीय भाषण सर्वांनाच करता येते, त्याबद्दल वाद नाही. परंतु, विषयाला न्याय देणे गरजेचे आहे. कला, क्रीडा शिक्षकांचे पद स्वतंत्रपणे निर्माण केले पाहिजे. हे कोर्टाने सांगितले आहे, ते बरोबर सांगितले आहे. पण ते कधी करणार आहात ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही सर्व सन्माननीय सदस्य व राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शिक्षण मंत्री महोदयांच्या उत्तराकडे डोळे लावून बसलो होतो.

**उप सभापती** : सन्मानननीय सदस्यांनी भाषण करु नये. प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी प्रश्नाकडेच येतो आहे. मंत्री महोदय किती सकारात्मक उत्तर देत आहेत, हे मी सांगतो आहे. मंत्री महोदय असे म्हणाले की, आमचे अभिनंदन केले पाहिजे. आम्ही त्यांचे अभिनंदन करण्याची वाट बघतो आहोत. पण ती संधी ते देत नाहीत. संच मान्यता दरवर्षी केली जाते. सन 2013-2014 हे वर्ष संपलेले आहे. सन 2014-2015 हे वर्ष देखील अर्धे संपलेले आहे. या वर्षाची संच मान्यता अद्याप झालेली नाही. आपण मागील वर्षाच्या संच मान्यतेवर कार्यवाही करीत आहात. हेच मुळात चुकीचे आहे. त्या कार्यवाहीला आपण स्थगिती देणार का ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की,........

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी केवळ एकच प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, एकच उप प्रश्न असा आहे की, दिनांक 23/10/2013 चा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधाच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. सरकारवर कडक ताशेरेही ओढले आहेत. असे असताना आपण त्याची अंमलबजावणी करीत आहात. हा न्यायालयाचा अवमान आहे. त्याबाबतीत शासन फेरविचार करणार का आणि त्या कार्यवाहीला स्थगिती देणार का ? माझा शेवटचा प्रश्न असा आहे की........

**उप सभापती** : आता आपण प्रश्न विचारु नये. सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांना एक उप प्रश्न विचारण्याची संधी मी देतो. त्यांनी लवकर प्रश्न विचारावा. कामकाज सल्लागार समितीची बैठक सुरु झाली आहे.

..2.....

श्री.विक्रम काळे : केवळ एकच प्रश्न आहे.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक मी आता स्थगित करीत आहे. दुपारी 3.15 वाजता बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.32 वाजेपासून दुपारी 3.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------

यानंतर श्री.मा.शिगम........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ. शी.** : नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम त्वरित पूर्ण करणे

**मु.शी.** : नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम त्वरित पूर्ण करणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील हवाई वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे जगातील सर्वात मोठा आंतरराष्ट्रीय ग्रीनफील्ड विमानतळ प्रस्तावित असणे, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतिवर्षी प्रवासी क्षमता ४० दशलक्ष पर्यंत वाढण्याची शक्यता असणे, परंतु २०३० वर्षात या क्षेत्रातील वाहतुक क्षमता १०० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष असल्याचे अपेक्षित असल्याने जवळपास ६० दशलक्ष क्षमतेच्या नवी मुंबई विमानतळाची गरज निर्माण झाली असणे, या विमानतळांना आंतरराष्ट्रीय विमाने उतरविण्याच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असणे, नवी मुंबई विमानतळासाठी आवश्यक त्या सर्व मान्यता आणि परवाने सिडकोने प्राप्त केले असणे, विमानतळ प्रकल्पग्रस्तांना सिडकोने देऊ केलेला मोबदला, पुनर्वसन आणि पुन:स्थापना पॅकेजला राज्य शासनाने मान्यता दिलेली असणे, नवी मुंबई येथे होणाऱ्या विमानतळामुळे रोजगार आणि व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होणार असणे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडून तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत प्रतिक्रिया "

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, अत्यंत ज्वलंत आणि महत्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याची मला आपण संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि माननीय मुख्यमंत्र्यांनाही धन्यवाद देतो.

सभापती महोदय, नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रकल्प राज्यासाठी नव्हे तर देशासाठी सुध्दा अभिमानास्पद आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार असल्याने संपूर्ण जगाचे या विषयाकडे लक्ष लागले आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मी याच विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. मी या विषयाबाबत सतत पाठपुरावा करीत आहे. आघाडी सरकारने या प्रकल्पाच्या कामाबाबत बरीच प्रगती केली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री स्वत: या कामाबाबत लक्ष देत होते. विद्यमान मुख्यमंत्री महोदयांनी या प्रकल्पाच्या कामाला चालना देण्यासाठी बैठक बोलावली आहे. हा प्रकल्प आमच्यासाठी, राज्यासाठी आणि देशासाठी सुध्दा महत्वाचा आहे. पूर्वीच्या सरकारने या प्रकल्पाचे लवकर पूर्णत्वास जावे म्हणून पुनर्वसनासाठी 22.5 टक्क्याचे युनिक पॅकेज आणले होते.

सभापती महोदय, आज या प्रकल्पाबाबत काही नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. आज या प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे, प्रकल्पासाठी आवश्यक असलेली संपूर्ण जमीन संपादन झाली आहे की अद्याप संपादन करणे बाकी आहे, पर्यावरणाच्या दृष्टीने बरेच इश्यू क्लिअर झाले होते, काही इश्यू पेंडिंग होते ते क्लिअर झाले आहेत काय?

नंतर एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले.......... 15:20

श्री. संजय दत्त ........

राहिले असतील तर ते कोणते इश्यूज आहेत ? दुसरे म्हणजे प्रकल्पग्रस्तांना देशात पहिल्यांदाय एक युनिक आणि आगळेवेगळे पॅकेज देण्याचा जो प्रस्ताव होता त्याला काही प्रकल्पग्रस्तांचा विरोध होता त्याची सद्य:स्थिती काय आहे ? या कामासाठी आतापर्यंत जो डिले झालेला आहे तो लक्षात घेता त्याची फेजवाईज परिस्थिती काय असून त्याबाबत शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपणा सर्वांनाच कल्पना आहे की, हा प्रकल्प देशात अत्यंत महत्वाचा तर आहेच पण राज्यातही खूप महत्वाचा असून सर्वात मोठा ग्रीन फिल्ड एअरपोर्ट म्हणून देशात गणला जाईल असा हा प्रकल्प आहे. त्यासाठी 14573 कोटी एवढा खर्च येणार असून या एअरपोर्टची 60 मिलियन इतकी प्रवासी क्षमता असेल. मुख्य एअरपोर्ट आणि अलाईड ॲक्टीव्हीटीज मिळून 2200 हेक्टरचा हा प्रोजेक्ट असून त्यात काही पर्यावरणाच्या क्लिअरन्स बाकी होत्या पण मध्यंतरीच्या काळात मी माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांना भेटलो आणि ते स्वत: मुंबईला आले होते, त्यानंतर पर्यावरणाच्या बाबतीतील सर्व मान्यता त्यांनी दिलेल्या आहेत. आर अँड आर चे जे इश्यूज होते त्यासंदर्भात पर्सनल पॅकेज शासनाने दिले आणि मला वाटते देशातील हे सर्वात मोठे पॅकेज असेल. या पॅकेजचा क्वांटिटीवाईज विचार केला तर 14 कोटी रुपये पर हेक्टरी इतकी किंमत त्याची होऊ शकते. पण प्रत्यक्ष पैशात दिले असते तर पैशांची व्हॅल्यू दिवसेदिवस कमी होत जाते म्हणून जमीन आणि घर यांची किंमत वाढतीच राहते म्हणून 22.50 टक्के जमीन आणि सध्याचे राहते घर असेल त्याच्या तीन पटीने घर अशा प्रकारचे पॅकेज आपण या प्रकल्पग्रस्तांना दिलेले आहे. समाधानाची बाब म्हणजे या पॅकेजला 91 टक्के लोकांनी समाधान मानून आपली संमती पत्र दिलेली आहेत. त्यात 671 हेक्टरपैकी 592 हेक्टरची संमती पत्रे आपल्याला प्राप्त झाली आहेत. जेथे कोअर ॲक्टीव्हीटीज करावयाच्या होत्या ती जमीन जवळपास सर्वच ताब्यात आलेली आहे. उर्वरित जे प्रकल्पग्रस्त या पॅकेजला समाधानी नाहीत ते 8 ते 9 टक्के इतकेच असून त्यातील काही लोकांचा प्रश्नही मिटण्यासारखा आहे आता फक्त 5 टक्के लोकांना मान्य नाही असेच लोक हायकोर्टात गेले होते. हायकोर्टात त्यांना अपयश आले आणि कोर्टाने सुध्दा शासनाने दिलेल्या पॅकेजपेक्षा जास्त देता येणार नाही असे रुलिंग दिलेले आहे त्यामुळे शासनाने कायद्याप्रमाणे कारवाई सुरु केलेली आहे. या लोकांना जेवढे जास्तीत जास्त

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस .........

देता येईल ते देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील, म्हणून जमिनीच्या बाबतीतील अडचण सुध्दा आता संपलेली आहे. तिसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे इकॉनॉमिक मॉडेलमध्ये महसुलाच्या आधारावर आपले पॅक्स ठरत असते व त्यानंतर त्याचे बिडींग होत असते. मग सिंगल टील द्यावयाचे की शेअर टील द्यावयाचे पण इकॉनॉमिकली जे योग्य प्रकारे बसते तो विचार करुन 30 टक्क्याची सूट आपण देऊ शकतो. मुंबईचे सध्याचे जे एअरपोर्ट आहे तेथे सुध्दा आपण शेअर टील अलाऊड केलेले आहे पण येथे आपल्याला तसा प्रतिसाद मिळाला नसता. यासाठी आपण आरएफक्यू बोलाविले होते पण ते पुढे ढकलावे लागले असते. त्याशिवाय ते फायनल होत नव्हते. मध्यंतरी मी दिल्लीला गेलो होतो तसेच मागील आठवड्यात सुध्दा दिल्लीला गेलो आणि शेअर टीलची मागणी मान्य केली त्यामुळे जो आरएफक्यू काढला आहे त्याची डेट एक्स्टेंड करण्याची आवश्यकता नाही. याचा अर्थ जानेवारीच्या 31 तारखेपर्यंत हे सर्व प्रपोझल्स मिळतील. मी आज हे सांगण्याच्या परिस्थितीत आहे की, यातील सर्व अडथळे आता पूर झालेले असून आपण जो आएफक्यू ठरविला आहे तो त्याच तारखेला असेल. त्यावरच आपण स्टिक-अप राहिलो तर निश्चितपणे आपल्या मनात असल्याप्रमाणे 2019 साली विमान निश्चितपणे उडू शकेल अशा परिस्थितीपर्यंत आपण आलो आहोत. आपणास कल्पना आहे की या भागात दोन प्रकारची नगरे वसविली जाणार आहेत. त्यात एक म्हणजे ज्यांना 22 टक्के जमिनीचे आश्वासन दिले आहे त्यांच्याकरिता पुष्पकनगर नावाची वसाहत असून त्यासंबंधीच्या जागेची पूर्ण तयारी झालेली आहे. दुसरे गावठाण जे शिफ्ट करावयाचे आहे ते वर्धळ, वघाळ आणि करंगाळा या ठिकाणच्या लोकांसाठी सर्व व्यवस्था झालेली आहे व त्यात आता कोणतीच अडचण राहिली नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या 40 दिवसांच्या कारकिर्दीत अत्यंत चांगला अभ्यास केलेला आहे, त्यांनी अतिशय सविस्तर आणि चांगले उत्तर दिलेले आहे. मी शेतकऱ्यांच्या वतीने या प्रकल्पग्रस्तांचे नेतृत्व करणारा एक कार्यकर्ता आहे. या निमित्ताने माझ्या तीन मागण्या आहेत की, या भागातील संपादित केलेली जमीन आणि क्वारिज तातडीने ताब्यात घ्याव्यात. याचे कारण असे की, या क्वॉरिज आणि जमिनीमधील माती व दगड काढून पुढे जेएनपीटीला नेण्याची जास्त शक्यता असून आपण आपले काम करताना मात्र आपल्याला बाहेरुन

.......2



PFK/ पूर्वी श्री. भोगले........... 15:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ........

माती व दगड आणण्याची वेळ येऊ शकते म्हणून ती जमीन व क्वॉरिज ताबडतोब ताब्यात घ्याव्यात. दुसरे म्हणजे या भागातील आयटीआय, डिप्लोमा आणि इंजिनिअरिंग कॉलेजमधील लोकांना एअरपोर्ट सुरु होण्याच्या अगोदरपासूनच पाच वर्षे प्रशिक्षण द्यावे जेणेकरुन प्रत्यक्ष हे एअरपोर्ट सुरु झाल्यानंतर आपण बाहेरच्या लोकांना रोजगार देण्यापेक्षा या भूमीपुत्रानाच तो रोजगार मिळू शकेल. तसेच आपल्याला जेवढे मनुष्यबळ लागणार आहे त्याच्या दुप्पट मनुष्यबळाला प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी, या दोन गोष्टींबाबत शासन विचार करणार काय ?

नंतर श्री. भारवि........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

श्री.संजय भाटिया नावाच्या अधिकाऱ्याने शेतकऱ्यांसह सर्व राजकीय पक्षांशी चर्चा करून चांगले पॅकेज तयार केले आहे. माझ्या माहिती प्रमाणे रायगड जिल्ह्यातील सर्वांचे एकमत होऊन तयार झालेले हे पहिलेच चांगले पॅकेज आहे. या पॅकेजचे संपूर्ण श्रेय मी श्री.संजय भाटिया या अधिकाऱ्यांना देतो. याचे श्रेय माननीय मुख्यमंत्र्यांना देखील द्यायला मी तयार आहे. ज्या अधिकाऱ्याने चांगले काम केले आहे त्याचे कौतुक देखील केले पाहिजे. याचे कारण असे की, आम्ही सभागृहामध्ये अधिकाऱ्यांवर नेहमी टीकाच करीत असतो. या पॅकेजसाठी सिडकोच्या ज्या अधिकाऱ्यांनी काम केले आहे त्यांना मी धन्यवाद देतो. मी येथे ज्या तीन सूचना केल्या आहेत त्या माननीय मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने घेतल्या तर पुढे निर्माण होणारे धोके व वाद आपल्याला टाळता येऊ शकतील. आता ते जागा ताब्यात घेतील आणि ती जागा सोडविण्यासाठी परत हायकोर्टात जातील. या विमानतळासाठी माझी स्वत:ची साडेसहा एकर जागा गेलेली आहे. हे पॅकेज सुंदर आहे. या विमानतळामुळे स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध होईल. त्यामुळे तेथील स्थानिक युवकांना रोजगार मिळण्यासाठी शासनातर्फे कशा प्रकारे प्रयत्न करण्यात येणार आहेत याची देखील माहिती माननीय मुख्यमंत्री महोदयांनी द्यावी.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी चांगल्या सूचना मांडल्या आहेत. त्यांनी सर्वात पहिला प्रश्न हा दगड खाणींच्या संबंधात उपस्थित केला आहे. त्याचा हा विषय तत्त्वत: योग्य आहे. त्यातील कायदेशीर बाब तपासून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. या विमानतळासाठी आपल्याला खूप मोठ्या प्रमाणावर मॅनपॉवर लागणार आहे. त्यांनी स्थानिक युवकांना प्रशिक्षण देण्यासंबंधातील विषय मांडला आहे. त्यासंबंधी रोजगार व स्वयंरोजगार विभागाला योग्य त्या सूचना देण्यात येतील. आपण आता येथे स्कील्ड डेव्हलपमेंटचा कार्यक्रम सुरू केलेला आहे. तसेच दोन नगरे देखील वसवणार आहोत. तेथे देखील तशा प्रकारची सोय करण्यात येईल. स्वत: सिडकोने गावकऱ्यांच्या कॅपॅसिटी ब्लिडींगचा प्रोग्रॅमदेखील तयार केला आहे. तेथे प्रशिक्षण संस्थांची निर्मिती करावी लागली तर ती देखील करण्यात येईल. तेथे नोकरीची संधी तयार होण्याच्या आधीच गावकऱ्यांना प्रशिक्षित कसे करता येईल याबाबतचे सगळे कार्यक्रम आखले जातील आणि ते घोषित देखील केले जातील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी अत्यंत महत्त्वाची लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. नवी मुंबई येथे होणारा विमान तळाचा प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्राच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. भविष्यामध्ये महाराष्ट्राला उन्नतीकडे नेणारा हा प्रकल्प आहे. तत्कालीन शासनाने या विमानतळासंबंधी आवश्यक असलेल्या पर्यावरणाच्या संबंधातील परवानगी प्राप्त करून घेतली होती. देशातील कुठल्याही राज्याने दिले नाही एवढे चांगले पॅकेज या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या लोकांना शासनाने दिले आहे. हे देशातील मोठे शहर बनेल. तेथे मेट्रो, मोनो रेल्वे या सर्व सुविधा होणार आहेत. प्रकल्पग्रस्तांना 22.5 टक्के दराने विकसित जमीन देण्यात आलेली आहे. या प्रकल्पाला वेळ लागू नये अशी सर्वांची इच्छा आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सन 2019 मध्ये या विमानतळावरून विमान उडेल असे भाकित केले आहे. शासनाने या कामाच्या संदर्भातील टेंडर कधी निघणार आहे, हे स्पष्ट केले तर मग पुढचा काळ ठरविता येईल. तेव्हा टेंडर काढण्याची प्रोसेस राज्य कधी पूर्ण करणार आहे, असा माझा सवाल आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, टेंडर प्रोसेस सुरु झालेली आहे. याचाच पहिला भाग म्हणजे आर.एफ.क्यू आहे. त्यानंतर मग आपल्याला फायनान्शीयल बिडींग घ्यावे लागते. हा मुख्य बिडींगचाच भाग आहे. आर.एफ.क्यू.फ्लोट झालेले आहे. आपण शेअर टील्डचा निर्णय घेतला होता म्हणून आपण मुदतवाढ दिली होती. तो निर्णय देखील आलेला आहे. आपण आर.एफ.क्यू.साठी 31 तारीख दिलेली आहे. आर.एफ.क्यू.आल्यानंतर फायनान्शीयल बिड करता तारीख देण्यात येईल. याचा अर्थ टेंडर प्रोसेसला सुरूवात झालेली आहे असा होतो. आता मॅन्युअलप्रमाणे जेवढे दिवस द्यावे लागतात तेवढ्या दिवसात त्या संबंधातील कार्यवाही होईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दृष्टीने वेगवेगळ्या प्रश्नांच्या संदर्भात सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. हा आंतरराष्ट्रीय प्रकल्प होत असल्यामुळे सिडकोने नैना नावाचा प्रकल्प होती घेतला आहे. या विमानतळाच्या 25 कि.मी.च्या परिघामध्ये सदर प्रकल्प कसा करावयाचा याची प्लानिंग ऑथॉरिटी सिडको आहे. रायगड जिल्ह्यातील काही क्षेत्रात सिडको नियोजन प्राधिकारी आहे,

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

उरण तालुक्यातील खोपटा येथे नवीन टाऊन शिप उभी रहात असून सिडको प्लानिंग ऑथोरिटी आहे. आमच्या रायगड जिल्ह्यात एमएमाआरडीए सुद्धा प्लानिंग ऑथोरिटी आहे. जिल्ह्यात 25 वर्षापासून रिजनल डेव्हलपमेंट प्लॅन असल्यामुळे कलेक्टर देखील प्लानिंग ऑथोरिटी आहे. पेण शहरापर्यंत 25 कि.मी.परिघाची रेषा जाते, खाली कर्जत, खोपोली पर्यंत ती रेषा जाते. त्यामुळे यामध्ये जेवढे कमाल असेल तेवढ्या लिमिट पर्यंत तो भाग सीमित करून नैनाच्या तावडीतून मोकळा करून मग टाऊन प्लानिंगच्या दृष्टीने जे काही बंधन आणावयाचे असेल ते आणावे. हे आंतरराष्ट्रीय विमानतळ असल्यामुळे किती उंची पर्यंत घरे असली पहिजेत याला मर्यादा असते हे आम्हाला मान्य आहे. पण ज्या दिशेने विमान उडणार आहे त्याच्या विरुद्ध दिशेतील परिसर नैनाच्या परिघामध्ये आणून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार आहे. आपले पॅकेज हे बाधित शेतकऱ्यांसाठी आहे. पण 25 मीटरमुळे जे बाधित होणार आहे त्यांचे तर वेगळचे काही तरी होणार आहे. तेव्हा 25 कि.मी.परिघाचा पुनर्विचार शासन करणार आहे काय तसेच विशिष्ट कालावधीमध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पावले उचलली जातील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांच्या निदर्शनास मला एक गोष्ट आणून द्यावयाची आहे की, शासनाने नैना प्रकल्प हातामध्ये घेतलेला आहे. खरे म्हणजे 600 स्क्वेअर मीटरमध्ये आपण नवीन शहर वसविणार आहोत. हे शहर मुंबईपेक्षा मोठे राहणार आहे. याचे कारण एअरपोर्ट केल्यानंतर तेथे इकॉनॉमिक इको सिस्टीम तयार होत असते. त्याचा लाभ शासनाला व नागरिकांना मिळतो. आता आपण नैनामध्ये लँड पुलिंगची भूमिका स्वीकारली आहे. नैना प्रकल्पांतर्गत आपण कोणाचीही जमीन संपादित करणार नाही. लँड पुलिंगच्या पॅटर्नसाठी रेशिओ ठरविण्यात येईल. यात वेगवेगळे पॅटर्न आहेत. हा पॅटर्न अहमदाबादमध्ये यशस्वी झाला आाहे. अनेक ठिकाणी यशस्वी झालेला आहे. या पॅटर्नमुळे आपल्याला आता भूसंपादनाचे काम करवे लागणार नाही. तसेच, याचा फायदा शेतकऱ्याला देखील

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

होणार आहे. शेतकऱ्याला उर्वरित जागा एफ.एस.आय.च्या स्वरूपात मिळणार आहे. त्यामुळे त्याच्या जागेची किंमती देखील वाढणार आहे. जागा संपादित न करता शेतकरी खूप मोठ्या प्रमाणावर सधन होतो. आता लँड पुलिंग पॅटर्न सुरू झाल्यामुळे लोक स्वत:हून यामध्ये सहभागी होण्यासाठी पुढे येत आहेत. 600 स्क्वेअर मीटरची हद्द आपण ठरविलेली आहे. मुंबई आणि नवी मुंबईचे कंजक्शन बघितले तर आपल्याला एका मोठ्या शहराची आवश्यकता आहे हे सहज दिसून येईल. यात आपली जी भावना आहे ती महत्त्वाची आहे. आज गावकऱ्यांना अनेक ऑथोरिटींना सामोरे जावे लागते. त्यांचे व्यववहार बंद होतात. लँड पुलिंग पॅटर्नमुळे आता आपल्याला अनंत काळापर्यंत थांबण्याची आवश्यकता भासणार नाही. विशेष नियोजन प्राधिकरण आता युझर प्लान तयार करण्याच्या स्टेजला आलेले आहेत. त्यानंतर फार काळ थांबण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे आज तरी जागा सोडण्याचे सिडकोच्या प्रस्तावामध्ये नाही.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ...

परंतु याही व्यतिरिक्त आपल्याला काही सूचवावयाचे असेल तर आम्ही आपले म्हणने समजून घेऊ.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, अगोदर प्लॅनिंग होणार आहे. शेतकऱ्याची जागा नो डेव्हलपमेंट झोनमध्ये गेल्यावर त्याला आपण अतिरिक्त एफएसआय द्याल किंवा टीडीआर द्याल. परंतु एफएसआय आणि टीडीआर वापरण्यासाठी त्या शेतकऱ्याजवळ जागा तर शिल्लक राहिली पाहिजे ? यासंदर्भात तुम्ही रिजनल डेव्हलपमेंट प्लॅनसारखी प्लॅनिंग ॲथोरिटी नेमाल त्यावेळी प्लॅनिंग ॲथोरिटीमध्ये डेव्हलपमेंट झोन किंवा क्रिडांगणासाठी जागा आरक्षित केल्या आणि त्यामध्ये एखादा शेतकरी पूर्णपणे बाधित झाला तर त्याला आपण म्हणता त्या रेश्योचा फायदा काही होणार नाही. त्यामुळे अशा शेतकऱ्यासाठी आपल्याला काय करता येईल हा महत्वाचा भाग आहे. ज्यावेळेस आपण 600 कि.मी. परिसिराचे नवीन शहर वसवाल, आज मुंबई, नवी मुंबईचे जे काही कंझेन्शन होते आहे त्यासाठी आपण जेव्हा उपाययोजना कराल त्यावेळेला या सर्व गोष्टींचा दुरगामी विचार करुन ओपन स्पेस ठेवण्याची कार्यवाही आपल्याला करावीच लागेल. परंतु हे करीत असतांना ज्याची जागा ओपन स्पेस मध्ये राहील त्याची जमीन सुध्दा तुम्ही संपादित करणार नाही आणि त्याला तुम्ही अतिरिक्त एफएसआय दिला तर तो कोठे वापरावयाचा किंवा त्याला मिळणाऱ्या टीडीआरचा वापर त्याने कसा करावयाचा हे सारे प्रश्न उपस्थित होणार आहेत. त्यामुळे यामध्ये स्पष्टता येण्यासाठी बैठक बोलावली जावी व यासंदर्भात हरकती व सूचना असतील तर त्याही मागवल्या जाव्यात आणि त्यानंतर शेतकऱ्यांच्या हिताला बाधा येणार नाही याची पूर्णपणे खबरदारी घेतली जावी.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली शंका योग्य आहे. परंतु लॅंड पुलिंग पॅटर्नमध्ये यावर उपाय आहेत. लॅंड पुलिंग पॅटर्नमध्ये ज्यावेळेस एखाद्याची जागा घेतली जाते त्यावेळेस त्याची असलेली 60 टक्के जागा त्याला विकास करण्यासाठी दिली जात असते. यासंदर्भातील रेश्यो अजून ठरावयाचा आहे परंतु आपल्याला समजावे म्हणून मी सांगू इच्छितो की, आपल्याजवळ उर्वरित जी 40 टक्के जागा असते त्यामध्ये आपण सर्व रेश्यो ठरवित असतो. समजा दोन आजूबाजूचे लोक आहेत त्यातील एकाच्या जमिनीवर आपण पूर्णपणे नो डेव्हलपमेंट झोन असेल तर उरलेली जी जागा आहे ती त्या रेश्यो प्रमाणे दोघांना मिळते. त्यामुळे लॅंड पुलिंग पॅटर्न मध्ये कोणाचेही नुकसान होत नाही. त्यामुळे जी वेगवेगळी आरक्षणे

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस.. ..

आहेत ती 40 टक्क्यामध्ये ॲडजस्ट केली जातात. आपल्याला विकासाकरिता जी जागा मिळते त्यामध्ये ओपन स्पेस, आरजी/पीजी किंवा कमर्शिअलसाठी मिळते त्यातून सर्व इन्फ्रास्ट्रक्चर फायनांस होते, किमान जे काही विकास शुल्क असते ते त्यातून फायंनास होते. ॲक्वीझिशनला 10-10 वर्षे लावल्यामुळे शेतकऱ्यांच्या खरेद्या बद होत होतात त्यामुळेच हा पुलिंग पॅटर्न आला आहे. ज्या ज्या ठिकाणी हा पॅटर्न लागू केला त्या त्या ठिकाणी तो अतिशय सक्सेसफूल झालेला आहे. त्यामुळे असे जे काही प्रॉब्लेम्स होते ते प्राब्लेम्स या पॅटर्नमध्ये येणार नाहीत. यासंदर्भात अजून काही शंका असेल तर त्यासंदर्भात एक बैठक घेऊन शंकाचे समाधान केले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, ग्रिनफिल्ड विमानतळाच्या प्रकल्पासंदर्भात सविस्तर माहिती दिल्याबद्दल धन्यवाद. मुंबईचा सद्या असलेला एअरपोर्ट त्यावेळी 6500 कोटी रुपयांना देण्यात आला होता. आता या एअरपोर्टची कॉस्ट 14 हजार कोटी रुपये असल्याची माहिती देण्यात आलेली आहे. यापूर्वी जुहू येथे छोटे एअरड्रम होते त्यानंतर सांताक्रुज आणि सहारचे मोठे विमानतळ झाले. आजही त्या सहार विमानतळाच्या लोकांना न्याय मिळालेला नाही. यासाठीची ॲग्रिमेंट एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया आणि पीपी तत्वावर येणारा जो कोणी पार्टनर असतो त्यांच्यामध्ये होत असते. या प्रकल्पामध्ये महाराष्ट्र शासनाची गुंतवणूक किती असणार आहे ? विमानतळासाठी शेतकरीच जागा देत असतो. 2019 नंतर हे विमानतळ फार मोठे होईल, त्या ठिकाणचा विकास मोठया प्रमाणात होईल परंतु आपण दोन एअर स्ट्रीप्स सांगितल्या आहेत परंतु त्यापुढे जाऊन सांगायचे झाले तर इंटरनॅशनल एअर पोर्ट, डोमॅस्टीक एअर पोर्ट, कार्गो मेन्टेनंस अशा वेगवेगळया असंख्य गोष्टी आहेत. विमानतळावर अवलंबून असलेल्या एवढयाच जागा अजून लागतील अशी कामकाज त्याच्या आजूबाजूला चालत असतात. त्यामुळे यासंदर्भातील प्लॅनमध्ये काय आहे ? जर असेल तर त्यावर कंट्रोल महाराष्ट्र शासनाचा राहणार आहे की, केंद्र सरकारचा राहणार आहे ? आज मुंबईतील एअरपोर्टमध्ये जीव्हीकेशी पार्टनरशीप केलेली आहे. आपण जर गेलो तर आपल्याला पोलीस स्टेशनलाही उभे करीत नाही, राज्य शासनालाही कोणत्याही गोष्टीत हस्तेक्षेप करु देत नाही.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकरु.

म्हणजे जागा स्थानिक लोकांच्या, त्या ठिकाणी दुसरेच लोक येऊन नोकऱ्या करतात आणि कमाई तिसरेच लोक करुन जातात अशी सद्याची स्थिती आहे. त्यामुळे यावर कंट्रोल आणण्यासाठी आपण पीपीपी मॉडेलवर ॲग्रिमेंट करणार आहात त्या ॲग्रिमेंटमध्ये राज्यातील लोकांना रोजगार मिळण्यासाठी किंवा ज्यांच्या जमिनी जाणार आहेत किंवा त्याच्या आजूबाजूला जे काही बिझीनेस निर्माण होणार आहेत त्यासाठी आपण नेमके काय करणार आहात ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना मांडलेली आहे. आपण जी एक्झिस्टींग एअरपोर्टची माहिती दिली आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडियाचा एअरपोर्ट पीपीपी मॉडेलवर जीव्हीके किंवा अजून कोणी असेल त्यांना तो दिला. परंतु हा एअरपोर्ट बांधण्यासाठी आपण जी काही व्यवस्था उभी करीत आहोत त्यामध्ये सिडकोची इक्वीटी 26 टक्के राहणार आहे. त्यामुळे या बोर्डामध्ये आपण आहोत. त्यामुळे आपला यावर कंट्रोल राहणार आहे. तरी देखील त्यासंदर्भात आपण वेगवेगळे करारनामे करु त्या त्या वेळी आपले जे काही प्रचलित नियम आहेत त्यांचा अंतर्भाव करण्यात येईल. जेणेकरुन स्थानिकांना अधिक प्राधान्य मिळेल. आपण इतर ज्या काही गोष्टी सांगितल्या आहेत त्यातील जवळपास सर्वच गोष्टींचा समावेश प्रकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

डॉ. अपुर्व हिरे : सभापती महोदय, इंटरस्टेट विमानांसाठी स्वतंत्र विमानतळ किंवा जुहूचे जे विमानतळ आहे त्या ठिकाणी स्वतंत्र विमानतळाच्या संदर्भात आपण नियोजन करीत आहोत काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आजही इंटरस्टेट विमानांसाठी कोणत्याही विमानतळावर हरकत घेतली जात नाही. आताचे आपले जे एअरपोर्ट आहे त्या ठिकाणी सुध्दा आपण इंटरस्टेट विमांनासाठी जागा देत असतो. उलट हे एअरपोर्ट झाल्यानंतर येथील गर्दी कमी होणार असल्यामुळे आपल्याला प्राईम टाईम उपलब्ध होऊ शकेल. नवीन एअरपोर्ट झाल्यानंतरही आपण हे एअरपोर्ट वापरातच ठेवणार आहोत. एअरस्ट्रीप्सचा वापर करुन डोमेस्टीकला कशी चालना देता येईल यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील. जुहू विमानतळाचा विकास करण्यासंदर्भात शासन विचाराधीन अहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अतिशय विस्तृत माहिती दिलेली आहे. दुसरा एअरपोर्ट तयार करीत असतांना वाहतुकीच्या बाबत आपण कितपत विचार केला याबाबत मला थोडी शंका वाटते. आपल्याकडे मेट्रो कनेक्टीव्हीटीच्या बाबतीत काहीही विचार केलेला नाही. एमएमआरडीएचा शिवडी-न्हवाशेवा ट्रान्सहार्बर लिंक प्रकल्पाच्या वेळेस मी एमएमआरडीएच्या सभेत सांगितले होते की, आपण यासाठी मेट्रो कनेक्टीव्हीटी ब्रिजला ठेवली पाहिजे जेणे करुन मेनलाईनची कनेक्टीव्हीटी एअरपोर्टशी होऊ शकेल नाहीतर मुंबईतल्या नागरिकाला विमानाने प्रवास करावयाचा असेल तर संपूर्ण रोडने जावे लागते. मेट्रो कनेक्टीव्हीटी झाली तर विमानतळावर कमी वेळेत पोहचता येईल व इन्फ्रास्ट्रक्चरवरील लोड कमी होऊ शकेल. त्यामुळे हा प्रकल्प सुरु करीत मेट्रो कनेक्टीव्हीटीचा निर्णय घेतला जाणार ओ काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी योग्य सूचना केली असून मेट्रो कनेक्टीव्हीटीचा निर्णय या प्रकल्पामध्ये करण्यात आलेला आहे. सिडकोने मेट्रो कनेक्टीव्हीटीचा विचार केलेला आहे. लोकल ट्रेनसाठी आपण एलिव्हेटेड कॅारिडॅार्स तयार करीत आहोत त्यातूनही कनेक्टीव्हीटी वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या दोन्ही सोबत आपण ज्या ट्रान्सहार्बर लिंकचा विचार केलेला ते देखील आपल्याला पूर्ण करावे लागणार आहे. केवळ ट्रान्सहार्बर लिंक करावयाचा की, त्यासोबत मेट्रोचा एक कॅरिडॉर तयार करावयाचा यासंदर्भातील विचार जेव्हा समोर आला तेव्हा त्यात इकॉनॉमिक्स थोडे बसत नाही. मेट्रोचा कॅरीडॉर तयार केला तर आपण जो पूल तयार कणार आहोत त्यावर ट्रॅफिकचा परिणाम होणार असल्यामुळे त्याचे इकॉनॉमिक न बसल्यामुळे खाजगी विकासक त्यामध्ये येणार नाहीत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस...

यावर अजून कंटेमप्लेशन चालू आहे. कारण त्या प्रकल्पाची किंमत खूप जास्त आहे. ईपीसी करायचे ठरले तरी आपणास बॅन्केबल प्रोजेक्ट करावा लागेल. आपणास तसा प्रोजेक्ट करायचा असेल तर आपला या दोन गोष्टींवर विचार चालू आहे. त्याच बरोबर आपण वॉटर ट्रान्सपोर्टच्या संदर्भात देखील काही प्रमाणात कार्यवाही सुरु करीत आहोत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, नवी मुंबई येथे विमानतळ झाल्यानंतर पूर्वीच्या सांताक्रुझ येथील विमानतळ सुरु राहणार आहे. सांताक्रुझ येथे डोमेस्टीक एअरपोर्ट आहे त्या भागातील काही लोक फनेलमध्ये येतात. खास करुन विलेपार्ले विभागातील काही भाग फनेलमध्ये येत असल्यामुळे त्या ठिकाणी उंच इमारती बांधता येत नाहीत. त्यामुळे तेथील जुन्या इमारतींच्या पुनर्बांधणीकरिता खूप अडचणी येतात. तेव्हा त्या ठिकाणी विकासकाला अन्य ठिकाणी टीडीआर देण्याचा किंवा अन्य सुविधा देण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सांताक्रुझ येथील विमानतळ कार्यरत राहणार आहे. ते विमानतळ कार्यरत राहणार असल्यामुळे त्याचा फनेल एरिया तसाच राहणार आहे. तेव्हा त्यामध्ये कोणाला काही सूट देता येईल असे आज तरी वाटत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, या प्रकल्पातील सर्व अडथळे दूर झाले असून सन 2019 मध्ये विमानतळ सुरु होईल. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मी एका बाबीकडे त्यांचे लक्ष वेधू इच्छितो की, हे विमानतळ पूर्ण होण्यास अजून पाच वर्षे लागणार आहेत. सध्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर अशी अडचण निर्माण झालेली आहे की, त्या ठिकाणी विमानाला लॅन्डींग सिग्नल मिळत नसल्यामुळे ते आकाशातच अर्धा तास-एक तास उडत राहते. त्यामुळे इंधन आणि वेळही खर्च होत आहे. ही प्रक्रिया पाच वर्षे सुरु राहिली तर त्यामुळे देशाचे आणि राज्याचे नुकसान होईल. तसेच लोकांनाही त्याचा त्रास होत आहे. हॉंगकॉंग शहरामध्ये समुद्रामध्ये एअरस्ट्रीप केली आहे. आपल्याकडेही सीआरझेडचे नियम शिथिल करुन जुहू एअरपोर्टजवळ छोटी एअरस्ट्रीप तयार करुन तेथे छोटी विमाने उतरविता येतील. तेव्हा या संदर्भात शासन विचार करणार काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सूचना योग्य आहे. आपल्याकडे ती एअरस्टीक उपलब्ध आहे त्याठिकाणी छोटी विमाने उतरत आहेत. आपण ती एअरस्ट्रीप थोडी वाढवू शकलो तर आपणास ते विमानतळ वर्केबल म्हणून वापरता येईल. त्या संदर्भात मी स्वत: बैठक घेतली होती. आपणास ती एअरस्ट्रीप थोडी वाढवावयाची असेल आणि आपणास तशी व्यवस्था करता येत असेल तर त्या संदर्भातील अहवाल सादर करावा अशा सूचना मी संबंधितांना दिलेल्या आहेत. त्यांच्याकडून पॉझीटीव्ह अहवाल आला तर त्याबाबत निश्चिपणे निर्णय घेण्यात येईल. कारण त्यामुळे डिकन्झेशन होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, 600 स्वे.कि.मी. क्षेत्रामध्ये एनएमएसीझेड आहे. नैना जे काही करणार आहे त्यामध्ये एनएमएसीझेडचे अस्तित्व राहणार आहे की नाही ? कारण या विमानतळाच्या शेजारीच नवी मुंबईचे एसईझेड आहे. त्यांना सिडकोने मोठ्या प्रमाणावर जागा दिलेली आहे. तेव्हा नवी मुंबईच्या एसईझेड प्रकल्पाचे काय होणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, नवी मुंबईच्या एसईझेडची जागा निश्चित आहे आणि ती 600 स्वे.कि.मी.च्या क्षेत्रात येत नाही. त्यामुळे तो प्रोजेक्ट अजूनही स्टॅन्ड आहे. तो प्रोजेक्ट रद्द झालेला नाही. त्यामध्ये काही अडचणी होत्या. त्या दूर करण्याचा प्रयत्न करीत आहोत. हा प्रोजेक्ट झाला तर तो देशातील सर्वात मोठा एसईझेड होणार आहे आणि त्याच्यापेक्षा फिजीबल लोकेशन नाही. दोन विकासकांमध्ये काही प्रॉब्लेम झाल्यामुळे तो होऊ शकला नाही. पण त्यास कशी चालना देता येईल यादृष्टीने आम्ही प्रयत्न करणार आहोत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, नवी मुंबई विमानतळ, मुंबईतील विमानतळ आणि नैना प्रकल्पावर चर्चा सुरु आहे. मला माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, नवी मुंबई येथे नवीन आंतराष्ट्रीय विमानतळ करताना नवी मुंबई-नाशिक-पुणे-नवी मुंबई कसा कॉरीडॉर डेव्हलकरण्या संदर्भात प्राथमिक चर्चा झाली होती. परंतु त्या संदर्भात येथे कोणताच उल्लेख करण्यात आलेला नाही. तेव्हा हा कॉरीडॉर करण्यासाठी शासन काही पावले उचलणार काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी त्या प्राथमिक चर्चेला उपस्थित नव्हतो तेव्हा त्या चर्चेमध्ये काय चर्चा झाली याची मला माहिती नाही. नाशिक विमानतळाच्या संदर्भात एचएएल आणि शासन यांच्यामध्ये काही वाद आहेत. नाशिक येथील विमानतळ बांधल्यानंतर तेथील संपूर्ण्

..3..



AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 15:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जागा आमच्या ताब्यात द्यावी अशी एचएएलची मागणी आहे. आपण त्यांची मागणी मान्य करु शकत नाही. त्या संदर्भात सातत्याने बैठका झालेल्या आहेत. मी मुख्य सचिवांना बैठक घेण्यास सांगितले होते. जागा ताब्यात देण्याऐवजी ती लीजवर देण्यात येईल असा प्रस्ताव एचएएला देत आहोत. यातून आपण मार्ग काढणार आहोत. येत्या आठवडाभरात मी स्वत: संरक्षणमंत्री आणि एअर हॉब्ज यांची भेट घेऊन त्यांना विनंती करणार आहे की, हा तांत्रिक मुद्दा आहे. आपण एचएएलच्या ताब्यात जागा देऊ शकत नाही, पण ती लीजवर जागा देऊ शकतो. हे मान्य झाले तर आपणास त्या विमानतळाचा प्रश्न सोडविता येईल.

सभापती महोदय,चाकण विमानतळाच्या जागेचा प्रश्न अजून सुटलेला नाही. त्या संदर्भात देखील मी बैठक घेतलेली आहे. आमच्यासमोर दोन पर्याय आहेत. ते मी याठिकाणी सांगू शकत नाही. कारण आम्ही अजून त्या निर्णयाप्रत आलेलो नाही. पहिली जी जागा निश्चित करण्यात आली होती ती थोडी कमी करुन त्या जागेमध्ये विमानतळ करता येऊ शकेल जेणेकरुन आपणास जो विरोध आहे तो कमी करता येईल हा एक पर्यायआहे. दुसरा पर्याय म्हणजे अजून एक जागा पाहण्यात आली असून ती जागा मिळू शकेल असे वाटत आहे. त्यादृष्टीने आम्ही विचार करीत आहोत. परंतु मी ते आता सांगू शकत नाही. कारण आताच्या लक्षवेधी सूचनेच्या स्कोपमध्ये तो विषय नसल्यामुळे त्याचे पूर्ण ब्रिफींग मी घेतलेले नाही.

------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि बदलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर कारवाई झाली किंवा कसे या संदर्भात पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्र्फेशन आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे नुकसान झाल्याबाबतचा आढावा घेण्यासाठी आमदारांनी अधिकाऱ्यांना भेटू नये असा फतवा काढणारे सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि बदलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची तातडीने बदली करुन त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश आपण दिले होते. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिले होते. त्या संदर्भात कारवाई करण्यात आली काय असा माझा पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी मी जिल्हाधिकाऱ्यांची बदली करावी असे मी म्हटले नव्हत. तर या संदर्भात योग्य ती कारवाई करावी असे म्हटले होते.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 16:00

**उप सभापती**.....

बदलापूर नगरपरिषदेच्या प्रभारी मुख्याधिकाऱ्यांकडून मुख्याधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार काढावा असे मी सांगितले होते. त्यानुसार सरकारने कार्यवाही केली असून, आता त्या ठिकाणी नियमित मुख्याधिकारी रुजू झाले आहेत.

श्री.दिपकराव साळुंखे : महोदय, लोकप्रतिनिधींना भेटण्यासाठी तहसीलदार येत नसतील किंवा त्या अनुषंगाने कार्यवाही होत नसेल तर ती गंभीर बाब आहे.

**उप सभापती** : या ठिकाणी माननीय महसूल मंत्री नसल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिपकराव साळुंखे यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या बाबतची माहिती शासनाने सोमवारपूर्वी द्यावी.

-------

**म.वि.प. नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनांची निवेदने सादर होत नसल्याबाबत**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, गेल्या 8 डिसेंबरपासून आम्ही नियमानुसार नियम 93 अन्वये सूचना देत आहोत. गेल्या 8 तारखेपासून मी दिलेल्या सूचनांपैकी केवळ एका सूचनेवर शासनाकडून निवेदन करण्यात आलेले आहे. नियम 93 च्या सूचनांची निवेदने जाणीवपूर्वक पाठविली जात नाही. नियम 93 अन्वये उपस्थित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने होणारी प्रक्रिया थांबविण्याच्या दृष्टीने हे सर्व षडयंत्र रचले जात आहे. 10 दिवसांपूर्वी नियम 93 अन्वये सूचना देऊनही त्यांची निवेदने केली जात नाहीत. महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीत नमूद केले आहे की, अशा सूचनेवरील निवेदन सहा दिवसांच्या आत त्या विभागाने देणे गरजेचे आहे. आज नियम 93 अन्वये सूचना देऊन 12-13 दिवस होऊन गेले आहेत. परंतु त्यावरील निवेदन केली जात नाहीम मी पुन्हा एकदा सांगतो की, हे जाणीवपूर्वक केले जात आहे. या बाबतीत आपण शासनाला निदेश द्यावेत.

**उप सभापती** : मी या बाबतीत चौकशी करतो. या संदर्भातील माहिती मी सोमवारी देईन.

-------





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक आज गुरुवार, दिनांक 18 डिसेंबर, 2014 रोजी दुपारी 2.30 वाजता विधान भवन, नागपूर येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीत समितीने विचार-विनिमय करुन शुक्रवार, दिनांक 19 डिसेंबर, 2014 ते बुधवार, दिनांक 24, डिसेंबर, 2014 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला आहे.

| | |
|---|---|
| शुक्रवार, दिनांक 19, डिसेंबर, 2014 | : 1) सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सादर करणे.<br>2) शासकीय कामकाज.<br>3) अशासकीय कामकाज. (विधेयके) |
| शनिवार, दिनांक 20 डिसेंबर, 2014 | : बैठक होणार नाही. |
| रविवार, दिनांक 21 डिसेंबर, 2014 | : सुट्टी. |
| सोमवार, दिनांक 22 डिसेंबर, 2014 | : 1) सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा.<br>2) सन 2008-2009 या वर्षाचे अतिरिक्त खर्चाचे विनियोजन विधेयक.<br>3) शासकीय कामकाज. |
| मंगळवार, दिनांक 23 डिसेंबर, 2014 | : 1) शासकीय कामकाज.<br>2) अंतिम आठवडा प्रस्ताव. |
| बुधवार, दिनांक, 24 डिसेंबर, 2014 | : शासकीय कामकाज. |

..3..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 16:00

**उप सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे असा प्रस्ताव मांडतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याची मागणी करतात.)

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, अधिवेशनाचा कार्यकाल वाढवावा अशी सर्वांची मागणी आहे. माझी सुध्दा मागणी आहे की, हे अधिवेशन महिनाभर चालले पाहिजे. हे अधिवेशन विदर्भात होत आहे. अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याची मागणी असेल तर पुन्हा कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलवावी. वास्तविक पाहता कामकाज सल्लागार समितीतील विषय बाहेर मांडले जात नाहीत. सन्माननीय सदस्यांची तीव्र मागणी असेल तर अधिवेशन एक महिन्यापेक्षा जास्त काळ चालविण्यासाठी कामकाज सल्लागार समितीची बैठक पुन्हा बोलवावी. हे अधिवेशन किमान दीड महिने चालले पाहिजे अशी आमची इच्छा असून, त्यास माझी सहमती आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये सर्व पक्षाचे प्रतिनिधी असतात. आपल्या ज्या भावना आहेत त्याच सर्व लोकप्रतिनिधींच्या आहेत. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विरोधी पक्षातील गट नेते आणि प्रमुख नेते सुध्दा उपस्थित होते. कामकाज सल्लागार समितीमध्ये काय चर्चा झाली हे सभागृहाला सांगत नाही. मी एवढेच सांगतो की, आपल्या पक्ष नेत्यांच्या आणि गट नेत्यांच्या सहमतीने उपरोक्त कार्यक्रम एकमताने ठरविण्यात आला आहे.

**उप सभापती** : कामकाज सल्लागार समितीला माननीय मुख्यमंत्री, माननीय सभापती, मी आणि आपल्या पक्षाचे प्रतिनिधी सुध्दा उपस्थित असतात. सर्वांच्या सहमतीने सभागृहाच्या कालावधीबाबतचा निर्णय होत असतो. त्यामुळे आजचा निर्णय सुध्दा सर्वांच्या सहमतीने झाला आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) BB-4

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 16:00

**<u>सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या बैठकीस अधिकाऱ्यांनी उपस्थित राहू नये असे आदेश दिल्याबाबत.</u>**

श्री.दिपकराव साळुंखे : सभापती महोदय, सन्माननीय महसूल मंत्री सभागृहात आलेले आहेत. मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कोणत्याही तहसीलदारांनी आमदारांच्या भेटीला जाऊ नये, असा फतवा काढला आहे. त्यामुळे अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे होऊ शकले नाही. आम्ही दोन दिवस सुटीमध्ये मतदारसंघात नुकसानीची पाहणी करण्यासाठी गेलो होतो. परंतु कोणतेही अधिकारी आम्हाला भेटायला आले नाहीत. परवा मी जेव्हा हा विषय उपस्थित केला तेव्हा माननीय उप सभापतींनी निदेश दिले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे आदेश देणे ही गोष्ट भूषणावह नाही. त्यामुळे या संदर्भात तातडीने व्यवस्था करावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, जिल्हाधिकारी सोलापूर यांनी अशा प्रकारे कोणतेही आदेश नव्याने काढलेले नाहीत. मी या राज्याचा विरोधी पक्ष नेता झाल्यानंतर राज्याच्या काही भागात फिरुन अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेतल्या. त्यावेळी राज्याच्या मुख्य सचिवांनी फतवा काढला की, विरोधी पक्ष नेते किंवा कोणत्याही आमदारांनी अधिकाऱ्यांना बैठकीला बोलावले तर जाऊ नये. हे आदेश पूर्वीपासूनच अस्तित्वात आहेत. त्या आदेशात असे नमूद केले आहे की, विरोधी पक्ष नेत्याच्या बैठकीला किंवा आमदारांच्या बैठकीला अधिकारी गेले तर त्यांच्याविरुध्द तत्काळ शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल. हे जुनेच आदेश आहेत. आम्ही या बाबत कोणतेही नवीन आदेश काढलेले नाहीत. त्यामुळे यामध्ये सुधारणा करण्याची आज मला आवश्यकता भासत नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अशी विचारणा केली की, अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या बैठकीला उपस्थित राहू नये अशा प्रकारच्या सूचना शासनाने दिल्या आहेत काय ? वास्तविक पाहता सभागृहातील सदस्यांच्या मागणीनुसार सरकारची सकारात्मक भूमिका असायला पाहिजे. सन्माननीय सदस्यांना अधिकाऱ्यांसोबत चर्चा करता आली पाहिजे. मागे काय झाले याची आम्हाला माहिती नाही. परंतु सभागृहात एखादा विषय उपस्थित झाल्यानंतर

..5..



श्री.माणिकराव ठाकरे....

त्या बाबतीत माननीय मंत्र्यांनी सकारात्मक उत्तर दिले तर त्यांचे समाधान होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मागच्या कालखंडात हा फतवा मागे घेण्यासाठी सभागृहाचे कामकाज तीन दिवस बंद पडले होते. त्यावेळी हे आदेश मागे घेण्याबाबत मागणी करुनही सरकारने आमचे ऐकले नव्हते. त्यावेळी सरकारने सांगितले होते की, विरोधी पक्ष हा मंत्री नाही, सत्तेत सहभागी नाही. त्यावेळी आम्ही सांगितले होते की, विरोधी पक्ष नेत्याला कॅबिनेट मंत्री पदाचा वैधानिक दर्जा असल्यामुळे त्यांच्यासोबत एक अधिकारी ठेऊ नये हे काही बरोबर नाही. परंतु सरकारने आमचे ऐकले नाही. आपल्या ज्या भावना होत्या त्या भावना आम्हीच त्या कालखंडात मांडत होतो. त्या पाच वर्षाच्या कालखंडात आम्ही कोठे गेलो तर एक अधिकारी सुध्दा येत नव्हता. पिण्यासाठी पाणी मागितले तरी देत नव्हता इतका तो घाबरला होता. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या जुन्या आदेशात तसूभरसुध्दा सरकार बदल करणार नाही. पूर्वीचेच आदेश पुढील पाच वर्षे कायम ठेवण्याचा राज्य सरकारचा विचार आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे.

**मु.शी.** : धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे यासंबंधी सर्वश्री. रामहरी रुपनवर, रामराव वडकुते, शरद रणपिसे, संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. सुनील तटकरे, धनंजय मुंडे, विक्रम काळे, अमरसिंह पंडित, अब्दुल्लाखान दुर्राणी, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"धनगर समाजाची सन 1881 व सन 1931 मध्ये ब्रिटीशांनी जनगणना करुन धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात येणे, भारतीय संविधानाने देखील हीच यादी स्वीकारणे, सन 1955-56 मध्ये पहिल्या मागासवर्गीय आयोगाने (कालेलकर समिती) या समाजाचा अभ्यास करुन धनगर समाज आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या अतिमागास असल्याचा अहवाल केंद्र शासनास देणे, त्यानुसार केंद्र शासनाची सुधारित अनुसूचित जमातीची यादी प्रसिध्द करण्यात येऊन राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीत क्रमांक 36 मध्ये उल्लेख करुन समावेश करण्यात येणे, परंतू या यादीमध्ये क्रमांक 36 वर धनगर या ऐवजी धनगड असा उल्लेख झाल्यामुळे या समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलतीपासून वंचित रहावे लागणे, धनगर आणि धनगड हे भाषा शास्त्रानुसार एकच असल्याचे अनेक शासकीय पुरावे सादर करुनही शासनाने अनेक वर्ष हा प्रश्न प्रलंबित ठेवून या समाजावर अन्याय करणे, सदर सवलती मिळाव्यात यासाठी धनगर समाज बराच काळ मागणी करत असणे, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्यात धनगर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

श्री. रामहरी रूपनवर ....

समाजातर्फे करण्यात आलेल्या आंदोलनात नागरिकांचा मोठ्याप्रमाणात प्रतिसाद मिळणे व याबाबत धनगर समाजातील जनतेच्या भावना अतिशय तीव्र असणे, सध्या सत्तेवर असलेले शासन व मा.मुख्यमंत्री यांनी निवडणूकीत सत्तेवर आल्यास तातडीने धनगर समाजास एस.टी. आरक्षण दिले जाईल असे अनेक सभांमध्ये व शिष्टमंडळामध्ये आश्वासन देणे, जुलै-2013 च्या द्वितीय अधिवेशनात शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याबाबत आश्वासन देवूनही अद्याप हा प्रश्न न सुटणे, शासनाच्या धोरणामुळे धनगर समाजामध्ये तीव्र असंतोष पसरणे, यासंदर्भात धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याबाबत शासनाचे असलेले धोरण व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. विष्णू सवरा (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदनानंतर)

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये छोटीशी सुधारणा आहे. दुसऱ्या पृष्ठामधील शेवटून 2 क्रमांकाच्या परिच्छेदामध्ये .... जुलै, 2013 च्या द्वितीय अधिवेशनात तारांकित .... असे म्हटले आहे, तेथे तारांकित या शब्दाच्या ऐवजी अतारांकित असे वाचावे.

श्री. रामहरी रूपनवर : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना प्रामुख्याने धनगर समाजाच्या आरक्षणाबद्दल आहे. हा विषय संवेदनशील आहे. सरकारने माझ्या प्रश्नाला बगल देऊन उत्तर दिले आहे. माझ्या लक्षवेधी सूचनेचा यामध्ये कोणताही विचार न करता उत्तर दिले आहे, असे माझे मत आहे. माझा विचारण्याचा उद्देश धनगर समाजासाठीचे आरक्षण हा आहे. धनगर समालाला घटनेमध्ये आरक्षण दिले आहे. घटनेने ज्याला आरक्षण दिले आहे, त्याला निकष पूर्ण करण्याची गरज नाही. निकष पूर्ण करीत होते, त्यांचाच त्यामध्ये समावेश होता. घटनेने दिलेल्या आरक्षणामध्ये धनगर समाजाचा अनूसचित जमातीच्या यादीमध्ये 36 नंबरवर समावेश आहे. धनगर समाजाचा समावेश करा, असे म्हटले असते तर ते तुमचे उत्तर राहिले होते. पण ऑलरेडी धनगर समाजाचा घटनेने अनुसूचित जमातीत समावेश केला आहे. 36 नंबरवर तशी नोंद आहे. त्यामुळे सरकारने फक्त केंद्र सरकारला त्याकरिता सांगायचे आहे. घटनेने ज्या समाजाला आरक्षण दिले आहे आणि तो समाज ज्या राज्यात राहतो, त्या राज्याच्या शासनाने त्या समाजाला त्या कॅटेगरीच्या सवलती द्याव्यात, अशी शिफारस करायची आहे. तुम्ही तशी शिफारस करायची आहे. तुम्ही बाकीचे काही करायचे नाही. मी फक्त घटनेचे म्हणत आहे. आम्ही घटनेमध्ये आहे की नाही, हे फक्त शोधायचे आहे, असेल तर असेल आणि नसेल तर नसेल. परंतु, आम्ही तसे असताना सुध्दा नाही असे म्हणणे योग्य नाही. आताच्या सरकारने, त्यांच्या सर्व नेत्यांनी निवडणुकीच्या अगोदर धनगर समाजाला आम्ही सत्तेवर आल्यावर अनुसूचित जमातीचे आरक्षण देऊ, असे कबूल केले आहे, जाहीर सभेमध्ये सांगितले आहे आणि लेखी सुध्दा पत्रामध्ये दिले आहे. सरकारची त्याबाबत आता काय भमिका आहे, असा माझा प्रश्न आहे.

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, धनगर समाजाला घटनेमध्ये असे आरक्षण दिलेले नाही. तो शब्द धनगड असा आहे, धनगर नाही. धनगड आणि धनगर यामध्ये तफावत आहे. ते दोन्ही वेगवेगळ्या जमाती आहेत.

श्री. रामहरी रूपनवर : सभापती महोदय, हे घटनेमध्ये आहे. माझ्याकडे केंद्र सरकारची यादी आहे. पूर्वी ओरान व धनगड असे होते. पण सन 2007 मध्ये ते दुरूस्त होऊन ओरान, धनगड ऑब्लिक धनगर झाले आहे. 36 नंबरला ओरान आणि धनगर आहे. ही केंद्र सरकारची अनूसूचित जमातीची लिस्ट असून अधिकृत आहे. ही राज्य सरकारने दिलेली यादी आहे. आपण महाराष्ट्र सरकारचे मंत्री आहात. महाराष्ट्र सरकारने प्रसिध्द केलेली ही अनुसूचित जमातीची यादी आहे. यामध्ये ओरान, धनगड आणि रेघ मारून धनगर लिहिले आहे. हे आता अलीकडे आले आहे. त्यामुळे धनगड आणि धनगर हे एकच आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटल्यापासून हे आले आहे. धनगड आणि धनगर एकच आहे, जसे ओरिसाचे ओडिसा, एकरचे एकड, जाकरचे जाकड तसे धनगरचे धनगड होते. त्याचा फायदा घेऊन आतापर्यंत आम्हाला आरक्षण दिले नाही. आता तेथे धनगर हा शब्द आल्यामुळे आम्हाला आरक्षण मिळाले पाहिजे. घटनेमध्ये दिले आहे ते नीट तपासून पहावे आणि आम्हाला आरक्षण द्यावे, अशी आमची मागणी आहे.

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडील माहिती आमच्याकडे द्यावी. आमच्या माहितीप्रमाणे धनगड व धनगर हे वेगवेगळे आहे. धनगड हे सुध्दा धनगड नाही तर धांगड आहे. धांगड व धंगड यांचे इंग्रजीमध्ये स्पेलिंग एकच होते. त्यामुळे धनगर हे वेगळे आणि धांगड हे वेगळे आहे आणि धनगड हे वेगळे आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात माननीय मंत्र्यांनी धनगड आणि धनगर याचा स्पष्टपणे तपशील दिला आहे. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माझा सरकारला स्पेसिफिक प्रश्न आहे की, धनगर समाजाला एसटीचे आरक्षण मिळणार आहे का आणि जर मिळणार असेल तर आहे त्या एसटीच्या आरक्षणामध्ये मिळणार आहे की धनगरांसाठी वेगळे आरक्षण दिले जाणार आहे ?

..5



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, आरक्षणाचा मुद्दा नंतर येतो. जोपर्यंत धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती म्हणजे आदिवासीची यादी आहे त्यामध्ये समावेश होत नाही तोपर्यंत त्या समाजाला सवलती किंवा आरक्षण देण्याचा मुद्दाच उपस्थित होत नाही.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अप्रत्यक्ष उल्लेख केला आहे. बारामतीला धनगर समाजाचे प्रचंड उपोषण झाले, संबंध राज्यातून धनगर समाजाचे लोक तेथे आले तेव्हा सध्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून स्वत:च्या हस्ते उपोषण सोडविले आणि तेव्हा असा स्पष्ट शब्द दिला होता की, आदिवासी समाजाच्या आरक्षणाला न दुखवता आम्ही केंद्र शासनाकडे याची शिफारस करू. मागच्या सरकारने सन 2004 च्या सुमाराला, माझे चुकत नसेल तर, अशा पध्दतीचा ठराव तिसऱ्या सूचीत घालावा, असेही तेव्हा सूचित केले होते. केंद्र शासनाने कळविले होते की, तिसरी सूची नाही. दरम्यानच्या काळात चौंडीच्या एका जाहीरसभेत कै. गोपीनाथजी मुंडे यांनीही सूचना केली होती की, तिसऱ्या सूचीत आम्ही धनगर समाजाला घालू. माझे म्हणणे असे आहे की, आर्टिकल 341, 342 मध्ये मागासवर्गीय समाज आणि एनटी असे दोन उल्लेख आहेत आणि त्याच्या अनुषंगाने झालेल्या दोन सूची आहेत. शासनाने सरळ असा ठराव करावा आणि दिलेला शब्द पाळावा की, तिसऱ्या सूचीत आवश्यकता वाटली तर घटनेत दुरूस्ती करावी आणि धनगर समाजाला आरक्षण द्यावे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याची मागणी ही गेल्या अनेक वर्षांपासून आहे. ही गोष्ट खरी आहे की, कै. गोपीनाथराव मुंडे, आताचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी या संदर्भात आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लागता, धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यात येईल आणि धनगर समाजाला आरक्षण देण्यात येईल, असे सांगितले होते. आमचे सरकार आले तर आम्ही त्या संदर्भात प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले, ही वस्तुस्थिती आहे. आदिवासी विकास विभागाच्या माननीय मंत्र्यांनी म्हटले आहे, त्यामध्ये मी दुरूस्ती करीत आहे. आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लागता धनगर समाजाला आदिवासींच्या सवलती मिळाव्यात, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. घटनेनुसार 50 टक्क्यांवर आरक्षण देता येत नसले तरी ज्याप्रमाणे

..6



श्री. एकनाथराव खडसे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्पेशल बॅकवर्ड क्लासची निर्मिती करून 2 टक्के आरक्षणात वाढ केली, तसाही मुद्दा आहे. आता अलीकडे राज्य सरकारला एक अनुभव आला. मराठवाडा व मुस्लिम समाजाला आरक्षण देत असताना घाईने घेतलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून बाद ठरविण्यात आला किंवा त्याला स्थगिती देण्यात आली. अशा प्रकारे होऊ नये यासाठी राज्य सरकार एक समिती निर्माण करील आणि त्या समितीच्या माध्यमातून धनगर समाजाला निर्धोक आरक्षण मिळाले पाहिजे, कोणत्याही त्रुटी राहू नयेत, याची काळजी घेईल. त्या समितीच्या माध्यमातून आलेल्या अहवालानुसार राज्य सरकार ठराव पारित करील आणि केंद्र शासनाकडे पाठविल. निश्चितपणे धनगर समाजाला एसटीचे आरक्षण मिळेल आणि त्यामध्ये कोणत्याही आदिवासी समजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही याचीही काळजी घेण्यात घेईल आणि त्यासाठी अभ्यास करण्यात येईल. कारण आपल्याला आता फटका बसला आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे..........

तुम्ही मुस्लीम आणि मराठा समाजासाठी घाईघाईने घेतलेल्या आरक्षणाच्या निर्णयाला फटका बसला. आजच कोर्टाने तो फेटाळला आहे. अशी परिस्थिती पुन्हा येऊ नये म्हणून अभ्यास करुनच निर्णय घेण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी माझे ऐकून घ्यावे. मुंडे साहेब माझे ऐकून घ्या.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, धनगर समाजाला एक महिन्याच्या आत आरक्षण देऊ, असे बारामती येथील उपोषण सोडताना मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते आणि आता त्यांना अनुसूचित जातीमध्ये घेता येणार नाही, असे उत्तर सरकार देत आहे.

**तालिका सभापती** : आपण माझे ऐकून घ्यावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली आहे. कोणालाही संधी नाकारली नाही. मी काय म्हणतो ते तरी ऐकून घ्यावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना मी संधी दिलेली आहे. महसूल मंत्री महोदयांनी शासनाच्या वतीने सविस्तर उत्तर दिलेले आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मी काय म्हणतो, ते तरी कृपया आपण ऐकून घ्यावे. त्यानंतर पाहिजे तर मी आपल्याला संधी देईन.

मला असे वाटते की, ही लक्षवेधी सूचना धनगर समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात आहे. सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारले आणि महसूल मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. एकूणच धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे, हे अगदी स्पष्टपणे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. त्यामुळे आता या ठिकाणी हा विषय संपतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : धनगर समाजाला आरक्षण देणार की नाही, हे सांगावे.

**उप सभापती** : ते महसूल मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

आपण सर्वांनी ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांच्या मी हे लक्षात आणून देतो की, त्यांनी अशा प्रकारे पिठासीन अधिकाऱ्यांवर हेत्त्वारोप करु नयेत.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत हे सरकार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार आहे, हे निश्चित आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

सर्वोच्च न्यायालयाने आज जो निर्णय दिला आहे, त्यामुळे समिती स्थापन करावी लागत आहे. राज्य सरकारने मागील काळात चुकीचा निर्णय घेतल्यामुळे थोबाडीत बसली आहे, चपराक बसली आहे. भविष्यात अशी चपराक बसू नये, याची काळजी राज्य सरकार घेईल. 50 वर्षे यांची सत्ता होती, त्यांनी का केले नाही ? एवढा तुम्हाला धनगर समाजाबद्दल ओलावा आहे तर 50 वर्षे राज्य होते, तेव्हा का केले नाही ? आज तुम्ही राजकीय कारणासाठी भांडत आहात, तुम्ही 15 वर्षे सत्तेवर होता, तेव्हा का केले नाही ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

जातीयवादी भूमिका तुम्ही पार पाडायची, तुम्ही आरक्षण द्यायचे नाही, आम्ही प्रयत्न करणार आहोत, गेल्या 15 वर्षात तुम्ही का केले नाही ? आम्ही तर आरक्षण देत आहोत, प्रयत्न करीत आहोत. तुम्ही जातीयवादी भूमिका घेतली......

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 4.24 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

---------------

यानंतर श्री.मा.शिगम.........

अस्वाक्षरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

श्री. रामराव वडकुते : सभापती महोदय, मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल धन्यवाद. हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नावर राज्यामध्ये गेली 5 वर्षे सातत्याने आंदोलने होत आहेत. पंढरपूर ते बारामती असा मोर्चा काढण्यात आला. त्यावेळी सद्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, आमचे सरकार आल्यानंतर पहिल्यांदा या विषयी निर्णय घेऊ. माननीय महसूल मंत्री महोदय श्री. एकनाथ खडसे यांनी उत्तर दिले. त्यांचे दिनांक 19.12.2013 रोजी विधानसभेमध्ये जे भाषण केले होते त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, राज्य शासनाला केंद्र शासनाकडून एसटी किंवा एनटीच्या स्वरूपात अनुदान किंवा वेगवेगळया स्वरूपात जो निधी मिळतो तो लोकसंख्येच्या आधारावर मिळतो. जनजाती मंत्रालयाच्या रिपोर्ट प्रमाणे धनगर समाज एसटी जमातीमध्ये समाविष्ट आहे असे त्यांनी आपल्या भाषणामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे. ही बाब सरकार कधी लागू करणार आहे ? आमची मागणी एसटीमध्ये समाविष्ट करा अशी नाही. आमचा समावेश अगोदरच आदिवासी म्हणून झालेला आहे. 1947ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटनेच्या अनुच्छेद 340, 341 आणि 342 द्वारे मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. सन 1976 मध्ये अनुसूचित जाती/जमातीचा दुरूस्ती अधिनियम क्रमांक 100झाला. महाराष्ट्राच्या यादीतील अनुक्रमांक 36 वर धनगर समाज अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट झाला. त्यानंतर कायद्यात अनेक वेळा दुरूस्त्या होऊनही ओरान धनगर हा महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीतील अनुक्रमांक 36वर आहे. महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जमातीसंबंधी कायदा झाला. पंचायत समिती अधिनियम, तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1959मध्ये धनगर अनुसूचित जमातीमध्ये असल्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे 18 मे 2005 रोजीच्या अनुसूचित जमातीच्या यादीतील अनुक्रमांक 36 वर ओरान हा धनगर असून त्याला महाराष्ट्र शासनाने कोर्ट फी माफ केलेली आहे. शब्दाचा अपभ्रंश झालेला आहे हे आपणास माहीत आहे. त्याबाबतीत केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण परिषद एनसीआरटीद्वारा प्रकाशित केलेल्या सरळ हिंदी व्याकरण पुस्तकात "र" चा उच्चार "ड" आणि "ड"चा उच्चार "र" असा

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराव वडकुते...

चुकीचा होतो असे सांगितलेले आहे. याचा अर्थ आम्ही आधीच अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट आहोत. त्यामुळे धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती दिल्या जातील काय ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, केवळ या भाषणात नाही तर महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये गेली 10 वर्षे धनगर समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती मिळाव्यात यासाठी सातत्याने मागणी करणारा मी एक आमदार आहे. विधानसभेमध्ये मी सातत्याने मागणी केली. धनगर समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती द्या अशी मागणी केली नाही असे एकही अधिवेशन नाही. धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यासाठी हे शासन शेवटच्या क्षणापर्यात प्रयत्न करील. या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मराठा आरक्षणासंबंधी आणि मुस्लिम आरक्षणासंबंधीचे विषय आले. एकीकडे शासनाने घेतलेल्या निर्णयामध्ये त्रुटी राहिल्या. सर्वोच्च न्यायालयाने आजच निर्णय दिलेला आहे. त्रुटी राहिल्यामुळे राज्य शासनाच्या बाजूने निर्णय झाला नाही. तो फेटाळण्यात आला. धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यास शासन तयार आहे. त्यासाठी राज्य शासनाने केन्द्र सरकारकडे प्रस्ताव पाठवायचा आहे. या विषयाचा नीट अभ्यास करणे, कोणत्याही प्रकारची त्रुटी राहाणार नाही हे पाहणे आवश्यक आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे......

निश्चित विधानसभेत आणि विधानपरिषदेत केंद्र सरकारच्या माध्यमातून ठराव मांडला जाईल. त्यापूर्वी यामध्ये कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची खात्री करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नियुक्त करु. आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर हा प्रश्न आता आला नसता, जर तुम्ही यापूर्वी निर्णय घेतला असता. यासाठी तज्ज्ञांची समिती नियुक्त करु. त्रुटी राहू नयेत म्हणून आवश्यकता भासल्यास तुमचेही मार्गदर्शन घेऊ. हा प्रश्न राजकारणाच्या पलीकडे जाऊन आम्हाला सोडवायचा आहे....(अडथळा).....तुम्ही इतकी वर्षे सत्तेवर असताना का नाही केले? मी एकटाच भांडत होतो. मी अभिमानाने सांगू इच्छितो की, महाराष्ट्राच्या विधानसभेचे प्रोसिडिंग वाचावे. पहिल्यांदा धनगर समाजाला आरक्षण देण्याची भूमिका एकनाथ खडसेंनी मांडली.....(अडथळा)...आमचा हेतू प्रामाणिक होता. आता आमचे मुख्यमंत्री सक्षमपणे काम करीत आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी निर्दोष अशा स्वरुपाचा प्रस्ताव पाठविला जावा, केंद्रात आमच्याच पक्षाचे सरकार आहे....(अडथळा)...तुम्ही सांगता त्याप्रमाणे तत्कालीन माननीय पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत पुढाकार घेतला होता, परंतु दुर्दैवाने त्यांचे सरकार पायउतार झाले. आमच्या सरकारची प्रामाणिक भावना आहे, इच्छा आहे. फक्त निर्दोष प्रस्ताव तयार व्हावा अशी आमची भूमिका आहे. सुप्रीम कोर्टाने चांगली चपराक मारली आहे. पुन्हा तशी वेळ येऊ नये. हा निवडणुका पाहून निर्णय घ्यायचा नाही. आता डोळयासमोर कोणत्याही निवडणुका नाहीत.....(अडथळा).....तुम्ही मराठा आणि मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबद्दलचा निर्णय निवडणुका डोळयासमोर ठेवून घेतला म्हणून त्यात त्रुटी राहिल्या. त्रुटी असल्याचे सुप्रीम कोर्टाने मान्य केले. तुम्ही जाणीवपूर्वक, हेतुपुरस्सर त्रुटी ठेवल्या. पुन्हा अशी वेळ येऊ नये याची काळजी आम्ही घेऊ. महाराष्ट्रातील धनगर समाजाला मी आश्वस्त करु इच्छितो. कोणत्याही स्थितीत धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यासाठी राज्य सरकार सर्व परिस्थितीचा अभ्यास करणार आहे, त्या संदर्भातील पाठपुरावा करणार आहे.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी जे काही भाष्य केले त्याबाबत माझा आक्षेप आहे. मागील सरकारने काही केले नाही हे म्हणणे चुकीचे आहे. 2004 साली पाठविलेल्या प्रस्तावात स्पष्ट म्हटले आहे की, तिसऱ्या सूचीमध्ये धनगर समाजाला अंतर्भूत करावे, असा आमच्या मंत्रीमंडळाने ठराव करुन पाठविला होता. त्याबाबत उत्तर असे आले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर..........

की, तिसरी सूची नाही. म्हणून जाणीवपूर्वक आम्ही म्हटले की, 341, 342 ही जशी कलमे आहेत त्याप्रमाणे 342 अ कलम समाविष्ट करावे आणि हा विषय संपुष्टात आणावा. त्यासाठी अभ्यास करण्याची गरज नाही, समिती नेमण्याची गरज नाही. आमच्या मतदारसंघातील धनगर बहुल समाजाची लोकसंख्या 35 टक्के आहे. आम्ही तेथे वस्ती करीत असलो आणि नसलो तरी त्या समाजाने आम्हाला या सभागृहात काम करण्याची परवानगी दिली याची जाणीव आम्हाला असल्यामुळे या प्रश्नाबाबत समिती नियुक्त न करता लोकसभेला आणि केंद्र सरकारला हा निर्णय करायचा असेल तर सर्व अधिकार आहेत. त्यासाठी राज्य सरकारची शिफारस आवश्यक नाही. राजकारण करु नये. आम्हाला अक्कल नव्हती, तुम्हाला अक्कल आहे, तुम्ही करा. हे जर करायचे असेल तर आता ठराव घ्यावा.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. माननीय महसूलमंत्र्यांबद्दल कमालीचा आदर व्यक्त करुन सांगू इच्छितो की, त्यांनी उत्तर देत असताना केलेले भाषण हे पूर्णपणे राजकीय होते. भारतीय जनता पक्षाचे एक नेते म्हणून त्यांनी भाषण केले. सरकार म्हणून ते भाष्य केलेले नव्हते. माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी सरकारच्या वतीने जे निवेदन दिले आहे ते मला नामंजूर आहे असे माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगावे.....(अडथळा)....ज्यावेळी निवेदन दिले गेले त्यावेळी सुधारणा करावयास पाहिजे होती.

श्री.एकनाथराव खडसे : तुम्ही का केले नाही?

श्री.सुनील तटकरे : आम्ही केले नाही म्हणून तुम्ही सत्ताधारी बाजूला जाऊन बसले. माननीय मुख्यमंत्र्यांनी बारामती येथे जाऊन उपोषणकर्त्यांनी उपोषण सोडावे म्हणून भाषण केले होते. या ठिकाणी सरकारच्या वतीने भाषण केले आहे. माननीय पंतप्रधान ज्यावेळी निवडणूक प्रचाराला आले होते त्यावेळी सुध्दा त्यांनी उच्चार केला होता. माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात बोलावून पुन्हा चर्चा करावी अन्यथा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी. हा मुद्दा भावनेचा नाही. महसूल मंत्री काय बोलतात, तटकरे काय बोलतात यापुरता मर्यादित विषय नाही. या विषयाबाबत चर्चा झाली पाहिजे. केवळ राजकीय भाषण करुन याबाबत निर्णय करणार असाल तर ते योग्य होणार नाही. सरकारच्या वतीने निवेदन दिलेले आहे. त्यामुळे ते निवेदन आम्ही मागे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) FF.3

SGB/ 16:40

श्री.सुनील तटकरे.....

घेत आहोत, आदिवासी विकास मंत्र्यांनी दिलेले निवेदन सामुदायिक जबाबदारीत येत नाही असे म्हणणार आहात काय? दिलेल्या निवेदनात आता दुरुस्ती करता येणार नाही. आपण जे उत्तर देत आहात त्याच्याशी याचा संबंध येत नाही. मी पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलत आहे. आम्ही केले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच आम्हाला विरोधी बाकावर बसावे लागले. याचा अर्थ तुम्ही अशा पध्दतीने फसवणूक करणे योग्य होणार नाही. या संदर्भात निर्णायक पध्दतीचे उत्तर दिले पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी याबाबतची स्पष्टता केली पाहिजे. अन्यथा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. या संदर्भात जी चर्चा करावयाची आहे ती आपण करावी.

श्री.एकनाथराव खडसे : या ठिकाणी परिपूर्ण उत्तर दिले आहे. इतर कोणत्याही आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करु. यांचे नखरे सुरु आहेत. 50 वर्षात तुम्ही केले नाही ते पाप आम्हाला फेडावयास लावत आहात. धनगर समाजाला उपेक्षित ठेवण्याचे पाप तुम्ही केले. आम्ही हे करणार. कोणत्याही स्थितीत इतर आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला आरक्षण देण्याची भूमिका राज्य सरकारची आहे. ती कायम आहे. आम्ही त्यासाठी प्रयत्न करणार.....(अडथळा)....यांनी राजकीय हेतूने केले नाही. धनगर समाजावर अन्याय केला. आता यांचे प्रेम उफाळून आले आहे.

नंतर 2जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

श्री. एकनाथराव खडसे ........

यापूर्वीच्या सरकारने केंद्रात त्यांचेच सरकार असतानाही धनगर समाजाला न्याय देण्यासाठी आपली बाजू मांडली नाही, त्या विषयावर बोलायला पाहिजे होते पण आपण ते केले नाही. आता आमचे सरकार मात्र हे करुन दाखविणार एवढे मी सांगू इच्छितो.

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारची प्रथा सुरु करण्याचा आग्रह कृपया धरु नये. त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपलेली आहे. मी आता विशेष उल्लेखाच्या सूचना चर्चेसाठी घेतो. पहिली विशेष उल्लेखाची सूचना सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांची असून त्यांनी ती मांडावी.

( गोंधळ )

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी आपली विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

( गोंधळ )

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी आपली विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

( गोंधळ )

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी आपली विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

( गोंधळ )

यानंतर सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आपली विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

सन्माननीय सदस्यांना वारंवार विनंती करुनही ते जागेवर जाऊन बसत नाहीत. अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्याने मी सभागृहाची बैठक 5.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 4 वाजून 52 मिनिटांनी 5.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

यानंतर श्री. भारवि.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**सभागृहाच्या कामकाजाबाबत पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मघाशी जी चर्चा झाली त्यावेळी मी एक वैधानिक मुद्दा मांडला होता की, शासनाच्यावतीने माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी सभागृहात जे निवेदन केले होते ते निवेदन त्यांनी मागे घेतले आहे काय ? कारण त्या निवेदना संबंधातील दुरूस्ती सभागृहात तोंडी सांगण्यात आली होती. हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. अशा पद्धतीने कामकाज काढून औचित्याचे मुद्दे घेणार असाल तर ते योग्य होणार नाही. आपण संवेदना समजून घेतल्या पाहिजेत. चर्चा झाली पाहिजे. हा विषय सहजासहजी सुटण्यासारखा नाही याची आम्हाला जाणीव आहे. पण याचा अर्थ असा नव्हे की, त्याचे राजकीय भांडवल केले जावे. विधान सभेच्या निवडणुकीमध्ये भांडवल झाले. बारामती येथे जाऊन यासंबंधी वक्तव्ये झालीत. आम्ही काय केले आणि आपण काय करणार यावर आता आपण किती वेळ बोलत राहणार आहात ? आम्ही काय केले हे आपण पाच वर्षे बोलत राहिला तरी त्यातून काहीही साध्य होणार नाही. आपल्याला अपेक्षित असलेले काहीही पदरात पडणार नाही. दुष्काळाच्या निमित्ताने लोकांच्या नजरेत सर्वकाही आलेले आहे. आपल्या माध्यमातून अशा प्रकारे कामकाज होऊ नये असा माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. सभागृहात गोंधळ आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे निवेदन तसेच सभागृहाच्या माननीय नेत्यांनी सभागृहात मांडलेली बाजू यात खूप तफावत आहे. आदिवासी विकास मंत्र्यांच्या निवेदनात आणि आता आपण जे सांगत आहात त्यात मतभिन्नता आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री येई पर्यंत हा विषय आपण स्थगित ठेवावा. तो पर्यंत पुढील कामकाज घ्यावे. मी पुढील कामकाज घेऊ नये असे म्हणत नाही. माझा मुद्दा एवढाच आहे की, लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. त्यावर साधकबाधक चर्चा करावी. त्यानंतर मग पुढील चर्चा घेण्यास आमची कोणतीही अडचण नाही. माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर असा आहे की, अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांच्या भावना दडपून सभागृहाचे कामकाज चालविणे योग्य राहणार नाही याची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी एवढीच आमची विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आपण पुढे गेलेलो आहोत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

**तालिका सभापती** : मघा पासून माननीय संसदीय मंत्री श्री.गिरीश बापट यांचा हात वर असल्यामुळे मी त्यांना आता संधी देत आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना संधी देण्यात येईल.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज सुरूअसताना काही मुद्दे उपस्थित झाल्यानंतर चर्चा होणे हे अपेक्षितच असते. विरोधी पक्षातर्फे त्या मुद्यांवर मत मांडल्यानंतर सरकारतर्फे उत्तर दिले जाते. आता सभागृहाचे नेते बसलेले असून त्यांनी उत्तर देखील दिलेले आहे. तो त्यांचा अधिकार आहे. सभागृहाची बैठक स्थगित करण्यापूर्वी आपण लक्षवेधी सूचनेवरील कामकाज संपले आहे असे घोषित केले. त्यावर सभागृहाचे दुमत असण्याचे कारण नाही. आपल्याला पुढचे कामकाज आपल्याला घेता येईल. आपण सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना पुन्हा मागे जाऊन बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांचा पॉईंट ऑफ प्रोसिजर योग्य होता. माझ्या नंतर आपण सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना बोलण्यास अनुमती देणार आहात त्याबद्दल देखील आमचे काहीही म्हणणे नाही. गेले 50 वर्षे प्रलंबित असलेला विषय सभागृहात आल्यानंतर सरकार या नात्याने सभागृहाच्या भावना आम्ही समजून घेतल्या. विरोधी पक्षातील सन्माननीय नेत्यांना बरोबर घेऊन मार्ग काढू असे सभागृहाच्या सन्माननीय नेत्यांनी सांगितले आहे. या एका लक्षवेधी सूचनेद्वारे लगेच काही उत्तर मिळणार नाही. हा प्रश्न किती काळ रेंगाळलेला आहे, किती किचकट आहे याची जाणीव आपणा सर्वांना आहे. येथे दोन्ही बाजूच्या सन्माननीय नेत्यांनी आपापल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आपल्याला अजून पुढचे कामकाज घ्यावयाचे आहे. त्यामुळे आपण सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे विचार मांडून झाल्यानंतर नियमाप्रमाणे पुढील कामकाज घ्यावे अशी मी विनंती करतो.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 6 वरील कामकाज संपलेले आहे. त्यामुळे त्यावर कोणालाही बोलता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना बोलावयाचे असल्याने मी त्यांना आता संधी देत आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी बारामतीच्या सभेमध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी जे वक्तव्य केले होते ते सदनामध्ये येऊन सांगावे अशा प्रकारची मागणी आहे. त्यांना नेमके काय सांगावयाचे होते ते त्यांनी सदनामध्ये येऊन सांगावे. यावर सतत दीड-दोन तासापासून चर्चा सुरू आहे. तेव्हा येथे माननीय मुख्यमंत्र्यांनी येऊन आपली भूमिका स्पष्ट करावी अशी आमची मागणी आहे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सभागृहाच्या बाहेर व निवडणुकीत काय मत व्यक्त केले त्याची या सभागृहात चर्चा होत नाही. कामकाजपत्रिकेमध्ये जो विषय असतो त्याची चर्चा आपण सभागृहात करतो. असे आम्ही किती तरी विषय काढू शकतो. तेव्हा सभागृहाच्या बाहेरील चर्चा येथे घेण्यात येऊ नये. सभागृहाचे माननीय नेते उत्तर देण्यास सक्षम आहेत. या लक्षेवधी सूचने वरील चर्चा संपलेली असल्यामुळे आपण पुढील कामाकाजाला सुरूवात करावी.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : हा विषय आता संपलेला आहे. लक्षवेधी सूचनेवर आता आपल्याला बोलता येणार नाही. आता आपल्याला मागे जाता येणार नाही. लक्षवेधी सूचना संपल्यानंतर मी विशेष उल्लेख घेतलेले आहेत. गदारोळ झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज आठ मिनिटांसाठी तहकूब केले होते. आता आपण पुढे गेलेलो आहोत.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी घोषणा देतात.)

**तालिका सभापती** : आता विधान सभेने संमत केलेले वि.स.वि.क्रमांक 35 चर्चेला घेण्यात येत आहे.

.....(गोंधळ).....

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXXV OF 2014.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ENTERTAINMENTS DUTY ACT.)

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-35, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

.....(गोंधळ).....

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक-35, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-35 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

.....(गोंधळ).....

**तालिका सभापती** : सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-35 संमत झाले आहे.

---------- यानतन श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, संविधानिक पंरपरेचे पालन केले जावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. आपल्याला जे काही राजकारण करावयाचे आहे ते आपण जरुर करावे. या ठिकाणी आपण बिले मांडली, होयचे बहुमत, होयचे बहुमत झाले परंतु याचे नेमके काय होऊ शकते याची आपल्याला जाणीव आहे. आम्ही बिलाच्या संदर्भात पोल मागू शकलो असतो परंतु आम्ही पोल मागितला नाही. परंतु याचा अर्थ अशाच पध्दतीने आपण अन्यायकारक कामकाज पार पाडत जावे असे नाही. आम्हाला आपली ही पध्दत योग्य वाटत नसल्यामुळे आम्ही त्याचा निषेध करतो, सभात्याग करतो. कामकाज पत्रिकेत यापुढचा प्रस्ताव विदर्भाचा असून तो महत्वाचा आहे. त्यामुळे विदर्भाच्या प्रस्तावावर चर्चा होणे आवश्यक आहे. या विषयाच्या संदर्भात ज्या फोरमवर जाऊन चर्चा करावयाची आहे त्या फोरमवर जाऊन आम्ही चर्चा नक्की करु. या ठिकाणी संसदीय कामकाज मंत्री ज्या पध्दतीने बोलले ते योग्य नाही. माझे म्हणणे असे आहे की, थोडी फार चर्चा करा, संवाद करा. परंतु आपण काहीच करीत नाही. आम्ही विदर्भाच्या संदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव दिला आहे. विदर्भातील जनतेच्या भावना या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना मांडावयाच्या आहेत. परंतु याचा अर्थ या पध्दतीने आपण वरोधी पक्षाची गळचेपी करणार असाल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. आपण आज ज्या पध्दतीचा वापर केला त्याचा आम्ही निषेध करतो, सभात्याग करतो. आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी अशी विनंती करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

**तालिका सभापती** ( श्री.रामनाथ मोते ) : सन्माननीय शिक्षण मंत्री आपल्याला रिप्लाय पूर्ण करावयाचा आहे काय ?

श्री. विनोद तावडे : मी रिप्लाय पूर्ण केलेला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कामकाजाच्या संदर्भात माझा पॉईंट ऑफ प्रोसिजरचा मुद्दा होता. परंतु आपण माझा मुद्दा ऐकत नसाल तर मी जागेवर उभा राहतो.

**तालिका सभापती** : पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी विचार मांडल्यानंतर मी पुढील कामकाज पुकारले होते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या सभागृहाचे कामकाज कसे चालले पाहिजे यासंदर्भात नियम व संकेत आहेत. या ठिकाणी दोन घटना घडल्या त्यावरुन हे सरकार कामकाजात गंभीर नाही हे दिसून येते. पीठासीन अधिकाऱ्यांनी शासनाला पाठीशी घालू नये असे मला म्हणावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री ) : पीठासीन अधिकारी पाठीशी घालतात असे शब्द बोलणे बरोबर नाही.

श्री. कपिल पाटील : पीठासीन अधिकाऱ्यांनी सरकारला पाठीशी घालू नये अशी मी विनंती केली होती. ठीक आहे मी बोललेले वाक्य मागे घेतो. पीठासीन अधिकारी सर्वोच्च आहेत. कामकाज कसे चालले पाहिजे यासंदर्भात मी दोन उदाहरणे दिली होती. पीठासीन अधिकाऱ्यांनी वारंवार सांगूनही शिक्षण मंत्र्यांनी त्यांचे उत्तर पूर्ण केले नाही. तसेच लक्षवेधीच्या संदर्भात आपण जो निर्णय दिलेला आहे त्याबाबत मी आक्षेप घेत नाही. परंतु या लक्षवेधीबाबतचे उत्तर आणि या सभागृहाचे नेते माननीय खडसे साहेबांनी दिलेले उत्तर यामध्ये अंतर आहे. लक्षवेधी मागे घेतली गेली नाही तर माननीय मंत्री श्री. खडसे साहेबांचे उत्तर बाजूला राहील आणि समाजात आग लागेल. माननीय खडसे साहेबांनी चांगले उत्तर दिले असून सर्वांनी आपल्या उत्तराबद्दल आदर व्यक्त केला आहे. या लक्षवेधीसूचनेमध्ये ज्या त्रुटी राहिलेल्या आहेत त्या इतक्या मोठया आहेत की, त्यातून समाजामध्ये वैमनस्य निर्माण होईल. यासाठी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी येऊन निवेदन करणे आवश्यक आहे. माननीय खडसे साहेबांनी चांगली भूमिका घेतली असून त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांनी कौतुकही केलेले आहे. परंतु निवेदन जसेच्या तसे आहे. निवेदनामध्ये 3 बाबी दिलेल्या आहेत. धनगर जमातीच्या संदर्भात "जात"असा उल्लेख आहे. जर सरकारची भूमिका "जात" असेल तर जमातीची मान्यता फार दूरची झाली. त्यामुळे एक समाज जमातीची मागणी करीत असतांना त्यासंदर्भात शासनाची भूमिका अत्यंत स्पष्ट असणे आवश्यक आहे. तसेच या ठिकाणी जे निवेदन आहे ते निवेदन पूर्णपणे मागे घेतले गेले पाहिजे.

**तालिका सभापती** : मी आपल्याला पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलण्यास परवानगी दिली होती परंतु आपण भाषण करीत आहात. आपण दोन्ही विषय एकत्र करीत आहात. कृपया आपण असे करु नका.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपण दोनदा निर्णय दिलेला आहे. अगोदर माननीय उप सभापतींनी सांगितले की, शिक्षण मंत्री येणार असून ते आल्यानंतर उत्तर पूर्ण करतील. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे हे ऑनलेग होते व आपण ते मान्ही केले होते. या ठिकाणी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहाला अवगत करण्याची आवश्यकता आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडूनच आश्वासन मिळू शकते.

**तालिका सभापती** : धनगर समाजाच्या आरक्षणाचा विषय संपला आहे. यापूर्वी माझी जी लक्षवेधी आणि आपली चर्चा व त्याचे उत्तर. त्यावेळची परिस्थिती अशी होती की, त्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात रिप्लाय सुरु होता त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे ऑनलेग होते. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचे बोलणे झाल्यानंतर माननीय शिक्षण मंत्री उत्तर देणार होते. माननीय शिक्षण मंत्र्यांचे उत्तर अद्याप पूर्ण झालेले नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : आज विशेष उल्लेख घेण्यात आले नाहीत.

**तालिका सभापती** : विशेष उल्लेख मी पुकारले होते परंतु गदारोळमुळे कोणीही विशेष उल्लेख मांडत नव्हते. विशेष उल्लेखाच्या संदर्भात माननीय सभापती महोदय योग्य तो निर्णय घेतील. परंतु विशेष उल्लेखाची उत्तरे आपल्याला नक्की मिळतील. आता महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 च्या प्रस्तावाला सुरुवात करण्यात येत आहे.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष

**मु.शी.**: विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष या विषयावर सर्वश्री.सुनिल तटकरे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, जनार्दन चांदूरकर, धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेंद्र जैन, संजय दत्त, किरण पावसकर, अनंतराव गाडगीळ, प्रकाश गजभिये, रामहरी रुपनवर, ख्वाजा बेग, जोगेंद्र कवाडे, अनिल तटकरे, हरिभाऊ राठोड, संदिप बाजोरिया, चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. शरद रणपिसे, आनंदराव पाटील वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. राजेंद्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील पस्ताव मांडतो.

"सन १९६० साली नागपूरसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती करताना विदर्भाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी स्वप्न प्रत्यक्षात उतरविणे आवश्यक आहे. विदर्भातील कृषी क्षेत्र, सिंचन प्रकल्प, ऊर्जानिर्मिती, औद्योगिक विकासाला चालना देण्याची आवश्यकता, विदर्भात सिंचनाचा अनुशेष मोठ्या प्रमाणात असून गोसीखुर्द सारखा महत्वाकांक्षी प्रकल्प अद्यापही पूर्ण न होणे व प्रकल्पग्रस्तांचे अद्यापही पुनर्वसन न होणे, विदर्भात धान, कापूस व सोयाबीन ही मुख्य पिके असून पाण्याच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात उत्पन्न न मिळणे, त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होणे, यासाठी शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात शेतीसाठी पाणी देण्याची आवश्यकता, विदर्भात नैसर्गिक संपत्ती व वनक्षेत्र मुबलक प्रमाणात असतांना सुध्दा विदर्भात त्याप्रमाणात उद्योग निर्मिती होत नसणे, उद्योजकांना विदर्भाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, उद्योजकांना विज व पाणी अल्प दरात दिल्यास तसेच रस्ते वाढविल्यास तेथे उद्योगधंद्यात वाढ होण्याची शक्यता, नागपूर येथे कार्गोहब या महत्वाकांक्षी प्रकल्पाला चालना देवून या प्रकल्पाचे काम पूर्ण केल्यास त्याठिकाणी उद्योग वाढीस चालना मिळण्याची शक्यता असल्याने कार्गोहबचे काम त्वरीत पूर्ण करण्याची आवश्यकता, विदर्भात उद्योगधंद्याची वाढ होत नसल्याने बेरोजगारीचे वाढत असलेले प्रमाण, विदर्भात अधिकारी / कर्मचारी जाण्यास नाखुश असल्याने तेथे मोठ्या प्रमाणात अधिकारी / कर्मचारी यांची पदे रिक्त असणे, या सर्व बाबींचा विचार करता विदर्भाची सर्वांगिण प्रगती होण्यासाठी त्याठिकाणी सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता व त्यासाठी जास्त निधी देणे आवश्यक, या सर्व

..५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र जैन.....

बाबींचा अभ्यासपूर्ण विचार करुन कालबध्द कार्यक्रम तयार करुन व विशेष अनुदान देवून विदर्भाचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन...

सभापति महोदय, नियम 260 के विदर्भ के प्रस्ताव के माध्यम से हम सरकार का ध्यान इस ओर आकर्षित करना चाहते है कि विदर्भ में जब जब विधानसभा का शीतकालीन सत्र होता है, तब विदर्भ के प्रश्न, विदर्भ के अनुशेष की बात, सिंचन सुविधा की बात, विदर्भ के किसानों के साथ न्याय होना चाहिए, ऐसे कई विषयों पर हम बात करते है. मैं सरकार को बताना चाहता हूं कि विदर्भ के हर प्रश्नों के आँकडे आपको पता हैं. हर समस्याओं के आँकड़े, कौनसी समिति बनी, किस समिति का क्या अहवाल आया, विदर्भ में कितना अनुशेष है, विदर्भ की परिस्थिति क्या है, विदर्भ के किसानों की क्या परिस्थिति है, सिंचन सुविधाओं में क्या अभाव है, विदर्भ की जो प्रमुख फसल है, चाहे वह धान उत्पादक किसान हों, सोयाबीन उत्पादक किसान हों, कपास उत्पादक किसान हों, संत्रा उत्पादक किसान हों, उन किसानों की क्या स्थिति है, इन सब के बारे में मंत्री महोदय और सरकार को बताने की जरूरत नहीं है. हमारे मुख्यमंत्री विदर्भ के है. दिनांक 20.12.2011 को नियम 293 के अंतर्गत उन्होंने जो भाषण किया था, वह भाषण मैं पढ़ रहा था, भाषण पढ़ने के बाद मुझे ऐसा लगा कि अब विदर्भ के लिए निश्चित ही अच्छे दिन आने वाले है. आपके कई भाषण हमने पढ़े है. शीतकालीन सत्र में या मुंबई के सत्र में, जब हम उस तरफ बैठा करते थे, तो आपने जिस शानदार तरीके से विदर्भ के किसानों को प्रलोभन दिया, विदर्भ के उद्योगपतियों को प्रलोभन दिया और अपनी बातों का आपने तंतोतंत पालन किया, तो निश्चित रूप से विदर्भ का विकास हो सकता है. मैं यहाँ आँकड़े नहीं देना चाहता हूं. केवल इतना बताना चाहता हूं कि 1984 में दांडेकर समिति ने विदर्भ के बारे में अभ्यास किया. अभ्यास करने के बाद जो अनुशेष दिखाया गया, वह अनुशेष 2014 तक भी पूरा नहीं हुआ. विदर्भ के किसानों का यदि हम विकास करना चाहते है, विदर्भ का विकास करना चाहते है, तो मैं आपको बताना चाहता हूं कि महाराष्ट्र में जो बिजली का उत्पादन होता है, उस उत्पादन का 60 प्रतिशत हिस्सा विदर्भ से होता है. विदर्भ में खनिज संपदा 100 प्रतिशत है. महाराष्ट्र में वनों का संरक्षण और पर्यावरण को संतुलित बनाए रखने के लिए वन क्षेत्र 58 प्रतिशत विदर्भ में है. लोह साठा विदर्भ में 60 प्रतिशत है. इसके बावजूद विदर्भ के साथ अन्याय किया जाता है. हम हमेशा यही बात कहते है कि विदर्भ में किसान बड़े पैमाने पर आत्महत्या कर रहा है. आज किसान आत्महत्या क्यों कर रहा है ? हम सिंचन क्षमता बढ़ा सकते है. लेकिन सिंचन प्रकल्पों की आज क्या स्थिति है ? हमने वनों

....2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन......

का संरक्षण किया. विदर्भ के जंगल को बचाया है. लेकिन मैं दुर्भाग्य से एक बात बताना चाहता हूं कि विदर्भ सिंचन के 147 प्रस्ताव वन कानून से मुक्त करने के लिए भेजे गए, उसमें से केवल 43 सिंचन प्रकल्पों को वन कानून के माध्यम से अंतिम मान्यता मिली, बाकी के सारे सिंचन प्रकल्प प्रलंबित है. अब विदर्भ के लिए अच्छे दिन आने वाले है. विदर्भ और महाराष्ट्र की समस्या हल करने के लिए विदर्भ के दो वजनदार मंत्री केंद्र सरकार में है. एआईबीपी का प्रश्न हों, वन कानून का प्रश्न हों, कल माननीय मुख्यमंत्री जी ने इसी सदन में बताया कि हम माननीय प्रधान मंत्री जी के नेतृत्व में एक समिति की स्थापना करना चाहते है, ताकि केंद्र के पास जो प्रस्ताव रुके हुए हैं, केंद्र के जो ना-हरकत प्रमाणपत्र के कारण रुके हुए है, केंद्र के माध्यम से जो अनुमति लाने की बात है, उन सभी समस्याओं के लिए हम एक समिति का गठन करना चाहते हैं. वन कानून के कारण जो प्रकल्प रुके हुए है, जो सिंचन प्रकल्प रुके हुए है, उनको तत्काल मान्यता दिलाने के लिए, विदर्भ के लोगों को अच्छे दिन दिखाने के लिए विदर्भ के जो दो वजनदार मंत्री केंद्र में है, उन्होंने विदर्भ की समस्याओं को हल करने के लिए प्रयास करना चाहिए. हमें इस बात की खुशी है कि जिन्होंने बहुत अच्छे अच्छे भाषण दिए, जिनका भाषण पढ़ने के बाद ऐसा लगता है कि अब विदर्भ का चित्र बदलेगा. विदर्भ के किसानों की उन्नति होगी, एक नई दिशा से विदर्भ आगे बढ़ेगा. माननीय मुख्यमंत्री विदर्भ के है. पैसे का तो प्रश्न ही नहीं आता, क्योंकि वित्त मंत्रालय भी विदर्भ में है. ऊर्जा का तो प्रश्न ही नहीं आता. पूरे विदर्भ में सबसे ज्यादा बिजली का उत्पादन होता है. लेकिन लोड शेडिंग का संकट हम विदर्भवासियों और किसानों को झेलना पड़ता है. ऊर्जा मंत्री भी विदर्भ के है. वित्त मंत्री भी विदर्भ के है. यदि पुराना अनुशेष देखा जाए तो विदर्भ के कृषि पंप का अनुशेष ढ़ाई से तीन लाख तक बढ़ गया है. बिजली का उत्पादन विदर्भ में ज्यादा प्रतिशत में करने पर भी किसानों को कृषि पंप के कनेक्शन नहीं मिलते. किसानों के प्रकरण प्रलंबित रहते हैं. इस ओर सरकार ने ध्यान देने की आवश्यकता है. जहां तक किसानों के विकास का प्रश्न है, चाहे वह धान उत्पादक किसान हों, सोयाबीन उत्पादक किसान हों, संत्रा उत्पादक किसान हों, कपास उत्पादक किसान हों, इन सभी की समस्या के लिए हर साल हमें लड़ाई लड़नी पड़ती है, हर साल सदन में बात उठानी पड़ती है. हमें पता है कि आधारभूत कीमत पर

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....3.

श्री राजेंद्र जैन.......

किसानों की उपज की खरीदी होनी चाहिए. लेकिन अंतिम समय तक सरकार कोई भी निर्णय नहीं लेती है. किसानों के पास कभी बारदाणा नहीं रहता, कभी पैसे नहीं रहते है, कभी माल खरीदी करने के लिए यंत्रणा नहीं रहती है. किसानों को कम कीमत पर अपना माल बेचना पड़ता है जिससे किसानों को बहुत नुकसान होता है. इस साल बहुत कम समर्थन मूल्य जाहिर हुआ है. बोनस देने की जो नीति है, इस बारे में सरकार ने समय से पूर्व निर्णय लेकर, कृषि उपज पर सरकार ने बोनस देना चाहिए. विदर्भ में संत्रे का उत्पादन होता है. विदर्भ का संत्रा पूरे देश में मशहूर है. लेकिन आज संत्रा उत्पादक किसानों की क्या दशा है ? आज संत्रा उत्पादक किसानों को सही भाव नहीं मिल रहा है. कभी अतिवृष्टी होती है, कभी किसी कीड़ का प्रादुर्भाव होता है जिससे किसानों को भारी नुकसान सहना पड़ता है. संत्रे पर प्रक्रिया करने वाले अत्याधुनिक कारखानों को भी मदद करने की आवश्यकता है, ताकि संत्रा उत्पादक किसानों को न्याय मिले. धान उत्पादक किसानों को भी न्याय मिलना चाहिए.

सभापति महोदय, जहां तक सिंचन की बात है, तो अन्य सदस्य भी इस बारे में अपनी बात कहेंगे. गोसीखुर्द प्रकल्प विदर्भ का सबसे महत्वपूर्ण प्रकल्प है. गोसीखुर्द प्रकल्प से पूरे विदर्भ को मदद हो सकती है. लेकिन आज गोसीखुर्द प्रकल्प की क्या स्थिति है ? भूसंपादन के मामले में रोजाना अधिकारी बदलते रहते हैं. पुराने अधिकारी जाते है, नए अधिकारी आते है, अपने अपने तरीके से रोज कोई न कोई अड़चन निर्माण करके, भूसंपादन और अन्य कार्यो में दिक्कतें पैदा करते रहते हैं. इसी तरह पुनर्वसन का मामला है. पुनर्वसन विभाग में उप अभियंता के तीन पद है, कनिष्ठ अभियंता के दस पद, सर्कल अभियंता के 146 पदों में से 40 पद रिक्त है. प्रकल्प का काम पूरा करना है, 90 प्रतिशत काम पूरा हो गया है. केंद्र और राज्य सरकार की ओर से इसके लिए मदद आ रही है. लेकिन पद रिक्त होने के कारण भूसंपादन का काम वहां रुका पड़ा है. कई दिक्कतें निर्माण करने के कारण प्रकल्प का काम पूरा नहीं हो पाता है. इससे दिन प्रतिदिन कॉस्ट बढ़ती है. हम सिंचन क्षमता का पूरी तरह से उपयोग नहीं कर सकते. आज किसान जिस परिस्थिति से गुजर रहा है, उससे वह बाहर आना चाहिए. गोसिखुर्द प्रकल्प जल्द से जल्द पूरा करने के लिए, गोसिखुर्द के काम के लिए जो रिक्त पद हैं, उसको भरना चाहिए.

....4.



ASS/नितनवरे श्री जुन्नरे के बाद 17:20

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन......

गड़चिरोली जैसा पिछड़ा और नक्सलग्रस्त जिला, जिसमें 23623 पद है और 2413 पद रिक्त है. 2413 पद केवल गड़चिरोली जिले में रिक्त है. भंडारा और गोंदिया जिले की स्थिति यदि आप देखें तो स्वास्थ्य विभाग में 500 से ज्यादा पद रिक्त हैं. इसी तरह की परिस्थिति पूरे विदर्भ में है. दवाखाना, पुनर्वसन का कार्यालय, भूसंपादन का कार्यालय, कलेक्टर का कार्यालय, इन सभी कार्यालयों में अधिकारी नहीं रहेंगे, विदर्भ में काम करने के लिए अधिकारी नहीं रहेंगे, काम करने के लिए अच्छे अधिकारी नहीं रहेंगे, तो विदर्भ का विकास कैसे होगा ? किसानों की उन्नति कैसे होगी ? स्वास्थ्य विभाग की परिस्थिति बहुत खराब है. कई अधिकारियों की बदली होती है, लेकिन वे अधिकारी विदर्भ में आना नहीं चाहते. गडचिरोली, भंडारा, गोंदिया और चंद्रपुर में अधिकारी आना नहीं चाहते. इस प्रस्ताव के माध्यम से मैं यह कहना चाहता हूं कि निधि कितनी उपलब्ध की जाएगी, यह आपका विषय है. आप क्या करना चाहते हैं यह आपका विषय है. लेकिन स्वास्थ्य विभाग के रिक्त पदों को भरने की जरूरत है. मदद एवं पुनर्वसन कार्यालय में अधिकारियों की नियुक्ति करना सरकार के लिए तो आसान काम है. इस बारे में अतिशीघ्र आदेश निकाले जाने चाहिए. विदर्भ में खास तौर पर गडचिरोली, चंद्रपुर, भंडारा और गोंदिया जैसे पिछड़े हुए नक्सलग्रस्त इलाके में जो पद रिक्त है, उनको भरने के लिए तुरंत आदेश दिया जाना चाहिए.

.....भाषण जारी/श्री अग्रवाल

अस्धारित प्रत / प्रसिद्धिसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन .....

सभापति महोदय, विदर्भ में भंडारा, गडचिरोली, चंद्रपुर एवं गोंदिया में अगर उद्योगों की बात करें तो इन चार जिलों में राईस मिल का उद्योग बहुत बड़ा है. बड़े-बड़े उद्योग हमारे विदर्भ में नहीं आना चाहते हैं. वे इसलिए नहीं आना चाहते क्योंकि दूसरे राज्यों की अपेक्षा हमारे इन क्षेत्रों में बिजली की दर बहुत ज्यादा है. अगर आप विदर्भ की उन्नति और प्रगति चाहते हैं और बड़े उद्योगों को आकर्षित करना चाहते हैं तो उस बारे में मैं कहना चाहूंगा कि इससे पहले हमारी आघाड़ी सरकार ने विदर्भ एडवांटेज कार्यक्रम का आयोजन किया था. बड़े-बड़े उद्योगों को आकर्षित करने के लिए इस कार्यक्रम का आयोजन किया था. विदर्भ में बिजली का रेट ज्यादा रहेगा, अन्य राज्यों जैसी सुविधायें नहीं रहेंगी तो यहां पर उद्योगपति अपने उद्योग क्यों लगायेंगे. यहां पर जो उद्योग चल रहे हैं उनको बचाने एवं संरक्षण देने की जिम्मेदारी सरकार की है. हमारे भंडारा, गडचिरोली, गोंदिया और चंद्रपुर ये चार नक्सलग्रस्त एवं आदिवासी जिले हैं. इन चार जिलों में राईस मिल का उद्योग बड़े पैमाने पर चलता है. यहां की करीब 400 से 500 राईस मिलों में 25 से 30 हजार लोगों को काम मिलता है. छत्तीसगढ़ में आपकी सरकार है. वहां आप पता कीजिए कि वहां पर बिजली की दर क्या है, राईस मिल के उद्योगों को क्या सुविधायें मिलती हैं ? हमें विदर्भ के बेरोजगार लोगों को काम देने की जरुरत है. विदर्भ में जो युवी पीढ़ी के लोग हैं और जो पढ़ लिखकर बड़े हो गये हैं, उनको काम देने की आवश्यकता है.

सभापति महोदय, हमारी सरकार केन्द्र में थी. विदर्भ में केन्द्र सरकार का कोई बड़ा प्रकल्प नहीं आया था. भंडारा जिले में भेल कंपनी का एक बड़ा प्रकल्प हमारी सरकार के माध्यम से लगा. इसमें जमीन का अधिग्रहण हुआ, कंपाउंड वॉल बनी और नयी सरकार आने के बाद इसका पूरा काम रुक गया. हमें उम्मीद थी कि वहां पर हजारों बेरोजगार लोगों को काम मिलेगा. सभापति महोदय, मैं मंत्री महोदय से कहना चाहूंगा कि विदर्भ में वैसे ही उद्योग नहीं आते हैं परन्तु केन्द्र सरकार ने एक उद्योग लगाया है तो राज्य सरकार अपने माध्यम से केन्द्र सरकार से यह विनती करे कि भंडारा में भेल कंपनी का जो प्रकल्प है वह अति शीघ्र पूरा हो. इसके साथ-साथ वहां पर स्थानिक नवयुवक लोगों को नौकरी मिलनी चाहिए. हम नया उद्योग नहीं ला सकते,



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन .....

आप नया उद्योग लाने की स्थिति में नहीं हैं लेकिन हमने जो पुराना उद्योग लगवाया है, उसको आपकी केन्द्र सरकार ने चालू करवाने के संबंध में पूरा प्रयत्न करना चाहिए. ऐसी विनंती मैं इस प्रस्ताव के माध्यम से मुख्यमंत्री महोदय से करना चाहता हूं.

सभापति महोदय, आज राईस मिल उद्योग संकट में है. इस उद्योग को बचाने के लिए बिजली की दर कम करने की जरूरत है. इसके साथ ही हमारे महामंडल और आदिवासी विकास महामंडल के माध्यम से आधारभूत कीमत में जो धान की खरीद होती है, उसके बाद वह धान 4 महीने से 2 साल तक खुले में पड़ा रहता है. पिछले साल के आदिवासी विकास महामंडल और दूसरे महामंडल के आंकड़े देखेंगे तो पता चलेगा कि 300 से 400 करोड़ रूपये का धान खराब हो गया. इसके बाद सरकार ने इस धान का कैटल फीड में ऑक्शन किया. इस धान की अगर प्रोपर टाईम में मिलिंग कर लेते या सही टाईम में निर्णय ले लेते तो इतना धान खराब नहीं होता. इस साल भी अगर हमने सही निर्णय नहीं लिया तो अनाज का नुकसान तो होगा ही, इसके साथ ही जो राईस मिलों को काम मिलना चाहिए, वह काम उनको नहीं मिलेगा. इस मामले में अगर आप छत्तीसगढ़ राज्य की नीति का प्रयोग करेंगे तो राईस मिल उद्योग बच सकेगा और हम विदर्भ के इन 4-5 जिले के लोगों को रोजगार दे सकेंगे.

सभापति महोदय, नये उद्योग लाने के लिए कहीं न कहीं सब्सिडी बढ़ानी पड़ेगी. इसके लिए हमें कोई नयी उपाय योजना करनी पड़ेगी तभी विदर्भ में नये उद्योग आ सकेंगे. विदर्भ की अगर आप प्रगति चाहते हैं तो कृषि पर आधारित जो उद्योग हैं, उनको ज्यादा मदद करनी पड़ेगी. कृषि पर आधारित उद्योगों को जब हम बढ़ावा देंगे तो कृषि उपज का उपयोग होगा. कृषि उपज का उपयोग होगा तो कृषि उपज को अच्छा भाव मिलेगा. अच्छा भाव मिलेगा तो किसानों की उन्नति एवं प्रगति हो सकती है.

सभापति महोदय, विदर्भ में भंडारा, गोंदिया एवं चंद्रपुर में जो बड़ी-बड़ी एमआईडीसी हैं उनमें विशेषकर गोंदिया, भंडारा, साकोली, गोरेगाव में 15-20 साल पहले एमआईडीसी का निर्माण हुआ. वहां पर लोगों ने जमीन लेकर रख ली लेकिन वहां पर उद्योग नहीं लगाये. जमीनें तो ले लीं, कपांउड वॉल लगा दी परन्तु 15-20 वर्षों में उन जमीनों पर उद्योग नहीं लगे. अब



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन .....

कोई नया उद्योगपति जमीन की मांग करता है तो एमआईडीसी का उत्तर होता है कि उसके पास जगह नहीं है. इस संबंध में सरकार को गौर करना चाहिए एवं एक कालबध्द नीति निर्धारित करनी चाहिए कि जो उद्योगपति एमआईडीसी में जगह लेता है एवं इतने वर्ष में कोई कारखाना नहीं लगाता है या इतने वर्ष वह जमीन पड़ी रहती है तो वह जमीन उससे वापस लेकर दूसरे उद्योगपति को दी जानी चाहिए. सरकार को उद्योगों को बढ़ाने के लिए कोई अच्छा निर्णय लेना चाहिए.

सभापति महोदय, हमारे विदर्भ में काफी पर्यटन क्षेत्र हैं. विदर्भ में औद्योगिक क्रांति एवं उन्नति के लिए हम पर्यटन का विकास कर सकते हैं. आज हमारे गोंदिया, भंडारा, गडचिरोली एवं चंद्रपुर में भरपूर वन क्षेत्र है. यहां पर काफी संख्या में बाघ हैं, प्राकृतिक सौंदर्य है. यहां पर हजारों की संख्या में पर्यटक आते हैं परन्तु यहां की असुविधाओं की वजह से पर्यटन के क्षेत्र में बढ़ोत्तरी नहीं हो पाती है. हमारी पूर्व सरकार ने केन्द्र सरकार से टूरिज्म के लिए 50 करोड़ रूपये की मंजूरी प्राप्त की थी. यहां पर अब नयी सरकार आयी है. मैं मुख्यमंत्री जी से विनती करता हूं कि विदर्भ के पर्यटन के विकास के लिए वे केन्द्र सरकार से अधिक से अधिक मदद प्राप्त करें. इससे विदर्भ में पर्यटन उद्योग को बढ़ावा मिल सकता है. बेरोजगार लोगों को भी इस क्षेत्र में रोजगार मिल सकेगा. विदर्भ में पर्यटन को बढ़ावा देकर हम एक अच्छा कायम स्वरूपी वातावरण तैयार कर सकते हैं. विदर्भ में किसानों का नुकसान होता है, वे आत्महत्या करते हैं और बार-बार यह दुख सबको सहन करना पड़ता है. विदर्भ में अगर पर्यटन उद्योग एवं अन्य उद्योगों को बढ़ावा मिलेगा तो उससे किसानों एवं उनके बच्चों को भी काम मिलेगा और किसान जो आत्महत्या करते हैं, वह रूक पायेंगी. विदर्भ में पर्यटन एवं अन्य उद्योगों को कायम स्वरूपी बढ़ावा देने के लिए हर छोटी एवं बड़ी बात तथा विदर्भ के अनुशेष का सरकार को ध्यान रखना पड़ेगा.

सभापति महोदय, विदर्भ के जो सिंचन प्रकल्प हैं उनके बारे में कई बार इस सदन में एवं नीचे के सदन में चर्चा हुई. सिंचन प्रकल्पों के लिए भरपूर पैसा पिछली सरकार ने दिया. 80-90 प्रतिशत काम पूरे हो गये. सरकार के पास पैसा होने के बावजूद सुधारित प्रशासकीय मान्यता को





असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन .....

लेकर कई प्रकल्पों के काम रुके पड़े हुए हैं. अधिकारियों से पूछो तो वे कहते हैं कि सुधारित प्रशासकीय मान्यता नहीं मिली. जिस प्रकल्प पर सरकार ने इतना पैसा खर्च कर दिया, जिस प्रकल्प का 80-90 प्रतिशत काम पूरा हो गया, उस प्रकल्प के पूरा होने से हजारों किसानों को पानी मिल सकता है, उनका भविष्य बदल सकता है. सुधारित प्रशासकीय मान्यता न देने के कारण अगर उस प्रकल्प का काम पूरा नहीं होता है, उसका काम रुकता है तो मैं माननीय मुख्यमंत्री जी से अनुरोध करुंगा कि आप सुधारित प्रशासकीय मान्यता की वजह से विदर्भ के जो सिंचन एवं अन्य प्रकल्प रुके पड़े हुए हैं, उनको पूर्ण करने के संबंध में एक उचित कदम उठायें.

सभापति महोदय, विदर्भ के किसानों को अन्य क्षेत्रों की तुलना में विंधन विहीर कम मिले, इस पर गौर करने की आवश्यकता है. किसानों की उन्नति एवं प्रगति के लिए विदर्भ का अनुशेष दूर करने की आवश्यकता है. विदर्भ में बड़े पैमाने पर प्रलंबित कृषि पंपों के कनेक्शन की मांग है. विदर्भ के किसानों के अनाप-शनाप बिजली के बिल आते हैं, इस पर नियंत्रण करने की आवश्यकता है. किसान वैसे ही बहुत परेशानी में रहता है फिर उसको 50 हजार रुपये का बिजली का आता है. किसी किसान को 40 हजार रुपये का बिजली का बिल आता है. इससे उसके मन की स्थिति बदल जाती है. उसको यह झटका लगता है कि उसने 1 घंटा भी कृषि पंप नहीं चलाया, उसका कई दिनों तक कृषि पंप बंद है, उसका अगर महीने के अंत में 50 हजार रुपये बिजली का बिल आता है तो उसकी मन स्थिति बिगड़ती है और फिर उसको कई परेशानियों का सामना करना पड़ता है. हम किसानों के लिए जब तक कोई कायम स्वरुपी योजना नहीं बनायेंगे, बिजली के कृषि पंपों को जोड़ने का काम नहीं करेंगे, अनाप-शनाप बिजली के बिल देना बंद नहीं करेंगे, किसान के उपज की आधारभूत कीमत में बढ़ोत्तरी नहीं करेंगे, बोनस की नीति शुरुआत में निर्धारित नहीं करेंगे या घोषित नहीं करेंगे, तब तक हम किसानों को राहत नहीं दे पायेंगे. किसानों को राहत एवं उनको मजबूती देने के लिए सरकार को इन बातों पर सोचना पड़ेगा एवं एक ठोस उपाय योजना करनी पड़ेगी. सभापति महोदय, माननीय मुख्यमंत्री जी विदर्भ के हैं. वे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन .....

विदर्भ की पूरी परिस्थिति से अवगत हैं. मैं उनसे अपेक्षा करता हूं कि वे इस विदर्भ की उन्नति एवं प्रगति के लिए काम करेंगे.

सभापति महोदय, विदर्भ के विषयों के संबंध में कई समितियां बनीं और उनके अहवाल आये. कई समितियों ने विदर्भ के अनुशेष के बारे में बताया. राज्यपाल महोदय ने भी विदर्भ के अनुशेष के बारे में बात की. आज की तारीख में विदर्भ का अनुशेष 74-75 हजार करोड़ स्Öß •µÖÖ¤üÖ ÆüÖê ÝÖµÖÖ Æîü. µÖê ÃÖÖ¸üß ³ÖµÖê ÃÖê ¯µÖ ´ÖãÜµÖ´ÖÓ¡Öß •Öß Ûúß ®Ö•Ö¸ü ´Öë ÖÖŸÖë ´ÖÖ®Ö®Öß² ÖÖ¸üŸÖßµÖ •Ö®ÖŸÖÖ ¯ÖÖ™üá Ûúß µÖÆüÖÓ ¯Ö¸ü ³Æîü. ÖÔ ³ÃÖ¸üÛúÖ¸ü Æîü. †Ö¯Ö ŸÖÖê “ÖÖÆüŸÖê Æïü ×Ûú ×¾Ö¤ü ÖÔ †»ÖÝÖ ÆüÖê ÝÖµÖÖ ŸÖÖê ³Ö®Öê. ×¾Ö¤ü²ÖÝÖ ¸üÖ•µÖ «† µÖÆüÖÓ Ûúß ¯ÖÏÝÖ×ŸÖ †Öî¸ü ˆ®®Ö×ŸÖ •µÖÖ¤üÖ ÆüÖêÝÖß. ÃÖ“Ö®Ö ¯ÖÏÛúú»¯Ö, ×ÛúÃÖÖ®Ö®ÖÖë ÛúÃÖÖ®Ö®ÖÖë Ûêú ×»Ö‹ Ø× ÖæŸÖ ³Ûúß ˆ®®Ö×ŸÖ, ×ÛúÃÖÖ®Ö®ÖÖë ÛúÖê †Ö¬ÖÖ¸ü ÖÖê®ÖÃÖ ¤êü®ÖÖ, ×ÛúÃÖÖ®Ö®ÖÖêÓ Ûêú ²Ûúß´ÖŸÖÖë ¯Ö¸ü ÖœÍüÖ¾ÖÖ ¤êü®Öê ²Ö““ÖÖë Ûúß ‹•µÖÖæÛêú¿Ö®Ö ÛúÖê ² ¹ÖÖŸÖÖë ¯Ö¸ü ´ÖãÜµÖ´ÖÓ¡Öß ´ÖÆüÖê¤üµÖ ÛúÖê •Ö²ÖîÃÖß •र गौर करना चाहिए. मेरा विश्वास है कि इस प्रस्ताव के माध्यम से विदर्भ के संबंध में हमने जो बातें यहां पर रखी है, उन पर माननीय मुख्यमंत्री जी जरूर सकारात्मक रूप से विचार करेंगे. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. धन्यवाद.

( प्रस्ताव प्रस्तुत झाला )

....यानंतर श्री मंगेश.

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत</u>**

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आजच्या कामकाजातील क्रमांक 4 ची लक्षवेधी सूचना आपली होती. त्या लक्षवेधी सूचनेचे उत्तर अर्धवट राहिले होते. मध्यंतर झाला होता.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी या संदर्भात केलेले निवेदन ऐकण्यास आपण सभागृहात नव्हता. मी त्या संदर्भात सांगितले आहे. आपण ऑनलेग होता. तत्संदर्भात निवेदन केले आहे. आपण आता खाली बसावे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण माननीय मंत्री महोदयांना बोलावून ती लक्षवेधी सूचना पूर्ण करावी.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आता खाली बसावे.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष

**मु.शी.** : विदर्भात कृषी, सिंचन, औद्योगिक इ. बाबींचा असलेला अनुशेष या विषयावर सर्वश्री. सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, प्रा. जनार्दन चांदूरकर, धनंजय मुंडे, भाई जगताप, राजेंद्र जैन, संजय दत्त, किरण पावसकर, अनंतराव गाडगीळ, प्रकाश गजभिये, रामहरी रुपनवर, ख्वाजा बेग, प्रा. जोगेंद्र कवाडे, अनिल तटकरे, हरिभाऊ राठोड, संदिप बाजोरिया, चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. शरद रणपिसे, आनंदराव पाटील वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरू....

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलत आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये हिवाळी अधिवेशन सुरू आहे. त्यामुळे विदर्भाच्या प्रश्नांच्या, विकासाच्या संदर्भात चर्चा व्हावी, अशी अपेक्षा आहे. माननीय मुख्यमंत्री हे देखील विदर्भाचे आहेत, त्यांनी विदर्भाविषयी सातत्याने वेगवेगळ्या विषयांद्वारे मांडणीही केली आहे. विदर्भातील मुख्यमंत्री असताना त्यांच्या काळात विदर्भातील विकासाच्या कामांना अधिक वेग यावा, विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळावा, संपूर्ण महाराष्ट्रात सर्वत्र समान विकास होण्याच्या दृष्टीकोनातून पावले त्यांच्याकडून टाकली जावीत, अशी अपेक्षा निश्चितच विदर्भातील सर्व जनतेची आहे. विदर्भातील विविध प्रश्नांवर गांभीर्याने चर्चा होत असताना विदर्भातील माननीय मुख्यमंत्री चर्चेकरिता उपस्थित राहिले असते तर बरे झाले असते.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विधानसभेत याच विषयावर चर्चा सुरू आहे. माननीय मुख्यमंत्री विधानसभेत आहेत.

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विधानसभेतही हीच चर्चा सुरू असेल तर ठीक आहे. ही चर्चा महत्त्वाची आहे. आम्ही विदर्भातील विविध प्रश्नांच्या संदर्भात करणाऱ्या सूचनांचा विचार करून शासनाने निर्णय घ्यावे, धोरण ठरवावे, ही अपेक्षा मी या चर्चेच्या वेळी व्यक्त करतो. आपणा सर्वांना विदर्भातील भौगोलिक, सामाजिक परिस्थिती माहीत आहे. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब हे देखील अनेक वर्षांपासून विरोधी पक्ष नेते म्हणून, सदनाचे सन्माननीय सदस्य म्हणून, पूर्वी युती सरकार असताना माननीय मंत्री म्हणून काम करीत होते. अनेक खाती त्यांनी भूषविली आहे. ते विदर्भाचे जावई आहेत. नागपूर युनिव्हर्सिटीचे ग्रज्युएट आहेत. सर्व गोष्टी लक्षात घेता ते काहीतरी ठोस मदत करतील किंवा उपाययोजना करतील, अशी अपेक्षा मला निश्चितपणे आहे. विदर्भाशी त्यांचा जवळचा संबध आहे. माननीय महसूल मंत्री हे मदत व पुनर्वसन मंत्री देखील आहेत. परंतु, शेतकऱ्यांच्या संदर्भात आपत्तीच्या वेळी न्याय देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून फारसा समाधानकारक झाला नाही.

सभापती महोदय, विदर्भामध्ये वन संपत्ती आणि खनिज संपत्ती मोठ्या प्रमाणात आहे. राज्यातील एकूण वन क्षेत्राच्या 50 टक्यांपेक्षा जास्त क्षेत्र विदर्भात आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 24 टक्के लोकसंख्या विदर्भात आहे, त्याच्या 83 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आहे आणि 17 टक्के लोकसंख्या फक्त शहरी भागात आहे. आपण जमिनीचा विचार केला तर विदर्भात 98 लक्ष हेक्टर जमीन असून त्यापैकी 27 लाख हेक्टर जमीन पिकाखाली आहे. विदर्भातील भौगौलिक स्थिती ठीक आहे. पूर्वी विदर्भ संपन्न विदर्भ समजले जात होते.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

वऱ्हाड आणि सोन्याची कुऱ्हाड, असा उल्लेख विदर्भाच्या बाबतीत केला जातो. अशा या विदर्भातील सुपीक जमिनीचा आणि पाण्याचा मेळ घालण्याची गरज राज्याच्या दृष्टीकोनातून आहे. त्या माध्यमातून आपण विदर्भाचा विकास करु शकू, याबाबत कुणाचेही वेगळे मत असण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली त्यावेळी खरे पाहिले तर लोकांमध्ये मतमतांतरे होती. आपण संयुक्त महाराष्ट्रात सामील व्हावे किंवा नाही, याबाबत लोक द्विधा मनस्थितीत होते. कारण, आपण एखाद्या सधन भागाबरोबर जातो त्यावेळी त्यांच्याकरिता आखलेली धोरणे आणि गरीब भागातील, मागास भागातील, अविकसित भागातील लोकांसाठी आखण्यात आलेली धोरणे यामध्ये निश्चितच फरक राहणार आहे, अशा द्विधा मनस्थितीत येथील लोक होते. परंतु, तत्कालीन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय यशवंतरावजी चव्हाण यांनी सांगितले की, विदर्भ आम्ही कधीही मागे ठेवणार नाही. विदर्भाला सोबत घेऊ, सन्मान देऊ, अशा प्रकारची भूमिका त्यांनी घेतली. तो विचार सर्वांना पटविण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. त्यावेळी विदर्भातील नेत्यांनीही अशी भूमिका घेतली की, अगोदर आम्हाला अशी खात्री द्या की, विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात आल्यानंतर विदर्भाचा विकास होईल. तरच विदर्भातील काही लोकांचा विरोध असतानाही आम्ही संयुक्त महाराष्ट्रामध्ये सामील होऊ. परंतु, तशा प्रकारची खात्री आम्हाला दिली पाहिजे. ही खात्री तोंडी नको तर लेखी स्वरुपात द्या, अशा प्रकारची मागणीही करण्यात आली होती व त्यामधूनच नागपूर करार अस्तित्त्वात आला. त्या माध्यमातून असे ठरले की, आम्ही विदर्भाचा विकास आमच्या बरोबरीने करु. परंतु, विकास होत नाही, अशी परिस्थिती निर्माण होईल, त्यावेळी काय करायचे, यासाठी करारात घटनेच्या 271 (2) या कलमाचाही अंतर्भाव करण्यात आला. देशात एखादा भाग अविकसित राहिला असेल, त्या भागाला न्याय मिळत नसेल तर या कलमाच्या अनुषंगाने सांविधानिक हक्क देण्याबाबतचे हे कलम आहे. तशा प्रकारची व्यवस्था करारामध्ये करण्यात आली.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

सभापती महोदय, अशा सर्व व्यवस्थेनंतर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्यावेळी यशवंतरावजींनी सांगितले की, संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद वसंतराव नाईक यांनाच दिले पाहिजे. अनेक नेते स्पर्धेत असताना वसंतरावजी नाईक यांना मुख्यमंत्री दिले गेले. परंतु, नंतर प्रत्येक वेळी फरक पडत राहिला. महाराष्ट्राचा विकास होत असताना एका भागामध्ये साखर कारखानदारी उभी रहात होती. काही भागामध्ये कोरडवाहु क्षेत्र असल्यामुळे आम्हाला पाणी मिळाले पाहिजे, अशी मागणी पुढे आली. पर्जन्यमान अतिशय कमी आहे म्हणून त्या भागामध्ये धरणे बांधण्याचा आग्रह होत होता. एकीकडे कारखानदारी उभी राहिली आणि सगळ्या विकसित भागाकरिता ज्य गोष्टींची गरज आहे, आर्थिक मदतीची गरज आहे, तो ओढा.........

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे ऑनलेग राहतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 19 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 55 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 19 डिसेंबर, 2014 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही